शंभू गणपुले



# असं पण होऊ शकतं!

# असं पण होऊ शकतं

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# असं पण होऊ शकतं !

(स्वतंत्र कादंबरी)

## लेखक - शंभू गणपुले

ई साहित्य प्रतिष्ठान

# असं पण होऊ शकतं

## लेखक : शंभू गणपुले

" योगिनी", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

संपर्क :जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038 020-25384472, 9822439492

jayant. karandikar@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.

google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन  :१५ ऑगस्ट २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी. ए. , एल. एल. बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड, सध्या लेखन,



प्रकाशित लेखन: "ताओ उपनिषद" ,

कथा-कविता संग्रह -२,

अंतरंग,

एक मोकाट वारं,

किती तुज समजावू सांग.

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळया संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास: "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर


©सर्व हक्क श्री. जयंत करंदिकर यांचे स्वाधीन.

जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,


Pune 411038 020-25384472, 9822439492


शंभू गणपुले यांची ई साहित्य
प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झालेली पुस्तके










# असं पण होऊ शकतं !

## (स्वतंत्र कादंबरी)

लेखक - शंभू गणपुले

लेखकाचा परिचय

लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय     : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी.ए. , एल.एल.बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड, सध्या लेखन,

प्रकाशित लेखन:  " ताओ उपनिषद" , कथा-कविता संग्रह -२

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळ्या संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास:  "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

© सर्व हक्क  श्री. जयंत करंदिकर यांचे स्वाधीन.

# अर्पण पत्रिका

’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा  -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.

-- शंभू गणपुले

# असं पण होऊ शकतं!

कर्र ड कर्र ड असा आवाज करत नरकाचा दरवाजा उघडला गेला. नरकात खितपत पडलेले तरूण, म्हातारे, स्त्री, पुरूष, लहान मुलांचे आत्मे दरवाज्याकडं धावले. आणखी एक आत्मा आला - गिऱ्हाइक आलं अशा आनंदात नाचू लागले. पण यमदूतांच्या पकडीत कुणीच दिसलं नाही. यमदूतांचा अधिकारी आणि त्याचे सहकारी एकेका आत्म्याच्या गळ्यात अडकवलेल्या नंबराच्या पट्ट्या तपासत, एकेकाला बाजूला टाकत - खरं म्हणजे पायाखाली तुडवत - पुढे पुढे जात होते. शेवटी एका तरूण आत्म्यानं अधिकाऱ्याला विचारलं -

' सर हूम आर यू सर्चिंग ?'

' ए, चुप ! इंगजी झाडलं की तुझी नरकातली शिक्षा कमी होईल असं वाटतय् का तुला? पण तसं काही होणार नाही ! ' - अधिकारी

' अरेच्या, असं असतं कां ? ' आत्म्यानं उलट प्रश्न केला.

' अरेच्या नाही आणि बिरेच्या नाही. नसते प्रश्न उपस्थित करुन आमच्या कामात अडथळा आणू नकोस ! आम्हाला आमचं काम करू दे ' - अधिकारी.

' राहिलं ! पण माझी सूचना यमराजांनी स्वीकारली असती, तर तुमचं काम खूप सोपं झालं असतं. तुम्हाला इतकी धडपड करावी लागली नसती ! ' आत्मा.

' कसली सूचना ?' अधिकारी

' नरकात टाकलेल्या आत्म्यांची देश, प्रांत, जिल्हा, शहर, पूर्ण नाव, व्यवसाय, वय, लिंग, पाप-पुण्य, वगैरे माहिती कॉम्प्यूटरमधे साठवून, तो लॅपटॉपला जोडला असता तर तुमचं काम खुपच सोपं झालं असतं ! ' आत्मा.

' ए, चुप ! तुझं ज्ञान पाजळूं नकोस ! यमराजांच्या चोपडीत ती माहिती आधीच नोंदवून ठेवलेली असते. आम्ही राजा, राणी आणि वासुदेव नावाच्या आत्म्यांचा शोध घेत आहोत.' अधिकारी.

' असं होय? अहो, राजा - राणी एका पडक्या वाड्यात लपा-छपी खेळत असतील, आणि वासु त्याच वाड्यात कुठल्या तरी कोपऱ्यात बसून जप करत असेल - ' तिसऱ्या आत्म्यानं माहिती पुरविली.

' बघा ! नरकात येऊनसुध्दा कुणी खेळतयं तर कुणी जप करतंय्. नाही तर तुम्ही? नरक नशिबी आला म्हणून चडफडत, वळ-वळ करत असतां नुसते !' अधिकारी.

' त्या मुलाचा आणि वाश्याचा नरकवास संपला आहे कां ?' - एका म्हाताऱ्या आत्म्यानं चौकशी केली.

' तुम्ही कशाला करताय् चांभार - चौकशा? ' अधिकारी.

' काय म्हणालात? चांभार - चौकशा? मला जातिवरून शिव्या देताय? मी जाती-संरक्षण आयोगाकडं तक्रार करीन'

' चुकलो ! माफ करा ! '

नंतर सहाय्यकाकडं वळून अधिकारी म्हणाला - ' च्यायला, नरकात आयोग फियोग आल्या पासून खूप वांधे झालेत. जो तो उठतो, आणि आयोगाची धमकी देतो ..... चल, त्यांना शोधुया. त्या तिघांना पृथ्वीवर पाठवण्याच्या आधी, अंघोळ वगैरे घालून, ब्रह्मदेवासमोर उभं केलं पाहिजे '

नरकाचा अधिकारी आणि दोन सहाय्यक, तीनही आत्म्यांना शोधत, एका पडक्या इमारतीत घुसले. इकडे - तिकडे शोधल्यावर वासू एका कोपऱ्यात जप करत बसलेला दिसला. पण लहान मुलांचे आत्मे कुठे सापडले नाहीत. वासूला चिमटीत पकडून सहाय्यक, अधिकाऱ्याजवळ आला. अधिकाऱ्यानं आज्ञा दिली -

' वाशाला आंघोळ, कपडे घालून ब्रह्मदेवा समोर पेश करण्यासाठी तयार कर' अधिकारी.

' सर वाश्या काय म्हणताय? पवित्र आत्मा आहे. वासुदेवराव तरी म्हणा' - सहाय्यक.

' वासुदेवराव म्हणायला तो माझा काका-मामा नाहीय्ये ' सांगितलं नेवढं कर.

सहाय्यकानं मान तुकवून वासूची मानगुट पकडली. त्या पकडीतून सुटण्याची धडपण करण्यात अर्थच नव्हता. तरीपण एक प्रयत्न करावा असा विचार करून वासू म्हणाला -

' महाशय, मी रोज अंघोळ करुनच जपाला बसतो. आजही तसाच बसलो होतो. आता पुन्हा आंघोळ नळाचं पाणी गेलं असेल तर कठीणच आहे ! ' वासू

' ए ड, चुप पृथ्वीवरल्या तुमच्या देशात पाण्याची चणचण भासत असेल. नळावर बायका एकमेकींची डोकी फोडत असतील, पण आमच्या इथं, पाण्याचा अजिबात तुटवडा नाही. चुटकी वाजवली की पाणी ! मुकाट्यानं माझ्या मागं ये ! '

नरकातून बाहेर पडल्यावर राजा-राणी आणि वासूला पाण्याची दोन कुंडं दिसली. एक गरम पाण्याचं, आणि दुसरं थंड पाण्याचं. सहाय्यकाच्या चिमटीतून सुटून वासूनं गरम पाण्याच्या कुंडात उडी मारली. अधिकारी आणि सहाय्यक खदाखदा हसत सुटले. सहाय्यक म्हणाला -

' च्यायला, याला ब्रह्मदेवा समोर पेश व्हायची आणि पृथ्वीवर पुन्हा जन्म घेण्याची फार घाई झालेली दिसतीय्!'

' घाई होणं सहाजिक आहे. पृथ्वीवरल्या देशात अलिकडं इतके नवे नवे शोध आणि सुधारणा होत आहेत की सगळ्या जीवांची, मानव जातीत जन्म मिळावा म्हणून धडपड चाललेली असते. कुणालाही मुंगी, डुक्कर, घोडा, गाढव, खेचर जातीत जन्म घेण्याची तयारी नाही.' अधिकाऱ्यानं हसत हसत मत प्रकट केलं.

' पण सर, मला वाटतं त्या पोट्यांना पृथ्वीवर झालेल्या सुधारणांचं काहीच कौतुक वाटत नसावं ' - सेवक

' म्हणतात ना 'अति परिचयात् अवज्ञा' आय्.सी.बी.एम. मिसाईल्स फ़लबाज्या सारखी आकाशात उडवतात, जगभरातले लोक टाळ्या वाजवतात !' अधिकारी.

' ते आपल्याला काही कळत नाही !' सेवक

' तुझी रास कोणती? ' अधिकारी

' वृषभ !' सेवक

' मग बरोबर आहे बैल बुध्दिचाच आहेस. आता मला प्रश्न विचारु नकोस!' - अधिकारी

' सर, आणखी एकच प्रश्न विचारतो. पृथ्वीवर जाऊन, दिल्लीच्या राजकारणात घुसपेठ करून, श्रीमान के. जरीवाला ऐवजी आपणच दिल्लीचं तख्त बळकावलं तर !' सेवक

' छे छे अरे , दिल्लीची गादी मिळवायला आणि राखायला किती कोलांट्या उड्या माराव्या लागतील. ते काम अडीच फ़ट्या जरीवालाच करू जाणे. तू आता प्रश्न विचारत बसू नकोस ! ' अधिकारी.

' सर, एकच आणि शेवटलाप्रश्न विचारतो. सर, तुम्हाला काय वाटतं, नॅशनल हॅरॉल्ड केस मधे अडकलेले माता-पुत्र निर्दोष सुटतील !' सेवक

' नुसते सुटतील नाही, बुळ्क्कन बाहेर पडतील - लोण्यातल्या पावट्या सारखे, आणि पुन्हा राजकीय क्षेत्रात मिरवतील. तू पुढं बोलूच नकोस. वासुदेवरावांना आणि पोट्यांना ब्रह्मदेवा समोर पेश करण्याची वेळ टळली तर त्यांना वेटिंग लिस्ट मधे खितपत पडावं लागेल !' अधिकारी.

सेवकानं तिघांना गरम पाण्याच्या कुंडातून बाहेर काढलं. त्यांच्या कमरेला इंपोर्टेड खादीचं कापड गुंडाळल आणि ब्रह्मलोकात जाऊन ब्रह्मदेवासमोर उभं केलं. जीवात्म्यांच्या पाप-पुण्याचा ताळबंद घेऊन श्री. चित्रगुप्त उभे होते. ब्रह्मदेवांनी चित्रगुप्तांना विचारलं - ' गुप्ताजी, या तीनही जिवांच्या पाप-पुण्याचा ताळेबंद काय दर्शवितो आहे? !'

चित्रगुप्त - (चोपडीची पानं मागं-पुढं उलटून) देवा, वासुदेवरावांच्या खात्यात बरीच गडबड झालेली दिसतीय?

ब्रह्मदेव - गडबड म्हणजे नक्की काय झालंय ?

चित्रगुप्त - म्हणजे ... म्हणजे... सेवाभावी कामं पापाच्या खात्यात, आणि उघड उघड भ्रष्टाचाराची प्रकरणं पुण्याच्या खात्यात जमा झाली आहेत.

ब्रह्मदेव - ''काय ? असा घोटाळा करणारा कोणार्क... आय मीन, कोण क्लार्क आहे ? त्याचं नांव सांगा. आत्ताच्या आत्ता डिसमिस् करुया त्याला.''

चित्रगुप्त - नाव ... लिपिक .... क्लार्क.... म्हणजे ....

ब्रह्मदेव - त... त... प... प...काय करताय. स्पष्टपणे सांगा काय नाव आहे -

चित्रगुप्त - क्षमा भगवन् हिशेबनीस रजेवर होता म्हणून त्या दिवशी मीच हिशेब लिहीत होतो. क्षणभर डुलकी लागली आणि ....

ब्रह्मदेव -क्षणभर डुलकी लागली ? डुलकीला क्षमा नाही. तुम्हाला शिक्षा भोगावीच लागेल. तुम्हाला पृथ्वीवर अंशावतार घ्यावाच लागेल.

चित्रगुप्त - पण देवा, यावेळी मात्र माझ्या माथी मडकी भाजणं, टाळ कुटणं, शेले विणणं यासारखी फालतू कामं लावू नका.

ब्रह्मदेव - ठीक आहे, पुढच्या आत्म्याला सादर करा.

चित्रगुप्त - (वासुदेवरावांना पुढं ढकलून) देवा, हे वासुदेवराव. त्यांनी नाम-जप केल्यामुळं त्यांची पुण्याची बाजू किंचीत वरचढ झाली आहे.

ब्रह्मदेव - अरे व्वा ! म्हणजे वासुदेवरावाना पुण्याच्या सदाशिव पेठेतच पाठवलं पाहिजे. तुमचं मत काय आहे?

चित्रगुप्त - माझं मत काय असणार? मला वाटतं पुण्य आणि पुणे या दोन शब्दात घोटाळा होतोय. आपण वासुदेवरावांनाच विचारावं.

ब्रह्मदेव - गुड सजेशन ! वासुदेवराव तुम्हाला पुढचा जन्म कोणत्या देशात, कोणत्या कुळात व्हावा अशी इच्छा आहे?

वासु - देवा, आपल्याला सपूर्ण सृष्टीची माहिती आहे. पण विचारता आहात म्हणून सांगतो. मोदींचं राज्य आल्यापासून भारतात प्रशासन आणि कायदा सुव्यवस्था चांगली आहे. अर्थात ......

ब्रह्मदेव - अर्थात, मला अर्थ सांगू नका. तुमची इच्छा व्यक्त करा.

वासु - माझ्यावर चांगले संस्कार करील अशा कोणत्याही स्त्रीच्या पोटी मला जन्माला घाला. देवा, किंचीत खाली डोकावून बघा. एका खेड्यात फर निवडणूका चालू आहेत. स्त्रियांच्या रांगेत एक गर्भारशी स्त्री उभी आहे. तिच्या पोटात कळा येऊ लागलेल्या आहेत, मी जाऊ का?

ब्रह्मदेव - पळा लवकर. शुभास्ते पंथान: ।।

वासु एकाएकी दिसेनासा झाला. चित्रगुप्तानं हसत हसत, त्याच्या समोरची पाप-पुण्याची बाडं गुंडाळायला सुरुवात केली. ब्रह्मदेवानं चित्रगुप्ताला फटकारलं-

ब्रह्मदेव - चित्रगुप्तजी, व्हॉट इज धिस् ! माझ्यापुढं सादर होणाऱ्या आत्म्यांच्या यादीत दोन कोवळ्या मुलांची नावं आहेत. त्या दोघांच्या पाप-पुण्याची शहानिशा आणि निवाडा केल्याशिवायच तुम्ही पाप-पुण्याची बाडं गुंडाळून ठेवलीत?

चित्रगुप्त - देवा, क्षमा असावी. कोवळे जीव ते. त्याच्याकडून पाप-पुण्याचा गफला तो काय होणार? आज ना उद्या त्यांची केस आपल्यापुढं मांडली जाईलच. ते दोघं आज खेळत-खेळत कुठंतरी दिसेनासे झालेत. म्हणून ...

ब्रह्मदेव - तुमच्या दूरदृष्टीनं निसर्गातले अनेक चमत्कार 'स्कॅन' केले आहेत आणि एक पोट्टा आणि पोट्टी दिसत नाही याचा अर्थ काय? तुम्हाला एवढा संकोच का वाटतोय?

चित्रगुप्त - मी या कोर्टाची मर्यादा लक्षात घेऊन नेहमी बोलतो. पण आपली आज्ञा असेल तर मी सांगतो की तो मुलगा आणि मुलगी एकमेकांच्या लिंगातला फरक तपासत आहेत.

ब्रह्मदेव - (किंचाळून) काय? कोवळ्या वयात हे चाळे? चालणार नाहीत !

चित्रगुप्त - दया.... देवा दया......

ब्रह्मदेवाच्या मागे दंड धरुन उभा असलेला दंडधारी म्हणाला -

दंडधारी - चित्रगुप्तजी, सोआयडी मालिकेतला इन्स्पेक्टर दया सुद्धा असल्या गुप्त चाळ्यांना उघड उघड दया दाखवणार नाही.

चित्रगुप्त आणि ब्रह्मदेव दिलखुलास हसू लागतात. हसू विरल्यावर चित्रगुप्तानं ब्रह्मदेवाला विचारलं - देवा आता काय करायचं ते आपणच ठरवावं.

ब्रह्मदेव - (क्षणभर विचार करुन) हं ... ! भारतात, कोल्हापूर जिल्ह्यात, चांगलवाडी नावाचं एक खेडं आहे. त्या खेड्यात वाघू आणि राघू नावाने दोन प्रगत शेतकरी आहेत. दोघांची मिळून दोन-तीनशे एकर बागायत जमिन आणि डोंगराच्या उतारावर पाच-सहाशे सागवानाची झाडं आहेत. वाघूदादांना दोन मुलगे आणि राघूदादांना दोन मुली आहेत.

चित्रगुप्त - देवा, मी वाघूदादांचा तिसरा मुलगा म्हणून जन्म घेऊ का?

ब्रह्मदेव - नको. तुमच्यासाठी साताऱ्याच्या कलेक्टर कचेरीत काम करणारा एक खडूस क्लार्क आणि त्याची सगळ्यांवर प्रेम करणारी सुशील पत्नी यांची आधीच योजना करुन ठेवली आहे. डॉक्टरी पूर्ण करुन तुम्हाला चांगलवाडीचा उद्धार करायचा आहे.'

चित्रगुप्त - जशी आपली आज्ञा (चेहऱ्यावर नाराजी)

ब्रह्मदेव - असे नाराज होऊ नका. तुमच्यावर मुलासारखं प्रेम करणाऱ्या एका स्त्री-पात्राची-गोदाक्काची पण योजना केली आहे. वाघूदादांची ही बालविधवा, चाळिशी उलटलेली बहीण, तुम्हाला वेळावेळी मदत करेल.

चित्रगुप्त - आभारी आहे देवा .... घंटा वाजली आहे. आजचं काम संपवूया.

(दृश्य हळूहळू विरत जातं)

**महाराष्ट्रातलं, कोल्हापूर जिल्ह्यातलं, चांगलवाडी हे खेडं.**

त्या मतदारसंघातला आधीचा विजयी उमेदवार वारल्यामुळं पुन्हा निवडणूक जाहीर झाली होती. प्रचाराचा धुरळा खाली बसला होता आणि मतदान सुरुं होऊन एक तास उलटला होता. पोटातला गोळा सांभाळत रखमा - वाघू दादांची पत्नी - मतदानाच्या रांगेत उभी होती. मतदान अचानक थांबलं. रखमा कळवळून पोलिसाला म्हणाली -

' दादा, मला वाइच म्होरं जाऊ देता कां ? पोटात कळा येऊ लागल्या हैती !' रखमा

' पोटातलं गाठोडं सांभाळत मतदानाच्या रांगत उभं राहण्याचं आवतण दिल व्हतं का म्या? गुमान उभी ऱ्हा व्होटिंग मशीन खराब झालय् कंचबी बटन दाबलं तरी मत कमळाच्या खात्यात जमा व्हतंय अशी कंपलेंट आलिया. त्याची तपासणी चालू हाय. वाईच दम धर !' - पोलीस

' दम धरनं माज्या हातात हाय का? पोरगं फटकन भाईर आलं तर !' - रखमा.

' तर पोराला पाठीवर बांध आन् पळ घरला !' - पोलीस.

' कुनालाबी राजकीय पक्ष काढायला परमिट दिल्यावर असा गोंधळ माजणारच! सतराशे साठ पक्ष, आन् त्याच्या दुप्पट उमेदवार! गोंधळाला सीमाच ऱ्हायली न्हाई !' रखमान आपलं मत मांडलं. नंतर पुरुषांच्या रांगेत उभा राहिलेल्या नवऱ्याकडं बघून पुन्हा कळवळत म्हणाली - ' धनी, काय तरी करा पटकन् !' वाघू म्हणाला - ' या बायकांच काई कळतच न्हाई, आधी म्हनायचं जरा सावकाशीनं करा. अगदी टोकाशी आल की म्हनायचं पटकन् उरका !'

पुरुषांच्या आणि बायकांच्या रांगेत किंचित खसखस पिकली. वाघू पुढं म्हणाला - ' तिच्या मायला, घरनं निघतांना बायडीनं धोसरा लावलावता लवकर चला. हितं आलो तर पोरगं दम खाईना, बोंबला !'

वाघूनं आणि राघूनं रखमाला आधार देऊन पोलिंग बूथच्या बाहेर आणलं. अंगणात ॲम्ब्यूलन्स उभीच होती. पेशंट आलेला बघून नर्स आणि ड्रायव्हर कामाला लागले. नर्सनं रखमाला आतल्या स्ट्रेचरवर झोपवलं. दोघांना उद्देशून नर्स म्हणाली - ' तुम्ही दोघं मागून रिक्शानं या !'

' अवो, वाटंत काई मदत लागली तर ? ' - वाघू

' तर आम्ही बघून घेऊ !' नर्स.

' घ्या ! बघून घेण्याची हौस भागली नाही अजून? ' पांच-दहा बाळंतपनं पाहीली असतील की तुमी !' वाघू

' त्यात बघायचंय् काय? एक भोसकं आणि एक डोसकं !' ' ... आणि आमच्यावर विश्वास नसेल तर डॅश बोर्डवर उभे रहा !' नर्स

ड्रायव्हरनं ॲम्ब्युलन्स सुरु केली. नर्सनं दरवाजा लावून घेतला. वाघू आणि राघू डॅश बोर्डवर उभे राहिले. का ड कू असा आवाज करत ॲम्ब्यूलन्स पळू लागली. वाघूनं विचारलं -

' राघू डड, रुग्णवाहिकेचा असला आवाज कदी ऐकला नव्हता !' -वाघू

' दादा, ह्यो डायव्हर चतरा हाय. बाप्याला पोचवायचं असंल तर मामा असा आवाज काढतुया आन् बाई मानसाला पोचवायचं असल तर ' काकू ड' असा आवाज काढतुया !'

हे बोलणं चालू होतं तेवढ्यात ॲम्ब्यूलन्स एका डेरेदार वडाच्या झाडाखाली थांबली. दोघं डॅश बोर्डवरुन पटकन खाली उतरले. ॲम्ब्यूलन्सच्या भोवती दोन चकरा मारल्या. नुसती खुस्फ़स् ऐकू येत होती. क्षणभरानं ॲम्ब्युलन्सचं मागचं दार उघडलं गेलं. कोवळ्या पोराला दुपट्यात गुंडाळून नर्स समोर आली आणि म्हणाली -

' वाघूदादा, अभिनंदन ! तुम्हाला मुलगा झालाय. आईंची तब्येत पण चांगली आहे ' - नर्स.

' आरं तिच्या मायला ! ' तिसऱ्यांदा पन् पोरगंच?' दोन भावस्नी ओवाळणी घालन्यासाठी येक भैन असावी म्हणून चानस घेतला. पन तिसऱ्यांदाबी मुसदंडाच नशिबी आला.' - वाघू

' दादा, अवो चांगल जालं. माज्या तिसऱ्या मुलीची सोय जाली !' राघू

' ए, तुला तिसरी मुलगी कवा जाली !' - वाघू

' झाली न्हाई, व्हनार हाय. तपासणीत तसंच उघड झालंय !'

दोघात सुरु असलेला संवाद ऐकून नर्स म्हणाली -

'दादा, बोलत बसू नका. चला, मी तुम्हाला घरी पोहचवते. बाळ - बाळंतिणीला न्हाऊ - माखू घातलं पाहिजे'

' ते समदं करा हास्पिटल मधे. आन् आमच्या दोगांची नसबंदी बी करुन टाका. रघ्या तुजी तयारी हाय नव्ह?' - वाघू

' तयारी म्हंजी -- म्या बायडीला इचारलं, ती म्हनाली फ़डच्या खेपेला मुलगा जाला तर -- ? - राघू

' आरं बाबा, ' नशिबात वाट्याच लिवल्या असल्या तर तांब्याची आस धरू नये ' असं तुकाराम म्हाराजानींच लिवून ठिवलया' - वाघू

' कुट लिवलया? वाचल्याचं आठवत न्हाई !' - राघू

' तुझ्या माज्या कपाळावर लिवलंया. आरशात बघून वाच ! मॅडम, ॲम्ब्यूलन्स वळवा हॉस्पिटलकडं, आन् आमच्या दोघांची नसबंदी करुन टाका' - वाघू

' अहो पण दोघांची नसबंदी, बाळंतपणाचा खर्च, ॲम्ब्यूलन्सच भाडं, औषधपाण्याच बिल, डॉक्टरांची फी, खूप खर्च करावा लागेल !' -नर्स

' अहो,आज-काल सगळीकडं बोंबाबोंब चालू हाय ना ' पी टी एम करो तर, करो !'

घराकडं आणि मुलांकडं लक्ष देण्यासाठी साताऱ्याहून वाघूच्या थोरल्या बहिणीला बोलावून घेतलं होतं. तिचं नाव गोदाक्का - वाघूच्या आणि गोदाक्काच्या वयात आठ-दहा वर्षाचं अंतर होतं. तसंच अंतर होत दोघांच्या स्वभावात. वाघू गोड- गोड बोलून कामं करुन घेण्यात पटाईत होता. तर गोदाक्का ' बाप दाखव नाहीतर श्राध्द कर ' इतकं रोख ठोक बोलून तिला हवं तसे करुन घेण्यात तरबेज होती.

बघता बघता पंधरा दिवस उलटले. बाळंतिणीला शेक देण्यासाठी गोदाक्कानं गोवऱ्या / निखाऱ्यानं भरलेलं घमेलं बाजेखाली सरकवलं, पाळण्यातून तान्ह्या मुलाला काढून घेतलं. बाळाच्या चेहऱ्यावर हसू उमटलेलं बघून

आक्काला प्रेमाचं भरतं आलं. बाळाचा चेहरा समोर धरून आक्का म्हणाली - ' अरे चोरा, आत्याकडून अंघुळ करून घ्यायला बरं वाटतय् व्हय !' असंच हसत राहा रे माज्या सोनुल्या'

त्याचवेळी वाघूनं बाळंतिणीच्या खोलीत प्रवेश केला. समोरचं दृष्य बघून वाघू म्हणाला - ' अगं आक्का, तुजा त्यो सोनुल्या, तुझं भादरलेलं टाळकं बघून हसतुया ' - वाघू

गोदाक्कानं एक जळजळीत कटाक्ष वाघूकडं टाकला. ते बघून रखमा म्हणाली, ' अवो, जुन्या गोष्टी उकरुन वन्संच्या जिवाला डागण्या कां देताय?'

' म्या डागण्या देतोय? आक्काकडं बघून आमच्या जिवाला डागण्या लागल्यात त्याचं काय? ' - वाघू

' डोस्क माजं, आन डागण्या तुला खुपत्यात व्हय रे मुडद्या? आक्का

' भाऊजी वारलं त्याला किती वर्स जाली, पंधरा, वीस वर्स? तरी त्यांची आठवण काढून, डोस्क भादरुन घ्यायचं काई कारन हाय कां. कर्वे बाबानी समाजाला लई समजावलं. तरी या भोळसट बायकांवर त्याचा काडीचा परिणाम न्हाई !!' - वाघू

' म्या वंगाळ काय करतीया रं ड? चार पैसं कमवून तुझ्या संसारालाच हातभार लावतियाना म्या?' - गोदाक्का

' तू कमावलेला पैका, म्या खाऊन - पिऊन उडवतुया असं वाटतय का तुला?' .. तू दिलेल्या पैशातून डोंगराच्या उतारावर सागवानाची शंभर-दीडशे झाडं आन् दोन बिघे जिमीन खरेदी केलीय्. सात-बाराच्या उताऱ्यात तुझं आन् महिपतीचं नाव लावलंया. तू अचानक मेलीस तर.... - वाघू

' अवो, गप्प बसा की ! सकाळच्या पारी मरणाच्या गोष्टी कशाला करताय?' रखमा

' रखमे,बोलू दे त्याला. तुला सांगते, माजं लगीन जालं त्या टायमाला वाघू सात-आठ वर्साचा व्हता. आमच्या दोगावरचं आई-बापाचं छत्र आधीच उडालं व्हतं. तवापास्नं वाघूला पोरासारखं वाढवलं. पन् वाघूचं नशीबच चांगलं. हात लावील त्याच सोनं व्हायचं. त्या नशिबाला जोड मिळाली. राघू सारक्या दोस्ताची. दोगांनी मिळून दोघांचे चौसोपी वाडे, दोन - तीनशे एकर बागाईत जमीन, डोंगराच्या उतारावर हजार-बाराशे सागवानाची झाडं एवढी मालमत्ता कमावली. आपल्यासारख्याला आनखी काय पायजे !' गोदाक्का.

हे बोलतां बोलतां गोदाक्काच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळू लागले. क्षणभरानं 'गोदाक्का ऽऽऽ, वाघू दादाऽऽऽ ' अशा हाका ऐकू आल्या. ' या टायमाला कोन आलं ' असं बडबडत वाघू अंगणात आला. समोर एक नवी करकरीत मारुती कार आणि शेजारी पांढरा शुभ्र सफारी सूट घातलेला २७-२८ वर्षाचा उमदा तरूण उभा होता. त्याला बघून वाघूनं प्रश्नांची सरबत्तीच सुरु केली.

' कोण तुमी? कुठून आलात? काय काम व्हतं? आक्काला कसं वळखता?' वाघू.

' सांगतो, सांगतो !' मी डॉक्टर पाचपोर. साताऱ्याहून आलोय. गोदाक्कांना घेऊन जाण्यासाठी आलोय' - डॉ. पाचपोर

' अरं व्वा ! गोदाक्का म्हंजी साकरेचं ठिकं हाय का, उचललं, आन डिकीत टाकून घिऊन गेलं?' - वाघू

' माझ्या बायकोला खूप त्रास होतोय हो ! पोट धरून, पहाटे पासून विव्हळतीय !'

' अवो मंग गोदाक्का काय करनार? तुमी डॉक्टर हाय नव्ह? मंग ठोकाकी एक सुई !' - वाघू

' पण मी गुरांचा डॉक्टर आहे ' - पाचपोर

त्याचवेळी गोदाक्का बाहेर आली आणि विचारलं - ' डॉक्टरबाबू, अचानक येणं केलं ?'

' तुम्हाला घेऊन जाण्यासाठीच आलोय ' - डॉक्टर.

' का वो? सुमती बरी हाय नव्हं ? ' - गोदाक्का.

' तेच सांगायला आलोय्. गुरूवारी बोरगावला गुरांचा बाजार भरतो. गुरं तपासून सर्टिफिकेट द्यावं लागतं. म्हणून सकाळीच बोरगावला गेलो होतो. सुमतीच्या मैत्रिणींनी ती संधी साधली. सुमतीचं डोहाळ जेवण करण्याचा घाट घातला. पावभाजी, कांद्याची भजी, मेदुवडा, पुलाव, कोका कोला, नको ते जिन्नस हॉटेलातून आणून सुमतीला खायला घातले. आता बसलीय पोट धरून. तुम्हाला शोधत सातारला देशपांड्यांच्या वाड्यात गेलो. तिथं कळलं तुमी माहेरी गेलायत. म्हणून इकडं आलो.' - डॉ. पाचपोर.

' हं ऽ! वाघू, माज्या खोलीत औषधाचा बटवा हाय त्यो घिऊन ये बरं '

'म्हंजी तू डॉक्टर सायबा बरुबर साताऱ्याला जानार? घरचं काम सोडून?'

' आरंऽ डॉक्टर बाबू उद्या दीस मावळायच्या आत मला परत आणून सोडत्याल !' - गोदाक्का

' डॉक्टर बाबू, आक्का म्हनतीया म्हणून तिला जाऊ देतुया. पन् काम संपल्यावर तिला परत आणून सोडाय.ची जिम्मेदारी तुमची. वाइच थांबा. बटवा आनून देतो !' - वाघू

आक्काची रवानगी करून, हुश्श करत वाघू पत्नीच्या खोलीत आला. रखमानं त्याला हटकलं -

' कावोड शेवटाला आक्कासांना पाठवलंत ना त्या पाचपोरासंग?'

' तू ऐकलस वाटतं आमचं बोलनं?' - वाघू

' मीच काय, भाळावरच्या कैकाड्याला पन ऐकू गेलं असेल तुमचं बोलनं. माजं बोलनं ऐकून ठिवा. पाचपोराची बायकू, तिचं मूल चार मैन्याचं हुईपोत्तर आक्काला सोडनार न्हाई ' रखमा.

' सोडनार कशी न्हाई? उद्या दीस बुडेपोत्तर आक्का परत आली न्हाई तर परवा म्या स्वोता जाऊन तिला घिऊन येईन ! ' - वाघू

' निसत्या फ़शारक्या. नसबंदी केल्यापासनं मळ्यात पन् गेला न्हाईत, आन् साताऱ्याला जान्याच्या बाता करताय !' - रखमा

' अगं गप्प ! पोरं-बाळं ऐकत्याल' वाघू

' नसबंदी म्हंजी काय ते पोरास्नी ठाव न्हाई असा समज हाय तुमचा?' आपला थोरला मुलगा, धाकल्या मुलास्नी उताणं पाडून त्यांच्या चड्या कापत व्हता. म्या इचारलं आरं काय करतुयास? तर म्हनाला समद्यांची नसबंदी करुन टाकतो !' - रखमा

' आरंड त्याच्या आयचं बेणं !' म्हाद्या, समोर ये मुड्या ! म्या सांगतो तुला ---' वाघू

' महादेवाला आपुन डॉक्टरी शिकवूं. म्हंजी त्यो सांगल नसबंदी म्हंजी नक्की काय !' रखमा

' महादेव, डॉक्टरी शिकनार? त्यो आत्ता पास्नं मिलीटरीत किंवा पोलिसात जाण्याचं घोकतोय् !' - वाघू

''त्ये राहू द्या. अंधार पडलाय ! गाई-म्हशींना चारा-पानी द्या, धार काढा.''

''का? नाम्यानं दांडी मारली का काय?''

''त्याच्या पोरीला बघायला डोंगरापल्याडल्या गावातील पावनी येनार हैत.'' वाघूच्या बायकोनं माहिती पुरवली. वाघू कुरकुरत गोठ्याकडे वळला.

मध्यंतरी एक दिवस उलटला. डॉ.पाचपोर गोदाक्काला तिच्या सामानासकट घेऊन आले. वाघूनं डॉ.पाचपोरांना विचारलं - डॉक्टरीन बाई ठीक-ठाक हायेत ना?'' वाघू

''गोदाक्काना बघितल्याबरोबर बायको नॉर्मल होणार याबद्दल खात्री होती मला. वाघू दादा, आक्काना माझ्याबरोबर पाठवलंत त्याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद! येतो मी''. डॉ.पाचपोर.

डॉ.पाचपोर गेल्यावर वाघू त्याच्या बायकोच्या खोलीत गेला. रखमानं त्याला हटकलं

''अवो, वाइच इकडं या'' रखमा

''आता काय झालं? घटकाभर टेकीन म्हनलं तर तुमचं चालूच हाय, इकडं या, तिकडं जा, बोल'' वाघू

'बोल काय? आपल्या घरात गडबड चालू व्हती म्हणून जिवा-भावाच्या मैतराला विसरायचं? म्या राघू भावजीबद्दल बोलतिया'' रखमा.

''आरं ए ... इसरलो खरा. आत्ता जाऊन येतो.'' वाघू.

पायात चपला सरकवून वाघू बाहेर पडला. वाघूच्या बंगल्यापासून पांच मिनीटाच्या अंतरावर, खालच्या गल्लीत, राघूचा बंगला होता. दार उघडच होतं. वाघूनं अंगणातूनच हाका मारायला सुरुवात केली. राघूची सर्वात मोठी मुलगी, वय पंधरा-सोळा, परकराला हात पुसत बाहेर आली. वाघूला बघ्न तिनं पटकन ओढणी डोक्यावरनं घेऊन केस झाकून टाकले आणि म्हणाली ''वाइच टेका की. मी चहा आणते.''

''माझं नाश्ता-चहापाणी झालंय, राघू कुठाय?''

आक्कासाच्या पाया पडायला येणार होते बाबा, आन् नंतर मळ्यात जाणार होते. तुमच्या घरी आले नाहीत बाबा?''

''अगं, त्यो घरी आला असता, तर म्या कशाला कडमडत इकडं आलु असतो.... ठीक हाय. म्या बी मळ्यात चक्कर मारतो. तिथं भेटलच राघू !'' वाघू.

वाघू निघून गेल्यावर राघूच्या बायकोनं मुलीला हटकलं -

''कोन आलवतं गं गंगे?''

''बाबांचे मित्र, गोदाक्कांचे धाकले भाऊ आलेवते'' गंगा

''कार्टे, तुजे होनारे सासरे हायेत त्ये ! त्यास्नी काही चा-पानी इचारलंस का नाही?''

''विचारलं. नको म्हनाले. आई तू, बाबा घोकताय की ते माझे सासरे आहेत. पण त्यांचा मुलगा समोरुन आला तर दुसरीकडे मान फिरवून निघून जातो. मग मी तरी त्याला भाव का देऊ? आई, सोड ना तो विषय. आपणच कशाला त्रास करुन घ्यायचा?'' गंगा

''चांडाळणी, तुज्या बा समोर असं काही बोलू नगंस. तुला अन् मलाबी उभं चिरुन टाकतील.'' आई.

''काही चिरुन बिरुन टाकणार नाहीत. तुला तिसरीपण मुलगी होणार हे कळल्यावर बाबा काय म्हणाले ठाऊक आहे? ... म्हणाले 'तिसरी मुलगी तर मुलगी ! माज्या तीन मुली म्हंजी सा हाताची लक्ष्मीची मूरतच हाय'' गंगा.

''तू अन् तुजा बा, ऐकनार हायेत का? आमची फरफट काई टळणार न्हाई

''काही फरफट होणार नाही. वाघूकाका आणि माझे बाबा समदं मार्गावर आणतील, बघच तूं'' गंगा.

''तुज्या तोंडात साकर पडो'' राघूच्या बायकोनं सदिच्छा व्यक्त केली.

वाघू मळ्यात पोहोचला. राघू कुठे दिसेना, वाघूनं हाक मारली ''राघू ऽऽ ए राघूऽऽऽहो'' प्रतिसाद नाही. वाघूनं जोरात हाका मारल्या ''राघू.... राघू ... आरं मर्दा कुटं हैस? आ का देत न्हाईस? रागावला असलास तर मला जोड्यानं मार ! पन .......''

त्या क्षणाला राघू धावत वाघूजवळ आला. हात जोडून म्हणाला ''दादा, काय बोलतासा ! तुमच्यावर राग धरला तर मला नरकातली जागा मिळणार न्हाई'' असं बोलून राघूनं वाघूसमोर हात जोडले. वाघूने त्याच्या खांद्यावर थोपटलं आणि म्हणाला,''तुजी खबरबात घेन्यासाठी तुझ्या बंगल्यावर गेलो होतो. तिथं कळलं तू मळ्यात गेला हायेस. म्हणून तुला शोधत इकडं आलो.'' वाघू.

''कुनी सांगितलं?''

''आमच्या सूनबाईंनी. एऽऽ पोरीवर रागावला हायेस?'' वाघू.

‘‘रांडेची चुरुचुरु बोलायला लागलीया. महादेवराव तिला भाव देत न्हाई म्हने ... लगीन लागायच्या आधीच हा तोरा ! लगीन झाल्यावर काय हुईल असं भ्या वाटायला लागलया मला’’ राघू.

‘‘आरं, पोरीबी शिकल्या हैत, समाजात वावरत्यात, चांगलं काय, वाईट काय कळायला लागलंय त्यास्नी !’’ वाघू.

‘‘म्हंजी, आय-बाप गाढव असत्यात म्हना की’’ राघू

‘‘व्हय ! आपून गाढव हावोत हे समजल्यावर तरी आपल्यात सुधारणा करायला हवी का नको? काळजी करु नकोस. म्या तुझ्या पोरीला सांगून टाकीन की तुला पसंत पडेल अशा कोनत्याबी पोराशी खुशाल लगीन कर’’ वाघू.

‘‘म्हंजी तुमी दिलेला शबद मोडणार?’’ राघू

‘‘आरं बाबा, पोरा-पोरीच्या भल्यासाठी शबदच काय, घरदार पन् मोडायची बी तयारी हाय माजी. पन् तशी वेळ येनारच नाही. आमच्या सुनबाई चांगल्या वळणाच्या हैत. मला समोर बघितल्यावर डोक्यावरनं पदर घिऊन केस झाकून टाकले.... त्ये समदं ऱ्हाऊ दे ... चल, मळ्यातनं, सागवानाच्या पारीतनं चक्कर मारु या.’’

दोघं गप्पा मारत, हसत हसत मळ्यातनं, सागवानाच्या पारीतून हिंडत राहिले.

चार दिवसानं गंगाला बरोबर घेऊन राघू वाघूच्या दारी आला. गंगानं, राघूनं गोदाच्या पायावर डोकं ठेवलं. गोदाक्कानं राघूला फटकारलं -

‘‘राघ्या, अक्काची इतक्या दिवसानंतर आठवन झाली व्हय रं मुडद्या? इतके दिवस कुठं उलथलावतास रंऽऽ?’’ गोदाक्का.

‘‘आक्का, कारभारनीला वाइच तरास होत व्हता’’ राघू.

‘‘तिची काळजी घ्यायला मैनी हुती, मला बोलवायचं हुतस. परक्या बायकांची गर्भारपणं सांबाळली, बाळंतपणं केली. तुज्या बायकोला वाऱ्यावर सोडली असती व्हय रं मुडद्या? कळली तुजी आन् वाघूची मैतरी ! ’’ गोदाक्का.

राघूनं गोदाक्काच्या पायावर पुन्हा लोळण घेतली आणि म्हणाला,

''आक्का, आमच्या मैतरीला बोल लावू नका. येका टायमाला म्या चुकन, पन् वाघूदादा मला आन् माज्या पोरींना वाऱ्यावर सोडनार नाहीत, खात्री हाय मला.'' राघू. ''ही तुजी सर्वात थोरली पोरगी ना? न्हाण आलं का तिला?'' गोदाक्का.

''पोरी, सांग ना आक्कासनी'' राघू

''आक्कासा, दीड वर्स झालं ! '' गंगानं लाजून सांगितलं.

''राघ्या, वाघूचा पोरगा आठरा वर्स पूर्ण झालाय. मिलोट्रीची पोलीस भरतीची परीक्षा दिलीय. बोलावनं ईल तवा जाईल. पन् मधल्या काळात तुज्या पोरीशी लगीन लावून द्यायला तू, तुजी बायको आन् गंगा तयार हाय कां त्ये कळलं पायजे ! '' गोदाक्का.

''अवो म्या आन् दादानी पंधरा वर्स आधीच ठरवलं व्हतं की आपापल्या पोरा-पोरीची लग्न आपापसात लावून द्यायची'' राघू.

''आरं..., वर्स-सा महिन्यात जग इकडचं तिकडं हुतया. पोरा-पोरींची मनं कवा बदलल्यास आपल्याला कळणार पन् न्हाई ! म्हनूनच आजच्या घडीला दोघांची पसंती घ्यायला हवी ! '' गोदाक्का.

''व्हय ! दोगात बरीच बाचाबाची झाली व्हती म्हने ! '' राघू.

''वाघू, तू कायबी बोलत न्हाईस?'' गोदाक्का

''अमेरिका आन् रशियात वाटाघाटी चालल्या आहेत. म्या मधेच काय बोलनार?'' वाघू.

तिथं जमलेली मंडळी हसत सुटली. त्याचवेळी महादेवनं त्या खोलीत प्रवेश केला. मोठी माणसं बोलत, हसत आहेत हे बघून महादेव परत फिरला. गोदाक्कानी त्याला आडवलं आणि म्हणाली,''ए पोरा, तुज्या लग्नाच्या वाटाघाटी चालल्या हैती, आन् तू माघारी कुटं निघालास? बस माझ्या जवळ...''

''आत्याअक्का, आमच्या आईबापानी आमची लग्नं लहानपणीच ठरवली आहेत. पोरीच्या हुंड्यापाई दोन्ही घरातली मालमत्ता, दोन्हो घरातच रहावे म्हणून. सुदैवानं राघूकाकांच्या मुली रुप-गुणानं चांगल्या निघाल्या आहेत. चार-सहा महिन्यानं, बोलावनं आलं की मी मिलीटरीत किंवा पोलीस दलात जाणार हे पक्कं आहे. राघू काकांना आणि गंगा मॅडमना हे मान्य असेल तर मी लग्नाला तयार आहे.'' आक्कांनी महादेवाच्या पाठीवर हलकी चापट मारली आणि

म्हणाली ''आरं मग साळंत जाता-येता त्या पोरीशी भांडत कशापाई करत व्हतास?'' ''आत्या, त्यामुळंच कळलं ना, एकमेकाचा स्वभाव, बोलचाल कशी हाय त्ये'' महादेव.

''गपा की. आक्कासायबासमोर कायच्या बाई बोलत सुटलाय'' गंगानं हलक्या आवाजात महादेवाला समज दिली. वाघू आणि राघूनी एकमेकाला मिठी मारुन आनंद व्यक्त केला. गोदाक्कानं वाघूला विचारलं -

''वाघू, पोराचं लगीन ठरलं. पावन्यांची, घरच्यांची तोंडं गोड कवा करनार?''

''त्याची वेवस्था आधीच करुन ठेवलीया. कारभारनीला फाटं फाटं सपान पडलवतं की, पोराचं लगीन ठरनार. म्हणून नवऱ्याला बाजारात पिटाळून पेढे मागवले होते. मालकीणबाई, काढा त्यो पुडा, आन् करा समद्यांची तोंडं गोड ! '' वाघूच्या बायकोनं फ्रिजमधून पेढ्याचा बॉक्स काढला आणि सगळ्यांना पेढे वाटले. सगळ्यांनी गंगा आणि महादेवाचं अभिनंदन केलं.

मध्यंतरी दोन-तीन दिवस गेले. वाघू आणि गोदाक्का, लग्नाची काय काय तयारी करायची, कुणा-कुणाला निमंत्रणं द्यायची, वरात काढायची का नाही वगैरे चर्चा करत बसले होते. तेवढ्यात ''वाघूदादा, वाघूदादा'' अशा हाका मारत दहा बारा वर्षाचा, गावातलाच एक मुलगा, अंगणात आला. वाघूदादा व्हरांड्यात आले आणि विचारलं,

''का रं मारत्या, बोंबलायला काय झालं?'' वाघू.

''दादा, डोंगराच्या उतारावरच्या तुमच्या सागवानाच्या झाडाला एका बाप्याला बांधून ठेवलंय. खूप मारझोड केलीया, कापडावर, हाता-पायावर रगताचे डाग हायेत....''

''आरं पन् कोन हाय त्यो, वळखलस का त्याला?''

''आपल्या गावातला न्हाई त्यो गडी'' मारुती.

''मंग माझ्याकडं यायच्या आधी पोलीस पाटलाला वर्दी द्यायची होतीस'' वाघू.

''पोलीस चौकीला भलं-मोट्टं टाळं लटकतंया. पोलीस पाटील गेलंत साताऱ्याला. आता तुमीच निस्तरा ही भानगड'' एवढं बोलून मारुती जाण्यासाठी वळला. वाघूनं त्याला थांबवलं आणि म्हणाला,''मारत्या, माझं एक काम कर. जाता-जाता राघूदादांना निरोप दे की वाघूदादांनी तुमास्नी मळ्यात बोलवलं हाय.''

''दादा, च्या-पान्यासाठी द्या काहीतरी?'' मारुती

''आरं, तुझ्या ...... ! उंडग्या सारखा गावभर फिरत असतोस आन्'' वाघू

''आन् तुमच्यासारक्या मालदार गावकऱ्यांची पडतील ती कामं बी करतो'' मारुती.

''आज सागवानाच्या झाडाकडं का फिरकला व्हतास?''

''डोंगरापल्याडच्या महारवाडीतल्या देवीच्या कट्टयावर झोपलो होतो. तिकड्न येताना .... ''

''कळलं ! '' वाघूनं खिशात हात घालून, हाताला लागतील तेवढे पैसे काढले. मारुतीच्या हातात टाकले आणि म्हणाला,''मारत्या, राघूला निरोप दे त्येवढा.''

वाघूदादाच्या पाया पडून मारुती, ''राघूदादा, थोरल्या दादांनी तुमास्नी अर्जंट मळ्यात बोलावलं हाय'' असं ओरडत निघून गेला.

वाघू आणि राघू दोघं मळ्यात आले. दोन झोपड्याच्या समोर उभं राहून हाका मारल्या ''भीम्या.... किशा....''

मुंडासं सावरत दोघं बाहेर आले. मालकांना समोर बघून भीम्यानं विचारलं,''राम राम मालक. या वक्ताला दोगंबी मळ्यात?''

''का र? आमच्या मळ्यात आमी कवा यायचं, कवा जायचं त्ये तुमी ठरवणार? ... त्ये ऱ्हाऊ दे. किशा, तू बैलगाडी तयार कर. गाडीत कडब्याच्या पेंड्या टाकून त्यावर घोंगडं पसर. तोवर आपल्या सागवानाच्या झाडाला कुणाला बांधून ठिवलं हाय त्याला सोडवून घिऊन येतो.'' वाघू.

''मालक, पन् म्या काल दुपारला, सागवानाच्या चाळीतून चक्कर मारली हुती म्या. तवा कुनी दिसलं ऱ्हाई.'' किशा

''आरं पन् मारत्याची खबर खोटी ठरनार ऱ्हाई.... लई चतरं हाय बेनं. गावभर हिंडत असतं दिन-रात, नारदावानी ! भीम्या, तू आमच्या संग चल. गडी भारी असला तर वर उचलून आणणं सोपं जाईल. ''

वाघू, राघू आणि भीम्या डोंगरावरच्या सागवानाच्या लागवडीजवळ पोहोचले. प्रत्येकानं एक-एक पारी तपासायची असं ठरलं. तिघं कामाला लागले. क्षणभरानं  भीम्याचा आवाज ऐकू आला ''मालक, अगदी वरच्या पारीतच एका पोराला बांधून ठेवलंय, लवकर या.''

वाघू आणि राघू भीम्याजवळ गेले. झाडाला बांधून ठेवलेल्या व्यक्तीला चहुबाजूनं निरखून बघितलं. वाघू म्हणाला ''अरारारा ! मारत्या म्हनाला त्ये खरंच हाय ... याचं डोस्कं फोडलंय, कापडावर जागोजागी रगताचे डाग हायेत, गोरा रंग हाय, म्हंजी जातीनं बामण असावा, कण्हतोय म्हंजी अजून जिता हाय, याला उतरवून माझ्या घरी घेऊन जाऊया.'' वाघू.

''दादा, पोलीस पाटलाला वर्दी दिल्याबिगर आपुन या भानगडीत दखल केली तर प्रकरण आपल्यावरच उलटंल.'' राघू.

आरं, मारत्या सांगत व्हता पोलीस चौकीला टाळं लटकतंय. पोलीस पाटील गेलंत साताऱ्याला. दोन-चार दिवस मौजमजा केल्याबिगर परतनार न्हाईत. आन् म्या जिम्मेदारी घेतोय ना? मंग घाबरु नकोस. भीम्या आन् म्या आमी दोगं या पोराला धरुन ठेवतो. तू त्याच्या दोऱ्या काप'' - वाघू.

''दादा, एक डाव पुन्यांदा इचार करा. याला दवा-दारु करायला आपल्याकडं काय बी न्हाई?'' - राघू.

''आरं, दगडीपाला, हळद, कातपूड, डेटाल हाय ना? मग झालं तर. चला भीम्या, त्या पोराला उतरवून खांद्यावर घे.'' - वाघू.

वाघूनं सांगितल्याप्रमाणं किशानं बैलगाडी तयार ठेवली होती. भीम्यानं त्या तरुणाला खांद्यावर घेतलं आणि जवळ जवळ धावत तिघं गाडोजवळ आले. तोपर्यंत ती बातमी जवळपासच्या खोपटात पसरली होती. किशा पटकन गाडीत चढला. भीम्यानं खांद्यावरलं ओझं बैलगाडीतल्या घोंगडीवर उतरवलं. वाघूनं किशाच्या मुलाला सांगितलं - ''संत्या, आपल्या मळ्यातल्या बांधावर, कुठं कुठं दगडी पाला उगवला असेल. दोन मुठीत मावल यवढा पाला घिऊन ये.'' वाघू.

''माज्या मुठीत का तुमच्या मुठीत?'' संत्या

''तुज्या आजाच्या मुठीत ! तू जातोस, का बापाचा दणका खायचा आहे?''

संत्या पळाला आणि दोन मुठीत मावेल एवढा पाला घेऊन आला. पाला वाघूच्या हातात देऊन म्हणाला,''काका, खोपटाच्या मागेच मिळाला पाला !'' पाला घेऊन वाघू म्हणाला,''राघू, चल. या पावन्याला माज्या घरी घेऊन जाऊया?''

''तुमच्या घरी? याची ना ओळख-पाळख. माणूस कसा हाय त्ये बी ठाऊक नाही.'' वाघूनं शंका व्यक्त केली.

''आरं बाबा, मानसानं मानसाला जवळ केलं न्हाई तर वळख तरी कशी व्हनार? ह्यो पावना शिकला सवरलेला दिसतोय. तरी बी बारा बोड्याचा निघाला तर देऊ हाकलून !'' वाघू.

तिथं जमलेल्या बायका, वाघूचं तर्कशास्त्र ऐकून, तोंडावर पदर घेऊन हसू लागल्या. वाघूनं त्यांनापण फटकारलं,''ए... तुम्हाला कामं न्हाईत का? दात इचकून हसत बसू नका. निघाऽऽऽऽ ! नंतर भीमाला म्हणाला,''तू गाडी घेऊन माज्या बंगल्यावर ये. आमी मधल्या वाटेनं जातो. पावन्याला उतरवून घेन्याची आन् आराम करन्याची वेवस्था कराया हवी.'' वाघू. ''व्हय जी'' असं म्हणून भीम्यानं बैलगाडी वळवली. वाघू, राघू आणि किशा मधल्या वाटेनं चालत बंगल्यात पोहोचले. तिघांनी बंगल्यातली एक खोली साफ करायला घेतली. किशानं त्या खोलीतला कचरा सामान बंगल्याच्या बाहेर नेऊन टाकले.

ती खोली गोदाक्काच्या खोलीला लागून होती. गडबड ऐकून गोदाक्कानं वाघूला हटकलं ''वाघू, कसली गडबड चालवली हाय रं तुमी?'' ''येक पावना येनार हाय. त्याच्यासाठी खोली साफ करतुया'' वाघू. ''तू जातीनं खोली साफसूक्र करतुयास. यवडा कोन तालेवार पावना येनार हाय?'' गोदाक्का.

''त्यो आल्यावर कळलंच की तुला ! '' वाघू.

''उडवा उडवी करु नगस ! आरं, तुमी कसं टेचात ऱ्हाया हवं. परोटघडीचं धोतर, कुडता त्यावर गळ्यात सोन्याचा जाडजूड गोफ.... ते सोडून जातीने साफसूक्र करताय?'' गोदा.

''आक्का, तू साताऱ्यात टी.व्ही.वर रोज मराठी सिनेमे बघत व्हतीस का? तू म्हनतीस तसे जमीनदार/शेतकरी शिनेमातच बघाया मिळतात. आमच्याकडं त्येवढा पैका जमला तर आमी साळेची इमारत बांधू, गावातल्या लोकांना दवा-दारु साठी तरफडत तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या गावी जावं लागतं. त्या परीस एकादा डॉक्टर आला तर त्याला दवाखाना काढून देवू'' वाघू.

त्याचवेळी भीम्यानं बैलगाडी वाघूच्या बंगल्यासमोर उभी केली आणि हाक मारलो ''मालक''.

वाघू आणि राघूनं भीम्याच्या मदतीनं त्या व्यक्तीला साफसुफ केलेल्या खोलीतल्या पलंगावर आणून झोपवलं. पाहुण्याचा चेहरा बघून गोदाक्कानं ऊर बडवून घेत गळा काढला - ''आरं देवा ! माझ्या लेकराला काय झालं? ... आता मी कुणाच्या तोंडाकडं बघू? शाम, लेकरा, इकडं कुठं कडमडलास रं?'' गोदाक्का.

''आक्का, तू वळखतीस या पोराला?'' वाघू.

''वळखती म्हंजे? म्या साताऱ्याला ज्या देशपांड्यांच्या वाड्यात रहात होते, त्यांचा एकुलता एक पोरगा ह्यो! डॉक्टरी शिकत व्हता. दीस बुडल्यावर खाकी अर्धी चड्डी, पांढरा शर्ट आन् दांडकं घेऊन पटांगणावर जायचा.''

''कशाला?'' वाघू.

''मला रं काय म्हाईत. पन् रातच्याला बाप-लेक समोरासमोर आले की दोगांचं कडाकडी भांडन व्हायाचं. 'तुजं आरेशेसचं वेड, माज्या नोकरीवर गदा आणनार ! ' पन शामनं त्याचा हट्ट सोडला नाही'' गोदा

त्याचवळी पाहुणा कोण आला ते पाहण्यासाठी वाघूचा दोन नंबरचा मुलगा विष्णूदेखील खोलीत आला आणि वाघूला विचारलं,''आबा, हा पाहुणा कोण आहे?'' विष्णू.

''तुझ्या गोदाक्काचा पुतन्या हाय'' वाघू.

''त्याला काय झालंय?'' विष्णू

''त्ये समदं नंतर सांगीन. तू तुज्या मायकडून डेटॉलची बाटली, कातपूड, बँडेज पट्टी आन् कापूस घेऊन ये पटकन.'' वाघू.

विष्णू पळतच बंगल्याच्या आतल्या भागात गेला. दरम्यान वाघूनं गोदाक्काला विचारलं,''आक्का, शामराव डॉक्टर झाला की न्हाई?''

''म्या कायमची इकडं आली त्याआधी फायनलची परीक्षा दिली व्हती. पास झाला असल, हुशार हाय पोरगा.'' गोदाक्का.

''आक्का तुझ्यापाठोपाठ येक डॉक्टर वाडीत आला. आता आपली वाडी नक्की सुधारनार ! '' वाघू.

''ए...., वांझोटी सपनं बघू नगंस ! गेल्या ईस वर्सात आपल्या वाडीत कनभर बी सुधारना झाली न्हाई'' आक्कानं आपलं स्पष्ट मत मांडलं.

''असं कसं म्हनतीस आक्का? तवाचा काळ वेगळा व्हता, मानसं येगळी व्हती. आपून या वाडीत आलो तवा शंभर उंबरे आन् अडीच हजार वस्ती व्हती. आता वस्ती झाली लाखाच्यावर ! ग्रामपंचायत, बाजार समिती, येका टोकापासून दुसऱ्या टोकापोत्तर डांबरी सडक, अकरावो पोत्तरची शाळा समदं झालंया. अशीच सुधारना व्होत ऱ्हानार. बघशीलच तू'' वाघू.

''व्हय. आमी निस्तं बघत ऱ्हायाचं. गेल्या साली सांगत व्हते की पंचायतीची निवडणूक लढव. ऐकलं न्हाईस. शिंदे पाटील पंचायतीचा सादा मेंबर हाय. पन् गावातनं कसा टेचात फिरतुया बघ !'' गोदाक्का

''आपुन कशाला पडायचं पंचायतीच्या राजकारनात? आपला मळा पिकवावा, घराला पुरंल यवढं धान्य-धुन्य ठिवावं, उरलेलं धान्य शेतकरी संघाला द्यावं किंवा खुल्या बाजारात विकावं. भानगड नको.'' वाघू.

''बरं बाबा, तू हुशार, म्या आडानी ! त्या पोरावर नीट लक्ष ठेव'' असं सांगून गोदाक्का तिच्या खोलीत गेली. वाघूनं भीम्याला आणि राघूला सांगितलं,

''तुमी दोगंबी जा घरला. पावना शुद्धीवर आला, आन् अगदीच गरज भासली तर सांगावा धाडीन. मारत्यालाबी बोलावलं आहे, त्यो लक्ष ठेवील पावन्यावर !'' वाघू

भीम्या आणि राघू बैलगाडी घेऊन निघ्न् गेले. काही वेळानं हातात एक मळकी पिशवी आणि सगळी कडनं चेपलेली ट्रंक घेऊन मारतीनं प्रवेश केला. वाघूच्या पाया पडला. वाघू म्हणाला-

' मारत्या, बरं झालं तू आलास. आमच्या पावण्यावर लक्ष ठेव. बाकी समद्या बाबी नंतर ठरवू. म्या वाइच आराम करतो '

' जी मालक ' - मारुती.

वाघू घरात निघून गेला. मारुती शामरावाकडं लक्ष ठेवत, एका स्टुलावर बसून राहिला.

मध्यंतरी चार-पाच दिवस उलटले. शामच्या तब्येतीत बरीच सुधारणा झाली होती. तो हिंड -फिरू लागला होता. जेवणासाठी स्वयंपाक घरात जाऊ लागला. कधी गोदाक्काच्या खोलीत जाऊन गप्पा मारत बसायचा, कधी वाघूच्या मुलांना, मारुतीला, जवळ बसवून शिवाजी महाराजांच्या, मावळ्यांच्या लढाईच्या गोष्टी सांगायचा.

सहाव्या दिवशी सकाळी, चांगलवाडीचे पोलीस पाटील वाघूच्या घरी हजर झाले. फाटकातून आंत येताच त्यांनी वाघूला हाका मारायला सुरुवात केली -

' वाघू दादा,ऽऽ ओऽ , वाघू दादाऽऽ - हायेत का घरात? ' पो.पा.

वाघूचा तीन नंबरचा मुलगा भगिरथ, चेंडूशी खेळत खेळत बाहेर आला. पोलीस पाटलांना बघून भगिरथनं बोंब मारून, रडायला सुरूवात केली.

' ओ ऽऽ बो ऽऽ बोऽ आबा, तुमास्नी पकडायला पोलीस मामा आले हैती. ओ ऽऽ बो बोऽऽऽ !'

' ए पोरा, आरं गप् ! म्या तुज्या बाला पकडायला न्हाई आलो. निस्ती चौकशी करायला आलो हाय' - पोलीस पाटील.

भगिरथचा आवाज एकदम बंद झाला आणि काही झालंच नाही अशा थाटात तो पुन्हा चेंडूशी खेळू लागला. क्षणभरानं वाघू बाहेर आला आणि नमस्कार करुन म्हणाला -

' राम राम पोलीस पाटील ! साताऱ्याहून कवा परतलासा? मिटींग लांबली म्हणा की?' - वाघू

' लांबलीच म्हणायची. आपल्या जिल्ह्यातल्या गावोगावच्या पोलीस चौक्यांच्याकामाची झाडाझडती झाली, मागण्यांचा इचार झाला ' पोलीस पाटील.

' चांगलवाडीच्या चोकीला काही मिळालं कां? अंगावर सरकारी डगला आन् खाली आपलंच धोतर असं किती दिवस ऱ्हानार तुमी? ' वाघू

' बघा म्हंजी !! चांगलवाडीची वस्ती आनखी वाढाया हवी. एका वर्सात चार-पाच भुरट्या चोऱ्या, शून्य दंगे धोपे, खुना-खुनी अजिबात नाही अशा खेड्याला एक पोलीस पाटील आन् अर्धा कारकून खूप झालं असं म्हनत्यात डी. अेस. पी. साहेब ! ..... त्ये समदं ऱ्हाऊ द्या. आल्या आल्या कानावर आलं की तुमी एका जखमी मानसाला घरी आणून ठेवलया' - पोलीस पाटील.

' व्हय् ! ' शामराव नाव हाय त्यांचं !' - वाघू

' शामराव आता कुटं हैती?' - पोलीस पाटील

' हैती की घरातच ! ' चला दाखवतो ' - वाघू

दोघं बेडरूम मधे आले. वाघूदादांनी दोघांची ओळख करून दिली. ' शामराव, हे चांगलवाडीचे पोलीस पाटील' ' आन् हे शामराव, आमचे पावने !'

दोघांनी एकमेकाला नमस्कार केला. नंतर पोलीस पाटलांनो शामला डोक्यापासून पाया पर्यंत तपासलं आणि मारेकऱ्यांनी काय काय अत्याचार केले त्याची नोंद घ्यायला सुरूवात केली. शेवटी म्हणाले ' आरा ड रा डड रा ड ! मारेकऱ्यांनी एकबी जागा सोडली नाही. डोस्कं फोडलं आहे, पाठीवर, मांड्यांवर, जागोजागी काठीचे काळ-निळे वळ हायती. वाघूदादा, तुमी वेळीच चौकीत तक्रार नोंदवायची होती. ' पोलीस पाटील.

' अवो, म्या दोनदा माणूस पाठवला व्हता. पन् दोनी टायमाला चौकीला टाळं. तुमी साताऱ्याला जाणार व्हता ते माहीत व्हतं. पन तुक्याबी भेटला न्हाई ' - वाघू

' बरं ! शामराव, गावातल्या कुनाशी हाता-पायी, मारामारी, बाचाबाची झाली व्हती का तुमची? ' - पोलीस पाटील.

' नाही, चांगलवाडीत मी पहिल्यांदाच येत होतो आणि माझ्यावर अचानक हल्ला झाला ' - शाम

' नक्की? वाडीतल्या कुनालाच वळखत न्हाई तुमी? ' पो.पा.

' फक्त गोदाक्काना ओळखत होतो. साताऱ्याला आमच्या वाड्यात रहात होत्या. त्यांच्याकडून ऐकलं होतं की चांगलवाडीतल्या लोकांना दवा-दारु साठी तालुक्याच्या गावी किंवा जिल्ह्याच्या गावी जावं लागतं. मी डॉक्टरीची शेवटची परिक्षा - एम् बी.बी.एस. ची परिक्षा - दिली आहे. पदवी हातात पडल्यावर गोदाक्काच्या गावी दवाखाना काढावा असा विचार करून मी इकडे येत होतो. तेव्हाच माझ्यावर हल्ला झाला ' - शाम.

' चांगलवाडी, सुधारणांची तिरडी ' असं म्हनत्यात ते खोटं नाही. शामराव, तुमच्यावर हल्ला करणारे गावगुंड होते, का नक्षलवादी होते ?' - पोलीस पाटील.

' नक्की सांगता येणार नाही. काय झालं ते सांगतो ' ' मी सायकल वरून येत होतो. चढण होती म्हणून मी सायकल हातात धरून चालत होतो. तेवढ्यात शेजारच्या झाडीतून, घोंगडी पांघरून, चार गुंड पुढे आले. त्यांच्या हातात लाठ्या - काठ्या होत्या. दोघांनी मला खाली पाडले. मी ओरडू नये म्हणून एकानं माझ्या तोंडात कापडाचा बोळा कोंबला आणि लाठ्या-काठ्यांनी बदडायला सुरूवात केली, एकजण माझी सायकल घेऊन पळून गेला. दुसऱ्यांन बॅग तपासली. पुस्तकं फाडून टाकली. कपडे, पैसे, औषधं त्याच्या झोळीत भरली. नंतर मला एका सागवानाच्या झाडाला बांधलं. त्यांच्या म्होरक्यानं जातां जातां माझ्या डोक्यावर जोरदार तडाखा मारला. त्यानंतर

काय घडलं ते मला आठवत नाही. शुधद आली तेव्हा मी वाघूदादांच्या खोलीत पलंगावर पडलेला होतो. ते गावगुंड होते, का भुरटे चोर होते का नक्षलवादी होते ते तुम्हीच ठरवा ' -शाम.

शामचं बोलणं संपल्यावर पोलीस पाटलानी क्षणभर विचार केला आणि शामला विचारलं - ' शामराव तुमी आत्ता जे काई सांगितलं ते समदं एका कागदावर लिहूनशान, तक्रारीच्या रूपात माज्या कडं लिहून दिलंत तर नक्षलवाद्यांवर कारवाई करनं सोपं जाईल. चांगलवाडीच्या पोलीस ठेसनाला जादा कुमक मिळेल.!' पोलीस पाटील.

' पाटील साहेब, मी चांगलवाडीतल्या लोकांना दवा-पाणी देऊन त्यांची दुःख दूर करण्यासाठी आलो आहे. तसे करतांना मला चार पैसे मिळाले तर आनंदच आहे. माझ्याकडं येणारा पेशंट कोणत्या पक्षाचा किंवा नक्षलवादाचा समर्थक आहे त्याची चौकशी करण्याचं मला कारणच नाही. आणि तुम्ही ज्यांना नक्षलवादी म्हणताय त्यांना नक्षलवाद म्हणजे काय ते माहीतही नसेल. मला दवाखाना सुरूं करून देऊन लोकांची दुखणी दूर करू दे, समाजापासून दूर राहाणाऱ्यांना कळू दे की धाक-दपटशहा दाखवून, गरजेच्या वस्तू ओरबाडण्यापेक्षा, मेहनत करून, चार पैसे कमवून जगणं, जास्त आनंददायक आहे. !' - शाम.

' शामराव, ज्या नक्षलवाद्यांनी तुमास्नी मारहान केली, पुस्तके फाडली, सायकल पळवून नेली, तुमास्नी झाडाला बांधून ठेवलं त्यांच्या विरूध्द एफ् आय आर लिहून द्यायला नकार का देताय्? हे म्हंजी शेपूट घालनं झालं!' पोलीस पाटलांनी शामला उचकावण्याचा प्रयत्न केला.

' नाही पाटील साहेब, हे शेपूट घालणं नाही. मला खात्री आहे पुढच्या काळात त्यांना वैद्यकीय उपचाराचं महत्त्व कळेल आणि तेच नक्षलवादी कुणाला मारहाण करण्याचं धाडस सुध्दा करणार नाहीत' - शाम.

दोघातली चर्चा थांबावी म्हणून वाघू म्हणाला -

' पाटील साहेब, शामराव तक्रार लिवून द्यायला तयार नसतील तर राहू द्या. तुमी तुमच्या बाजूनं तपास सुरूं करा की !' - वाझू.

' भले !' गुन्हा घडला तुमच्या मळ्यात, आन् आमी आमच्या मर्जीनं चौकशी सुरू करायची? कायद्यात असं चालत नाही. गुन्हा घडल्याची खबर पोलिसांना कुनीतरी द्यावी लागते. त्यालाच ' एफ आय आर' म्हनत्यात. - पोलीस पाटील.

' अशी भानगड असतीया व्हय ! ' मग म्या आन् राघूनं फार फार लिवून दिला तर चालंल का? ' - वाघू

' चालल न्हाई, पळंल बरं, कुनाच्या हाती त्यो पाठवून द्या. चलू का? '

' भलेड! नाश्ता पानी केल्या बिगर तुमाला जाऊ देऊ व्हय चला, टेबलावर नाश्ता करूं या. '

दोघं जेवणाच्या टेबलावर येऊन बसले. वाघूनं फोन करून राघूला बोलवून घेतलं. नाश्ता सुरू झाला. वाघून मुलाच्या कानात काहीतरी सांगितलं. काही वेळानंतर महादेवानं दोन पाकिटं तयार करून पोलिस पाटलांना आणून दिली. राम राम करून पोलीस पाटील निघून गेले. वाघू, राघू शामच्या खोलीत आले. शाम कपडे घालून तयार होता. वाघूनं विचारलं -

' डॉक्टर, कुटं बाहेर निगालात का?'

' हो, माझी तब्येत खूप सुधारली आहे. बाजार पेठेच्या आसपास दवाखान्यासाठी आणि राहण्यासाठी दोन-चार खोल्या भाड्यानं मिळतात कां त्याचा शोध घेण्याचा विचार आहे. !' डॉ.शाम.

''कां वो? आपल्या बंगल्यात राहा आन् इथंच डॉक्टरी सुरु करा. सात आठ खोल्यांचा बंगला आहे आपला. तुम्ही मागाल त्या खोल्या देतो'' वाघू.

''तुमच्या बंगल्यात दवाखाना सुरु करायला हरकत नाही, पण प्रश्न आहे आजारी माणसांच्या येण्या-जाण्याचा. छोट्या-मोठ्या तक्रारी घेऊन, गावाबाहेरच्या दवाखान्यात कोण येणार?'' शाम

''हां, त्ये बी खरंच हाय ! .. राघू, बाजारपेठेच्या आसपास, पावनं म्हनत्यात तशी जागा तुज्या नजरेत हाय कां?'' वाघू

''तशी जागा ..... तशी जागा ....? हां, बाजारपेठेच्या कोपऱ्यावर, बडवे भटाच्या वाड्यात 'जागा भाड्यानं देनं हाय' अशी पाटी लटकत होती, आठ दिवसामागं'' राघू.

''राघ्या, तू तरी काय जागा सुचवतोयास ! आरं, त्या वाड्यात कंचाबी भाडेकरु दोन म्हैन्यापेक्षा जादा दिवस टिकत न्हाई ! अमुक करायचं नाही, तमुक करायचं, पाणी-वीज वापराच्या वेळा मालकच ठरवणार ! भाडेकरुला सळो की पळो करुन सोडतुया त्यो बामण ! '' वाघू

''वाघूदादा, मी पण बामणच आहे. भाड्याच्या घरात राहीलो नाही कधी, पण चांगलवाडीत तो अनुभव घ्यायला हरकत नाही'' शाम.

''असं म्हनतां? चला .. बघूया, तुमच्या नशिबात काय लिवलया ! राघू, तू जा घरला. उगच 'तीन तिघाडा, काम बिघाडा' व्हायला नको.''

राघू निघून गेला. जेवणं उरकून, थोडी झोप काढून वाघू आणि शाम पांच वाजण्याच्या सुमारास बडवे भटजींच्या वाड्यात पोहोचले. शामनं बाहेरुनच चौकशी केली ''बडवे गुरुजी आहेत का घरात?''

''या वयात कुठं जाणार आहे मी? या, आत या.''

शाम आणि वाघू, गुरुजी बसले होते त्या खोलीत गेले. गुरुजी दिवाणावर बसले होते. एका जुनाट पोथीची पाने वाचत होते. त्यांच्या समोरच्या दिवाणावर, भिंतीला टेकून, सौ.बडवे आजी, गोवारीच्या शेंगा निवडत बसल्या होत्या. शाम दोघांच्या पाया पडला. वाघूनं दुरुनच हात जोडले. दोघांनी 'यशस्वी भव !, आयुष्यमान भवं' असे आशिर्वाद दिले. गुरुजींनी वाघूला विचारलं - ''वाघ्या, नक्षलवाद्यांनी डोंगरावरच्या तुझ्या सागवानाच्या झाडाला बांधून ठेवलेला हाच का मुलगा?''

''व्हय जी ! पन् तुमास्नी कसं कळलं?'' वाघू

''काल पोलीस पाटील आले होते, सहज गप्पा मारायला. त्यांनी सांगितलं, बोलता बोलता ! आणि तुम्ही उभे का? बसा ना खुर्च्यांवर ! बरं, माझ्याकडं काय काम काढलंत?'' गुरुजी.

''काका, तुमच्या वाड्यात माझ्या दवाखान्यासाठी दोन-तीन खोल्या भाड्यानं मिळतील का ते विचारायला आलो होतो'' शाम.

''म्हणजे तू डॉक्टर आहेस ! त्याचा काही पुरावा?'' गुरुजी.

''मी एम्.बी.बी.एस. परीक्षा पास केली आहे. याच वर्षी. अजून सर्टिफिकेट मिळालं नाही, मिळालं की त्याची झेरॉक्स कॉपी देइन तुम्हाला हवी असली तर'' शाम

''मी तुझ्यावर अविश्वास दाखवतोय असं समजू नकोस. पण खोल्या भाड्यानं देताना घरमालकाला सगळी खबरदारी घ्यावीच लागते. वाघ्या, तुला ती भोंगाण्याची केस माहिती असेलच. पती-पत्नी रहायला आले आणि आठ दिवसातच त्यांचं खरं रुप उघडकीस आलं. त्या बाईबरोबर रोज वेगळा पुरुष झोपायला येऊ लागला. त्यांचं बिऱ्हाड काढून टाकायला पोलीस पाटलांना घेऊन यावं लागलं'' गुरुजी.

''भटजीबुवा, पन हा पोरगा तसा न्हाई. माझी भन यांच्या वाड्यात वीस वर्ष ऱ्हायली ... वाटल्यास ....''

''कोण गोदाक्का?''

''व्हय. दरमहा शंभर रुपये भाडं ठरलं होतं. पन गोदाक्का सुईणीचं काम करते ते कळल्यावर मालकीणबाईंनी वीज-पाण्याचे फकस्त दहा रुपये घ्यायला सुरुवात केली. याला म्हनत्यात घरंदाजपना ! '' वाघू.

''वाघ्या, घरंदाजपना काय असतो ते त् मला शिकवू नकोस. आम्ही चांगलवाडीत आलो त्यावेळी आमच्याकडे काय होतं? पळी-पंचपात्री आणि पोळपाट-लाटणं. आम्ही दोघांनी कष्ट करुन हा वाडा उभा केला आहे'' गुरुजी.

''गुरुजी, तुमचं पाच खोल्यांचं ह्ये घर, मागली बाग आन् फ़डली मोकळी जागा, विकत देणार का? काय किंमत हाय सगळ्या मिळकतीची? पाच लाख, सात लाख, दहा लाख? बोला, ही मिळकत शामरावाच्या नावानं करुन देतो म्हणा. लगेच तेवढ्या रकमेचा चेक देतो. बाकी लिखापढी नंतर करु'' वाघू.

वाघूचं बोलणं ऐकून भटजीबुवा आणि आजी हसू लागले. वाघूनं विचारलं ''हसायला काय झालं?''

''हा वाडा विकला तर आम्ही कुठं जाणार? तुम्ही तुमचा बंगला आणि मागची-पुढची जागा माझ्या नावावर करुन देत असाल तर हा वाडा आणि मागची बाग आणि मोकळी जागा शामरावाच्या नावे करुन देतो'' गुरुजी.

''माझ्या बंगल्याची आणि तुमच्या या मातीच्या ढिगाऱ्याची बरोबरी करताय? काय करनार माज्या बंगल्याचं?'' वाघू.

''काहीही करेन. वेदपाठ शाळा सुरु करीन किंवा ते नाहीच जमलं तर भाकड जनावरां साठी पांजरपोळ सुरु करीन'' गुरुजी.

''शामराव, उठा. म्हाताऱ्याला याड लागलंय. माज्या बंगल्यात पांजरपोळ काढीन म्हनतुया. उठा ...'' वाघू.

शामनं वाघूदादाना हाताला धरुन खाली बसवलं आणि म्हणाला

''वाघूदादा, असं रागावून, बैठक मोडून जाऊ नका. म्हातारी माणसं आहे. पूर्वी कमावून ठेवलं असेल ते आणि आता या खोल्यांचे भाडं यावरच त्यांची गुजराण होत असेल, म्हणून काका जास्त खबरदारी घेत असतील'' शाम.

क्षणभर कुणीच काही बोललं नाही. नंतर बडवे आजींनी नवऱ्याला सूचना केली

‘‘अहो, घड्याळाकडं लक्ष आहे ना? बरोबर सहा वाजता वैशूचा फोन येईल. स्पीकर चालू ठेवा. नाहीतर नातीशी बोलता नाही येणार मला’’ आजी.

‘‘दर दोन दिवसांनी माझे कान उपटलेच पाहिजेत का?  नातीची काळजी मला नाही असं वाटतं का तुम्हाला?’’ असं म्हणत गुरुजींनी फोन स्पीकरला जोडला. आजी म्हणाल्या ‘‘इश्श ! पाहुण्यासमोर हे सगळं बोलायलाच पाहिजे होतं का?’’ आजी.

तेवढ्यात फोन वाजला. बडवे काकांनी फोन घेतला ...

‘‘हॅलो ... कोण? वैशू ना? आधी आजीशी बोल. नाहीतर ती मला बोलू देणार नाही.’’ गुरुजींनी फोन आजीकडं दिला. वैशाली म्हणाली - ‘‘हॅलो, आजी कशी आहेस? मी दिलेल्या गोळ्या वेळेवर घेतीयस ना? गुडघ्याला मसाज करतीयस ना?‘‘ वैशाली.

‘‘वैशू, मला तर वाटायला लागलंय की माझी दुखणी मी मेल्यावरच संपणार आहेत. तू कशी आहेस? ... सगळ्या परीक्षा वगैरे संपल्या ना? इकडे कधी येणार आहेस? लग्नाचा विचार कधी करणार आहेस? तुझ्या डोक्यावर अक्षता पडल्या की मी मरायला मोकळी ! ’’ आजी.

‘‘तुझ्या मांडीवर पणतू दिल्याशिवाय मी तुला बरी मरु देईन ! आजी, मी पुढल्या आठवड्यात वाडीला येणार आहे. तेव्हा सविस्तर बोलू .... आबा, कुणाच्या तरी खोकण्याचा आवाज आला. कुणी आलंय का तुम्हाला भेटायला?’’ वैशू.

‘‘हो बेटा. आपल्या वाड्यातल्या तीन खोल्यात दवाखाना काढण्याच्या हेतूनं शाम देशपांडे नावाचा तरुण आला आहे’’ गुरुजी.

‘‘काय? शाम तिकडे आला आहे?’’ वैशू

‘हो, तू ओळखतेस त्याला?’’ गुरुजी

‘‘चांगलंच ओळखते’’ वैशू

त्यानंतर वैशालीनं सांगितलं त्याचा सारांश असा -

‘‘आबा, शाम माझा खास मित्र आहे. कॉलेजची पहिली दोन वर्ष एकत्र काढली. दुसऱ्या वर्षाच्या शेवटी आम्ही दोघांनी गॅदरींगमध्ये ‘शातता ! कोर्ट चालू आहे’ या नाटकात एकत्र काम केलं. त्याचे फोटो आपल्या

अल्बममध्ये आहेत. आबा, तो आपल्या घरात दवाखाना काढतोय हे ऐकून तुम्हा दोघांची काळजी एकदम कमी झाली आहे. आबा, तो देईन तेवढं भाडं घ्यायला होकार द्या. काही दुरुस्त्या करुन द्यायला नाही म्हणू नका. आपल्या घराच्या बागेत, औषधी वनस्पती लावण्याची परवानगी मागेल त्याला होकार द्या.'' वैशाली.

''अगं हो... हो ! किती सूचना देशील? थोडक्यात सांग ना, की डॉक्टरांची जावयासारखी बडदास्त ठेवा'' गुरुजी.

''आबा.... आमच्या दोघात तसं काही नाही हं ! मी शामच्या घरी गेले की शामची आई मला जवळ बसवून घेतात, पाठीवरुन हात फिरवतात, खाऊ-पिऊ घालतात म्हणून...'' वैशाली.

''अशी भानगड आहे तर ! उद्या पुन्हा करशील ना फोन? आता ठेवू फोन?''

गुरुजींनी फोन बंद केला आणि म्हणाले ''शामराव आता व्यवहाराचं बोलूया'' गुरुजी.

''गुरुजी, तुमच्या नातीनं व्यवहाराबद्दल ज्या सूचना दिल्या आहेत त्या सगळ्या मला मान्य आहेत. मी तीन खोल्याचं तीन हजार रुपये भाडं देईन. माझी प्रॅक्टीस जसजशी वाढत जाईल त्या प्रमाणात मी भाड्यापोटी तीनशे रुपये जास्त देईन. पाण्याचं आणि विजेचं जेवढं बिल येईल ते मो देत जाईन. दोन्ही मीटर बसवण्याचा आणि सगळ्या खोल्यांना आतून बाहेरुन पांढरा, फिकट निळा रंग देण्यासाठी आणि इतर दुरुस्त्या करण्यासाठी मी वाघूदादाकडून तीस हजार रुपये उसने घेऊन तुम्हाला देतो. साताऱ्याला जाऊन सगळं सामान घेऊन यायला मला सात-आठ दिवस लागतील. तोपर्यंत सगळी कामं करुन घेऊ शकाल ना?'' शाम.

''डॉक्टर, तुमच्याइतका विचार करणारा आणि व्यवहारी तरुण बघितला नव्हता. शाबास ! तुम्ही परत येईपर्यंत सगळी कामं करुन घेतो'' गुरुजी.

''वाघूदादा, मला तीस हजार रुपये देता का? मी परत आल्यावर ....''

''कळलं ! '' वाघू.

वाघूदादांनी तीस हजाराचा चेक गुरुजींच्या हातात दिला. गुरुजी आणि आजींच्या पाया पडून दोघं घरी परतले.

शामनं बडवे गुरुजींशी काय बोलणं झालं ते गोदाक्काला सांगितलं. गोदाक्कानं शामच्या पाठीवर शाबासकी दिली आणि म्हणाली ''लेकरा, हे ब्येस केलंस ! चांगलवाडीतली मानसं तुला भरभरुन दुवा देत्याल. गावातल्या गावात औषधपान्याची सोय झाली. फ़डं काय करायचं ठरवलं आहेस?'' गोदाक्का.

''आक्का, दवाखान्याला लागणाऱ्या वस्तूंची जुळवाजुळव मी आधीच केली होती. ते सामान आणि माझे कपडेलत्ते टेंपोत भरायचे आणि इकडं निघून यायचं. तुझ्या हस्ते दवाखान्याचं उद्घाटन करायचं, की काम सुरु ! '' शाम.

''तुला वाटतंय तेवडं सोपं नाही त्ये काम'' गोदाक्कानं चिंता व्यक्त केली.

''म्हणजे? तुला नक्की काय म्हणायचंय?'' शाम.

''तुझी माय, डोळ्यात पानी आनून तुजी पाठवणी करील. पन् तुझा बा, पैसे मागितलेस की इतकं आकांड-तांडव करीन की 'भीक नगं पन् कुत्रं आवर' म्हनन्याची पाळी आनल ! '' गोदाक्का.

क्षणभर कुणीच काही बोललं नाही. सगळे एकमेकाकडे बघत राहिले. क्षणभरानं वाघूची पत्नी तिघांसाठी चहा घेऊन आली आणि म्हणाली - ''भाऊजी, तुमी पैशाची अजिबात काळजी करु नका. माझे मालक देत्याल तुमाला हवा त्येवढा पैका'' वहिनी.

''ए गप् ! माज्या पैशाची रखवालदार हायेस कां तू?'' वाघू.

''आक्कासा भावजीना त्यांचं लेकरु मानतात. मग भाच्याला दवाखाना थाटण्यासाठी दिलेत दोन-चार लाख, तर तुमच्या झोळीला भोसकं पडनार हाय का?'' वहिनी.

''ए गप् ! बाजारात तुरी, आन् भट भटनीला मारी अशी अवस्था आनू नका ! '' आक्कानी दोघांना सुनावलं. क्षणभरानं शाम म्हणाला ''आक्का, तू चल ना माझ्याबरोबर, चांगल वाडीत माझी किती आणि कशी सोय झालीय ते आई-बाबांना सांगायला?'' शामनं गळ घातली.

''नगं रं बाबा ! धा-पंधरा वर्स माज्या वाड्यात फ़कट राहिलीस त्याचे पांग फडतीयास का गं सटवे, असं तुज्या बा नं इचारलं तर म्या काय सांगू त्याला? नगं ... नगंच'' गोदाक्का.

क्षणभर कुणीच काही बोललं नाही. सगळे एकमेकाकडे बघत राहिले. नंतर गोदाक्का म्हणाली ''लेकरा, इकडं येन्याची तयारी झाली की तुझ्या बंडूमामाला बोलवून घे. तुज्या बाला समजावणारा आन् तशी वेळ आली तर टक्कर

देणारा त्योच एक मानूस हाय ! '' आक्का. वाघू म्हणाला ''ह्ये बेस जालं ! तुमच्या मामांना मधि घालायचं ! ..... मालकीण बाई, पोटा-पाण्याची काई व्यवस्था होनार हाय का?''

दुसरे दिवशी सकाळी शाम घरी परत जाण्याची तयारी करत होता. वाघूदादांची मोलकरीण शांती अंगण झाडत होती. झाडता-झाडता तिची नजर एका जुन्या सायकलवर पडली. शांतीनं आतल्या भागात बघत ओरडून विचारलं - ''वैनीसाब, अंगणात सायकल कुनाची हाय? याआधी बघितली नव्हती.'' शांतीचा आवाज ऐकून घरातील सगळी मंडळी सायकलभोवती जमा झाली. शंकर म्हणाला,''आबा, मला सायकल हवीच होती. गुपचूप आणून ठेवलीत ना?'' शंकर.

''आरं म्या आनली असती तर जुन्या बाजारातून आनली असती व्हय? ही कुनीतरी वापरलेली दिसतिया ही सायकल. शामराव, नक्षलवाद्यांनी चोरलेली तुमची तर सायकल नव्ही ही?''

''हो दादा, माझीच सायकल आहे ही ! पण नक्षलवाद्यांनी गुपचुप आणून ठेवली हे आश्चर्यच आहे. शंकर तुला सायकल चालवता येते?'' शाम.

''हो ! '' शंकरनं उत्तर दिलं. पुढे म्हणाला ''माझ्या मित्रानं मला सायकल चालवायला शिकवलंय'' शंकर.

''थाटात 'हो' म्हनतुयास, पन कंचा मित्र रं?'' शंकरच्या आईनं खडसावून विचारलं.

''त्यो, आपल्या गवळ्याचा मुलगा पांडू. कधी-मधी सायकल घिऊन येतो शाळेत. त्याच्याकडूनच शिकलो.''

''वहिनी साहेब, शंकर खोटं कशाला बोलेल? शंकर, सायकल चालवून दाखव. व्यवस्थित चालवलीस तर ही सायकल तुझी ! '' शाम.

''भाऊजी, मुलांचे भलते लाड करु नका, आन् तुमचा दवाखाना सुरु झाला म्हंजी सायकल लागेलच तुमास्नी ! '' वहिनी.

''वैनीसाहेब, साताऱ्याहून परतताना मी माझी मोटारसायकल घेऊन येणार आहे''शाम.

''हे ब्येस झालं. माज्या मागची भणभूण मिटली'' वाघू.

शंकर सायकलवर टांग मारुन सायकल फिरवत राहिला. तिथं जमलेल्या लोकांनी टाळ्या वाजवून शंकरचं कौतुक केलं.

शाम त्याच्या खोलीत येऊन साताऱ्याला जायची तयारी करु लागला. पण शामच्या डोक्यातलं विचारचक्र थांबलं नाही. ''हा काय प्रकार आहे? नक्षलवाद्यांनी माझी सायकल परत का आणून ठेवली? मला तर वाटलं होतं सायकलचा एक-एक पार्ट सुटा करुन आठवड्याच्या बाजारात विकला जाईल. पण इथं तर वेगळाच प्रकार झाला आहे! आख्खी सायकल परत केली आहे. नक्षलवाद्यांचे आणि वाघूदादांचे गुप्त संबंध असतील का? तसे संबध असले तरी मी काय करणार होतो? .. मी भलतेच विचार का करतोय?''

शामनं ते विचार झटकून टाकले. सूटकेस बंद केली. तेवढ्यात वाघूनं आणि वहिनी साहेबांनी खोलीत प्रवेश केला. वाघूदादांनी विचारलं,

''शामराव, झाली का तयारी?''

''भाऊजी, तुमी आज कसं जाणार साताऱ्याला?'' सौ.वाघू

''मिळाली तर एस.टी.नं, नाहीतर टेंपोनं'' शाम.

''परतनार कधी?'' वाघू

''दोन दिवसानं पदवीदान समारंभ आहे. तो उरकला की सामान-सुमान गुंडाळून..''

शामला मधेच अडवून वाघूदादांनी सल्ला दिला, ''शामराव, इकडं येन्याची घाई करु नका. मला सांगा, तुमी तुमच्या आई-बापाचे एकुलते एक हाय न्हवं? त्यांनी तुमास्नी खाऊपिऊ घातलं, शिकवलं, डॉक्टर केलं. म्हातारपनी पोरगं आपली इचारपूस करील अशी सपनं त्यांनी रंगवली असतील, का न्हाई?'' वाघू.

''स्वप्नं रंगवली असतीलच! पण दादा, स्वप्न आणि वास्तव यात खूप फरक असतो. माझ्या आई-वडिलानी चांगलवाडीतलं वास्तव स्वीकारुन माझ्याजवळ राहण्याचं ठरवलं तर मी त्यांचापण सांभाळ करीन'' शाम.

''आन् लगीन कवा करनार?'' सौ.वाघू

शाम वहिनीसायबांच्या प्रश्नावर हसत सुटला. हसू विरल्यावर म्हणाला,''वहिनी साहेब, किती दूरचा विचार करताय? चांगलवाडीत रहायला आणि माझ्याबरोबरीनं इथल्या लोकांची सेवा करायला तयार असलेली मुलगी सापडली तर मला सांगा. मी तिच्याशी लग्न करीन! '' शाम.

''मला वाटलंवत, बडव्यांच्या नातीशी तुमचा टाका जुळला हाय'' वहिनी.

''फक्त टाका जुळून उपयोग नाही, मनं जुळावी लागतात. मी आणि वैशाली एकत्र शिकलो, नाटकात एकत्र काम केलं, साताऱ्याच्या घरी तिचं येणं-जाणं आहे. पण जीवनाविषयीच्या आणि डॉक्टरी पेशाविषयीच्या तिच्या कल्पना आणि स्वप्नं फार वेगळी आहेत'' शाम.

''तशी येगळी स्वप्नं बाळगण्यात वंगाळ काय आहे?'' वहिनींचा प्रश्न.

''वाईट काही नाही ! पण त्या स्वप्नांचा पाठपुरावा करताना, डॉक्टर औषध देण्याऐवजी डिस्टील वॉटरची इंजेक्शनं देऊ लागतो, तिथं सगळं बिघडतं ! या विषयावर पुन्हा कधीतरी बोलू. मला आता निघायला हवं. जाण्यापूर्वी आक्कांच्या पाया पडून त्यांचाही निरोप घ्यायचा आहे.... निघू मी? नमस्कार करतो.'' शाम दोघांच्या पाया पडला.

गोदाक्काचा निरोप घेऊन शाम व्हरांड्यात आला. वाघूकडच्या सगळ्या लहानथोर मंडळींनी डॉक्टरला टाटा केलं. शेवटी वहिनींनी एक डबा शामच्या हातात दिला. शामनं विचारलं ''वहिनी साहेब, काय आहे यात?'' शाम.

''तहान लाडू भूक लाडू हैती. जाताना भूक लागली तर हाटेलात अरबट-चरबट काही खाऊ नका'' सौ. वाघू

सगळ्यांना टाटा करुन शामनं चांगलवाडी सोडली. घरी पोहोचेपर्यंत चार वाजून गेले होते. अंघोळ करुन, आईनं केलेला शिरा खाऊन आणि मित्राला भेटून येतो असं सांगून शाम बाहर पडला. हेतू हा की घरी आल्या आल्या, आजच वडिलांशी वाद नको.

वाद नको म्हणून कितीही टाळाटाळ केली तरी खुमखुमी असलेली माणसं - विशेषत: पंत - शामचे वडील - वादावादी करण्यासाठीच जन्माला आले होते. खुंटाळ्याला कोट-टोपी अडकवून पंतांनी विचारलं,''आल्या आल्या शाम कुठं गेलाय उंडारायला? त्याची मोटारसायकल दिसली नाही म्हणून विचारतोय ! '' पंत.

''दोन दिवसांनी पदवीदान समारंभ आहे. त्याचं पत्र आणायला गेला आहे.''

''किती वाजले आहेत तिकडं लक्ष आहे का तुमचं? संध्याकाळी ऑफिस उघडं ठेवायला तो कॉलेजचा मोठा देणगीदार आहे वाटतं?'' शामचे वडील.

''मित्रानं पत्रं घेऊन ठेवलं असेल. मी नाही चौकशी केली की तू कॉलेजमध्ये जातोयस, का मित्राकडं जातोयस'' आई.

''पुढचा विचार काय केलाय त्यानं?'' पंत.

''आजच आलाय, बोलेल सवडीनं. म्हणून मी पण विचारलं नाही.'' आई.

''म्हटलं ना, तेवढी अक्कल तुमच्याकडं असती, तर मला चौकशी करावीच लागली नसती'' पंत.

''हो ! आहे मी बेअक्कल. आणि ती गोष्ट आज तुमच्या लक्षात आली?'' आई.

''माझ्याशी वितंडवाद घालू नका. तेवढी लायकी नाही तुमची ! '' पंत.

''पुन्हा पुन्हा माझी लायकी काढताय? गोदाक्काशी लगट करायला गेलात आणि आक्कानी तुम्हाला खोलीबाहेर ढकललं, तेव्हा तुमची लायकी सगळ्या जगाला कळून चुकली होती'' आई.

''त्या सटवीनं माझ्यावर धादांत खोटा आरोप केला होता.'' पंत.

''मग गोदाक्कांना घरभाडे माफ का केलंत? ... घरच्यावरी खाय दाढा, बाहेर दीन बापुडा अशी अवस्था आहे तुमची.'' आई.

''हे सत्य तुम्हाला आज उमगलं?'' पंत

''फार पूर्वीच लक्षात आलं होतं. पण मी वाट पहात होते, शाम डॉक्टर होण्याची. आता मला तुमच्या रागाची, घालून पाडून बोलण्याची, माहेरी चालती हो वगैरे धमक्यांची अजिबात भिती वाटत नाही.'' आई.

''मग लोचटपणे राहता कशाला माझ्याबरोबर?'' पंत.

''देवा-ब्राह्मणांची शपथ घेऊन मी या घरात आले. ती शपथ कशी मोडू? आणि मामंजींनी हा वाडा माझ्या आणि शामच्या नावावर करुन ठेवला आहे हे विसरु नका. तुम्हाला सवलत आहे ती फक्त या संपत्तीचा उपभोग घेण्याची. ही गोष्ट भाडेकरुंना कळली तर तुमचा तोरा, रुबाब, ताठा सगळं मातीला मिळेल ! '' - शामची आई.

त्याचवेळी शाम आणि बंडूमामानी घरात प्रवेश केला. पंत म्हणाले ''या ! तुमचीच कमी होती. बंड्या, तू का आला आहेस ते न ओळखण्याइतका बावळट नाही मी ! शामला चांगलवाडीत दवाखाना काढण्याची परवानगी द्या, पुरेसं भांडवल द्या अशी रदबदली करायला आला आहेस ना? पण मी तसं बिलकुल करणार नाही. माझी इच्छा आहे की शामनं आमच्या या वाड्यातच दवाखाना सुरु करावा'' पंत.

''पुरेशी प्रॅक्टीस चालत नाही म्हणून किती डॉक्टर साताऱ्यातन् गाशा गुंडाळण्याच्या तयारीत आहेत ते तुम्हाला माहित असेलच ! उलट चांगलवाडीतल्या रोग्यांना पाच-सहा मैल चालत जावं लागतं, तालुक्यातला किंवा जिल्ह्यातला डॉक्टर गाठण्यासाठी'' मामा.

''तुला काय माहीत? तुला आणि शामला त्या थेरडीनंच फितवलं असणार'' पंत.

''डॅड, मी चांगलवाडीतली परीस्थिती प्रत्यक्ष पाहून आलोय ! मामा म्हणतोय ते शंभर टक्के खरं आहे.'' शाम.

''म्हणून तू चांगलवाडीत दवाखाना काढावास? जिथं नक्षलवादी रोज एकाद्याला मारहाण करुन लुटतात, जिथं वीज-पाण्याचा चोवीस तास पुरवठा नाही, वाहतूक व्यवस्था नाही, एकादी वस्तू हवी असेल तर आठवड्याचा बाजार भरण्याची वाट पहावी लागते.... नो नो ! चांगलवाडीला जाण्याची परवानगी मी देणार नाही. भांडवल तर मुळीच देणार नाही. मी निघतो. ऑफिसला जायला उशीर होईल.'' पंत.

''थांबा ! '' शामच्या आईनं नवऱ्याला अडवलं आणि म्हणाली,''मी पण येते तुमच्या बरोबर. कलेक्टर साहेबांना विचारते, तुमच्या अधिकाऱ्यांच्या प्रॉव्हीडंट फंडावर त्यांच्या कुटूंबियांचा अधिकार असतो की नाही?''

पंत क्षणभर गडबडले. पण नंतर स्वत:ला सावरुन म्हणाले,''स्वत:ला फार शहाण्या समजता का? साहेबांना भेटायचं म्हणे ! तुमचं स्वागत करायला साहेब दारातच उभे असतील असा विचार करणं निव्वळ मूर्खपणा आहे. अक्कल नाही दमडीची आणि साहेबांना भेटायचं आहे. मूर्ख ..'' असं बडबडत पंतानी घराबाहेर पाऊल टाकलं.

शाम, त्याची आई आणि बंडूमामा, एकमेकांकडे बघत, पुढं काय त्याचा विचार करत राहिले. शवटी बंडूमामानी शामला विचारलं ''शाम, चांगलवाडीला जायच्या आधी काही खरेदी करायची असेल तर अंदाजे किती पैसे लागतील?'' बंडू.

''अंदाजे पंचवीस-तीस हजार रुपये लागतील'' शाम.

''ठीक आह. हे घे पस्तीस हजार रुपये ! '' मामानी नोटांचा गठ्ठा शामच्या हातात दिला. शामन विचारलं ''मामा, एवढे पैसे तुझ्याकडं कुठून आले? बंगला गहाण टाकलास ना?'' शाम.

''वेडा आहेस का? आमचा पगार पंचवीस रुपयानं वाढला आहे. त्याचे ॲरिअर्स मिळाले चोवीस हजार. मला सुपारीच्या खांडाचंही व्यसन नाही. पाच-सहा हजार रुपये माझं सेविंग होतं.'' बंडू मामा.

''मामा, तू इतका समतोल विचार करतोस. मग डॅडीच सगळ्या बाबतीत नकारात्मक विचार का करतात?'' शाम.

''शाम, पंत नकारात्मकच विचार करतात असं समजू नकोस. सगळ्यांना एकाच प्रकारे न्याय देणं सरकारी नोकरांना शक्य होत नाही. तसं करणं योग्यही नाही, असो... तुला हव्या असलेल्या वस्तू खरेदी करुन माझ्या बंगल्यावर ये. मी

अनुप जलोटांची ‘भजन संध्या’ ही एल.पी. विकत घेतली आहे. भजनं ऐकू, गप्पा मारु, जेवण करु. ताई, तू पण चल ना माझ्या घरी’’ बंडू.

‘‘नाही रे बाळा, हे तणतणत ऑफिसात गेले आहेत. परत आल्यावर काय करतील त्याचा नेम नाही’’ ममा

‘‘ठीक आहे. शाम तू बाजारात जाणार असशील तर मला घरी सोडून मग पुढे जा’’ मामा.     शाम आणि बंडूमामा बाहेर पडले.

पंत संध्याकाळी सहा-साडेसहाला घरी परतले. हातपाय धुवून पाटावर बसले. शामच्या आईनं चहाचा कप आणि बशीत दोन बिस्कीटं पंतांच्या पुढे ठेवली. चहाचा घोट घेऊन पंतानी विचारलं ‘‘शाम कुठं बाहेर गेलाय का?’’ पंत.

‘‘तो दुपारी खरेदी करायला गेला होता. परत आल्यावर जरा आडवा झाला आहे’’

‘‘खरेदी करायला पैसे कुणी दिले?’’ पंत.

‘‘दादानं तीस हजार रुपये आणले होते. त्याला ॲरिअर्स मिळाले होते म्हणे.’’ ममा

‘‘हा बंड्या लेकाचा माझ्या पुढे दोन पावलं असतो, आणि भाव खाऊन जातो.’’ पंत.

‘‘इश्शं ! भाव काय खायचाय त्यात. त्याला ना बायको ना मुलं. सुपारीच्या खांडाचंही व्यसन नाही. दुमजली बंगला बांधलाय. कुणी रहायला आलं आणि भाडं देऊ केलं तर घेतो. नाही दिलं तर नमस्कार !’’ ममा.

‘‘तेच नेमकं आम्हाला जमलं नाही ! भाडे-पट्टे करा, वीज पाण्याचं वेगळं बिल वसूल करा असं करत राहिलो. त्यामुळं .....’’ पंत.

‘‘त्यामुळं आपलं काही अडलंय का? पुरवठा अधिकारी म्हणून भरपूर पगार मिळतोय तुम्हाला.’’ ममा.

‘‘हीच ! हीच ! मिळतंय तेवढ्यात समाधान मानण्याची तुमची वृत्ती अजिबात आवडत नाही मला ! ’’ पंत.

‘‘शामचा दवाखाना सुरु झाला की वाट्टेल तेवढा पैसा गोळा करेल तो ! ’’ ममा.

‘‘तीच एक आशा आहे’’ पंत.

‘‘त्याला देण्यासाठी पैशाची व्यवस्था झाली आहे का?’’ ममा.

''तुम्ही धमकी दिलोत कलेक्टरला भेटण्याची, मग व्यवस्था करावीच लागली. प्रॉव्हीडंट फडातून पाच लाखाची उचल केली आहे. हा चेक द्या त्याला.'' पंतांनी पाच लाखांचा चेक बायकोच्या हातात दिला.

क्षणभरानं शामनं स्वयंपाकघरात प्रवेश केला. आईवडिलांना अभिवादन केलं ''गुड इव्हिनिंग डॅड, गुड इव्हिनिंग मॉम.'' दोघांनी हसून प्रतिसाद दिला. मम्मीनं विचारलं ''शाम, अर्धा कप चहा घेणार का?''

''नको ! घोटभर, घोटभर म्हणत मामानं दोन-तीन कप चहा पाजला मला'' शाम.

''शाम, तुला खुश करणारी बातमी आणलीय् तुझ्या डॅडींनी.'' ममा

''कसली बातमी ? मॉम सांग ना लवकर'' शाम.

''डॅडीनाच विचार'' ममा

''डॅड, सांगा ना? माझी उत्सुकता फार ताणू नका.'' शाम.

''शाम, तुझ्या त्या फडतूस चांगलवाडीत एकाद्या बँकेची शाखा नसेलच?'' पंत

''नसेल कशावरुन' चांगलवाडीत रोज करोडो रुपयांची उलाढाल होते. एसबीआय् ची एक आणि सहकारी बँकेच्या दोन शाखा आहेत.'' शाम.

''तसं असेल तर त्यात तुझ्या खात्याची भर टाक आणि त्यात पाच लाखाचा भरणा कर.'' पंतांनी पाच लाखाचा चेक शामच्या हातात दिला. पाच लाखाचा चेक बघून शाम हरखून गेला आणि म्हणाला ''थँक यू डॅडी ! यानंतर मी तुमच्याकडे एक पैसाही मागणार नाही.'' शाम.

''तेवढंच नाही, दोन वर्षानं मी रिटायर होणार आहे. त्यानंतर तू दर महिन्याला, न चुकता, दोन हजार रुपये तुझ्या आईच्या नावानं मनिऑर्डरनं पाठवलेच पाहिजेस.'' पंत.

''इश्श ! त्याच्याकडून स्टँप पेपरवर लिहून घेणार आहात का?'' आईनं प्रश्न केला.

''तुम्हीच शामचे स्टँप पेपर आहात ! तुमच्या समोर त्यानं कबुली दिली म्हणजे त्याला तसं करावंच लागेल. नाही केलं तर त्याचे परिणाम काय होतात ते शामला चांगलं ठाऊक आहे.'' पंत.

पंतांचं बोलणं ऐकून शामनं पाच लाखाचा चेक ममाच्या पायावर ठेवला आणि म्हणाला ''मॉम, पाच लाखाचा हा चेक डॅडींना आत्ताच परत कर. त्याच्या बदल्यात डॅड तुझा छळ करणार असतील तर नकोयत मला ते पैसे !'' शाम.

समजावणीच्या स्वरात ममा म्हणाली,''असं करु नकोस बाळा. तुझ्या डॅडींचा स्वभाव तुला माहीत आहे ना? ... तो चेक देवापुढं ठेव आणि प्रार्थना कर की माझ्या कार्यात मला खूप यश दे. डॅडींच्या पाया पडून त्यांचेपण आशिर्वाद घे'' ममा.

शामनं आईच्या सांगण्याप्रमाणं केलं आणि दोघांच्या शेजारी येऊन बसला. तो काही बोलणार तेवढ्यात 'शाम' अशी हाक ऐकू आली. ममा म्हणाली''शाम तुझ्या मैत्रिणीचा-वैशालीचा आवाज वाटतोय.''

''हो ! ती आज डॉ.कोकिळांना भेटायला जाणार होती. त्यांची असिस्टंट म्हणून नोकरी मागायला.

त्याच वेळी वैशालीनं प्रवेश केला. मम्मी डॅडींना हाय् हॅलो केलं. पंत त्यांच्या खोलीत निघून गेले. शामनं वैशालीला विचारलं - ''वैशू, तू डॉ.कोकिळांना भेटायला जाणार होतीस ना?'' ''अरे ... तेच सांगायला आले. डॉ.कोकिळांनी मला असिस्टंट सर्जन म्हणून लगेचच अपॉईंटमेंट दिली.'' वैशाली.

''फर्स्ट क्लास मिळालेल्या मुलीला अपॉईंटमेंट द्यावीच लागली'' शाम.

''फर्स्ट क्लास मिळालेल्या मुलाचीपण चौकशी करत होते डॉ.कोकीळ. मला म्हणाले त्याला नोकरी करायची असेल तर ....'' वैशाली.

''नाही. मी पत्करलेला मार्ग चांगला आहे. बाय द वे, तुझ्या होस्टेलचं काय करणार? नोकरी लागल्यावरसुद्धा राहू देतील का?'' शाम

''त्याच चिंतेत होते मी. तेवढ्यात बंडूमामा भेटले. बोलता बोलता म्हणाले 'दोनचार दिवसानं शाम चांगलवाडीला जाणार आहे. त्याच्या दोन खोल्या रिकाम्याच होणार आहेत. तू तिथं राहिलीस तर माझ्या ताईला सोबत होईल, तुझाही प्रश्न सुटेल.'' वैशाली. ''दादानं योग्य सल्ला दिला. मुलीचं कोड-कौतुक करण्याची माझी इच्छा अनायासे पूर्ण होईल.'' ममा.

त्याचवेळी माजघरात प्रवेश करुन पंत म्हणाले ''लगेच हुरकून जाऊ नका. तिला सांगा वीज, पाणी आणि खोल्यांचे भाडं मिळून दीड हजार रुपये दर महिन्याच्या पाच तारखेच्या आत द्यावेच लागतील.'' पंत.

''समजा, अगदी पाच तारखेच्या आत पैसे देणं जमलं नाही तर?'' वैशाली.

''तर ..... तर बँकेच्या व्याज दराप्रमाणं दंड द्यावा लागेल.'' पंत त्यांच्या खोलीत जाण्यासाठी वळले. त्याचवेळी शाम वैशालीला म्हणाला ''वैशू, डॅड म्हणतात त्याला होकार दे आणि मोकळी हो !''

''अरे व्वा ! वाडा तुझ्या मम्मीच्या मालकीचा आणि भाडेकरुंच्या अटी तुझे डॅडी ठरवणार?'' वैशाली.

''तुला काय माहीत वाडा कुणाच्या नावावर आहे?'' शाम.

''विचार तुझ्या मम्मीला. 'मला माहीत नाही' असं उत्तर मिळेल.'' वैशू.

क्षणभरानं 'मी वैशालीला तिच्या होस्टेलवर सोडून येतो' असं सांगून वैशाली आणि शाम बाहेर पडले.

क्षणभरानं पंत स्वयंपाकघरात आले आणि हसत हसत म्हणाले ''का हो? मी वैशालीशी स्पष्टपणे बोललो ते तुम्हाला आवडलं नाही वाटतं?'' पंत.

''माझ्या आवडी-निवडीचा प्रश्नच नाही. तुमच्या नजरेत पैसा महत्वाचा, हे पुन्हा एकदा उघड झालं.'' ममा.

''अर्थात ! आज-काल पैसाच सगळ्या दुनियेवर राज्य करतोय हे विसरु नका'' - पंत.

''माणूसकीच्या जोरावर अनेक श्रीमंतांची मगरुरी जनतेनं धुडकावून लावली आहे हे तुम्ही सुद्धा विसरु नका.'' - ममा.

''टाका, माझी मगरुरी जरुर धुडकावून लावा. पण ती मगरुरी तुम्हीच पोसली आहे हे लक्षात ठेवा ! माझ्या आंघोळीची तयारी करा ! मला ऑफिसला जायला उशीर होईल'' - पंत

''अंघोळीची तयारी तुमची तुम्हीच करुन घ्या.'' - ममा.

''उलट उत्तर द्यायची हिंमत कशी झाली तुझी?'' - पंत.

''तुमचा रागीटपणा, हेकटपणा मीच पोसलाय असं म्हणालात ना? मी आता माझ्यात सुधारणा करणार आहे असं समजा. मी शामचा व्यवसाय मार्गी लागण्याची वाट पहात होते. तुम्ही पाच लाखाचा चेक दिलात, शामला चांगलवाडीत दवाखाना सुरु करण्याची परवानगी दिलीत, आता मला कशाचीच चिंता नाही.'' ममा.

''मूर्ख आहात ! शाम चांगलवाडीला जाऊन, तिथल्या बॅंकेत खातं उघडून त्या खात्यात चेक भरेपर्यंत आठ दिवस जातील. तेवढ्या वेळात मी बॅंकेला आणि ऑफिसला कळवीन की त्या चेकचं पेमेंट करु नका.'' पंत.

''इश्शं ! असंही करता येतं हे मला माहीत होतं. म्हणून मी शामला सांगितलं की वैशालीला होस्टेलवर सोडून परतताना तो चेक तुझ्या इथल्याच खात्यात भरुन टाक'' ममा.

''माझ्याविरुद्ध कट-कारस्थानं करु लागतात? पण...'' पंत

''पुन: तेच. मी अडाणी, मूर्ख आहे असं तुम्हीच समजता ना? मग मला योग्य वाटलं ते केलं.'' ममा.

''ज्यादा शहाणपणा करु नका ! मी आंघोळ, कपडे करुन येईपर्यंत जेवण तयार ठेवा.'' पंत.

''सकाळपासून माझी पाठ आणि कंबर इतकी दुखतीय ... आज ऑफिसच्या कॅंटीनमध्ये खा काहीतरी'' ममा.

''ही पनवती माझ्याच पाठीमागे का लागलीय कुणास ठाऊक ! '' पंत.

''मी पण तोच विचार करत होते, हे दुष्टचक्र माझ्याच पाठीमागे का लागलंय ते देवालाच ठाऊक.'' ममा.

''काय म्हणालीस? मी दुष्ट-चक्र का? या दुष्ट चक्राची गती दाखवतोच तुला आणि तुझ्या देवाला.'' असं म्हणून पंतांनी हाताला लागेल ती वस्तू इकडं-तिकडं फकायला सुरुवात केली. दिवाणावरच्या गाद्या-उशा, शोकेस मधली खेळणी आणि हस्तकलेच्या वस्तू, पुस्तकं, पोथ्या, स्वयंपाक घरात जाऊन धान्याचे डबे, पिठाच्या बरण्या, ताटं, वाट्या, भांडी ... एखाद्या क्रूर शक्तीनं झपाटल्यासारखे पंत वागत होते. भांड्यांचा आवाज ऐकू आला तरी वाड्यातील एकही भाडेकरु शांताबाईंच्या चौकशीला आला नाही. काही वेळानं शांत झाल्यावर पंतानी कोट-टोपी चढवली, बायकोली तंबी दिली ''मी संध्याकाळी घरी येईपर्यंत सगळ घर स्वच्छ झालेलं दिसलं पाहिजे मला.'' पायात चपला सरकावून पंत निघून गेले.

शामची आई तशीच बसून होती. घर आवरण्याचा कणभरही प्रयत्न केला नाही. क्षणभरानं ती उठली, रात्रीचं जेवण उरलं होतं ते गरम करु खाल्लं, नवऱ्यानं केलेल्या पसाऱ्याच्या मधोमध खुर्ची टाकून जप करत बसली. क्षणभरानं पंतांच्या लोखंडी कपाटाशी खुडबुड केल्याचा आवाज आला. जप करता करता ती उठली. पंतांच्या खोलीत गेली. 'रागाच्या भरात किल्ल्या घरीच विसरले वाटतं' असा विचार करुन किल्ल्या काढून घेतल्या आणि स्वयंपाक घराकडं वळणार, तेवढ्यात तिनं विचार बदलला आणि कपाट उघडलं. एकापाठोपाठ एक धक्के खाण्याची तिच्यावर पाळी आली.

अगदी वरचा कप्पा शंभर, पन्नास आणि दहा रुपयांच्या जुन्या, नव्या नोटांच्या बंडलांनी ठासून भरला होता. खालच्या लॉकरमध्ये सोन्या-चांदीच्या दोन दोन लगडी आणि घडवलेले दागिने एका प्लास्टीकच्या पिशवीत कोंबले होते. त्याच्या खालच्या खणात तीन चार फायली होत्या. शांताबाईंनी त्या फायली चाळून बघितल्या आणि त्यांना कळून चुकलं की तिच्या नवऱ्याला दहावीत दोनदा नापास झाल्यामुळं शाळेनं काढून टाकलं होतं ! शामच्या आजोबांनी आपली प्रतिष्ठा वापरुन, कलेक्टरच्या ऑफिसात, प्रतिबंधित वस्तूंचं (रेशनिंगचं) वाटप करण्याच्या खात्यात चिकटवून दिलं होतं. इतकी वर्ष झाली तरी पंत अजून तेच काम करत होते.

शामच्या आईची खात्री पटली की सर्व बाजूनी अपयशी ठरलेला आपला नवरा. ते अपयश लपवण्यासाठी आणि आपला दबदबा कायम राखण्यासाठी 'मी एल.एल.बी. आहे, उप जिल्हाधिकारी आहे' असं सांगत सुटतो आणि त्यांच्या उमद्या व्यक्तिमत्वामुळे लोकांचा विश्वासही बसतो ! मामंजीनी आमचा वाडा माझ्या आणि शामच्या नावावर करुन ठेवला तरी पंत भाडेकरुंना शिवीगाळ करुन, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागायला भाग पाडतात त्याचं कारण हेच असावं. बरं झालं हे सगळं आज कळलं.

शांताबाईंनी कपाटातल्या वस्तू जिथं होत्या तिथं ठेवल्या, माजघरात आल्या. नवऱ्यानं फकाफक केलेल्या वस्तूंकडं दुर्लक्ष केलं आणि दिवाणावर अंग टाकलं.

तीन-साडेतीन वाजता 'ताई... ताई...' अशा हाका मारत बंडूमामानं माजघरात प्रवेश केला. घरभर पसरलेल्या वस्तू बघून मामा हबकून गेला. तोपर्यंत शांता उठून बसली होती. तिनं विचारलं,

''दादा, तू केव्हा आलास, मला कळलंच नाही?''

''हा काय, आत्ताच येतोय ! पण ताई, सगळ्या वस्तू ..... हा काय प्रकार आहे'' - बंडूमामा

''हे तुझ्या मेव्हण्यांच्या रागाचं प्रदर्शन मांडलं आहे.'' शांतानं हसत हसत सांगितलं.

''पण एवढा राग कशासाठी?'' बंडूमामा

''त्यांच्या आंघोळीची तयारी करण्यास नकार दिला म्हणून !'' शांता

''काय? एवढ्या-तेवढ्या कारणावरुन इतका जळफळाट? ताई इतकी वर्ष तू त्यांची कामं साभाळलीस, मग आजच नकार का दिलास?'' बंडूमामा.

‘‘कारण माझी पाठ आणि कंबर खुप दुखत होती. तसं मी त्यांना सांगितलं. लगेच त्यांचा राग उफाळून आला. हाताला लागेल ती वस्तू फकायला सुरुवात केली - तू असं केलं असतंस कधी?’’ शांता.

‘‘छे, कधीच नाही. घरातल्या कामाला मदत करण्याचे संस्कार संघानं केलेत आमच्यावर’’ बंडूमामा.

‘‘यांना शाखेत घेऊन जा कधीतरी. कळू दे त्यांना स्वत:ची छोटी मोठी कामं स्वत: करण्यात किती आनंद असतो ते ! ’’ - शांता

‘‘त्याला खूप उशीर झालाय ! ... पण मला सांग, स्वयंपाकघरातले डबे, बरण्या या खोलीत आणून त्यातलं सामान खोलीत ओतून देण्याचं कारण काय?’’ शांता.

‘‘कारण काय असणार रे, मला जास्तीत जास्त त्रास व्हावा. ते मला पनवती म्हणाले आणि मी दुष्टचक्र माझ्या मागे लागलंय म्हणाले, हे कारण असेल.’’

‘‘असो, चल मी तुला मदत करतो. हा सगळा पसारा आवरुन ठेवूया’’

‘‘पतांबद्दल इतका कळवळा का आलाय तुला? तेवढी लायकी नाही त्यांची ! ’’

‘‘ताई, अगं काय बोलतीयस?’’ बंडूमामा

‘‘आश्चर्य वाटलं ना? इतके दिवस मलासुद्धा माहीत नसलेल्या गोष्टी अचानक उघड झाल्या, ते कपाटाच्या किल्ल्या विसरुन गेले म्हणून. दादा तुला माहित आहे, माझा नवरा किती शिकलाय?’’ शांता.

‘‘भाऊजी बी.ए., एल.एल.बी. आहेत’’ बंडू

‘‘साफ खोटं ! दोनदा नापास झाल्यामुळं शाळेनं त्यांना दहावीत असतानाच काढून टाकलं होतं. एल.एल.बी. सोड एसएससी बोर्डाचा साइन बोर्ड सुद्धा पाहिला नसेल माझ्या नवऱ्यानं ! ’’ शांता

‘‘मग कलेक्टर कचेरीत नोकरीला कसे लागले?’’ बंडू

‘‘माझ्या मामंजींची कृपा ! त्यांच्या ओळखीचा वापर करुन मामंजींनी ह्यांना रेशनिंग खात्यात, मापं टाकण्याच्या कामावर चिकटवलं. गेली वीस वर्ष ते तेच काम करत आहत. वजनात दांडी मारुन त्यांनी हजारो रुपये कमावले आहेत.’’ शांतानं कपाट उघडून दाखवलं ‘‘दादा, बघ यांच्या कर्तृत्वाचं फळ ! ’’

‘‘ताई, पण या गोष्टी तुला कशा कळल्या?’’ बंडू.

''रागाच्या भरात किल्ल्या कपाटालाच विसरुन गेले आणि सगळं उघडं झालं, आता काय करायचं?'' शांता.

''आता हा पसारा आवरुन ठेवायचा ! तुझी पाठ दुखत असेल तर कोणती वस्तू कुठं ठेवायची ते मला सांग आणि तू आराम कर.'' बंडू

''दादा, तू आणि शाम घरी आलास की मी राग, विवंचना, दुखणं-खुपणं सगळं विसरुन जाते.'' शांता

त्यानंतर गप्पा मारत, हसत हसत दोघांनी सगळ्या वस्तू जागच्या जागी ठेवून दिल्या. पंधरा-वीस मिनीटात माजघर पूर्वीसारखं दिसायला लागलं. शांताबाईंनी चहाचं आधण गॅसवर चढवलं. मामा चटई टाकून, मांडा ठोकून आणि पिशवीतून तंबाखूचा पाऊच काढून आरामात बसला. त्याचवेळी शाम आणि वैशालीनं प्रवेश केला. शांतानं मामाला हटकलं ''दादा, मी चहा टाकलाय. लगेच तंबाखूचा बार भरु नकोस.''

त्यावर मामा म्हणाला ''ताई तुला माहीत नाही. माझ्या जबड्यात दोन चॅनल आहेत. एक चॅनलमधे बार भरला तरी दुसरा चॅनल खाण्या-पिण्यासाठी मोकळा असतो.'' - बंडू

त्याच सुमारास, हसत हसत, मामाजवळ बसत शाम म्हणाला

''मामा, माझ्या मेंदूत सुद्धा दोन चॅनल्स आहेत. पहिला चॅनल तू, ममा, लेक्चरर्स शिकवतील ते साठवून ठेवतो आणि दुसरा चॅनल पपांचं बोलणं लगेच डिलीट करुन टाकतो.''

शामसकट सगळे हसत सुटले. शामच्या पाठीवर हलकी चापटी मारुन शांता म्हणाली ''शाम, हळू बोल. ह्यांची घरी यायची वेळ झालीय.''

त्याचवेळी पंतांच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आला ''दुर्गे, तुझं कारटं बघ, भर चौकात मुतून त्यात हात आपटत बसलं आहे. पोरांना सांभाळायची अक्कल नसेल तर पोरं जन्माला तरी कशाला घालता?'' पंत

त्याचवेळी दुर्गा आणि शामनं दोन बाजूनं प्रवेश केला. पंतांचं ओरडणं चालूच होतं ''भैरोसिंग कुठाय? रात्रपाळीचं निमित्त करुन घोरत पडला असेल. दुर्गे, ते मूत धून काढ आणि फरशी पुसून घे कापडानं.'' पंत.

''जी'' असं म्हणून लादी पुसणं आणण्यासाठी निघून गेली. पंत पाय आपटत त्यांच्या खोलीत निघून गेले. शाम बच्चूला घेऊन माजघरात आला. शांताबाई चहाचा कप घऊन पंतांच्या खोलीकडं निघाली होती. हात पुढं काढून बच्चू 'जी...' असं ओरडला. शांता म्हणाली,''मी आजोबांना चहा देऊन येते. मग तुला घेते हं !'' शाम बच्चूला घेऊन मामाजवळ बसला आणि विचारलं ''बच्चू, हे कोण आहेत?''

'मा' बच्चूनं उत्तर दिलं.

''मी कोण आहे?''

'दा ...'

नंतर वैशालीकडं बोट दाखवून विचारलं ''ही कोण आहे?''

करणनं क्षणभर वैशालीकडे बघितलं आणि नंतर स्वत:च्या कुल्याला टोचल्यासारखं करुन शामच्या गळ्याला मिठी मारली. आता आश्चर्य करण्याची पाळी वैशालीची होती. वैशाली म्हणाली,''शाम, किती हुशार आहे हा मुलगा. तू चांगलवाडीला गेला होतास त्यावेळी मी करणला पोलिओचं इंजेक्शन दिलं होतं. ते अजून लक्षात आहे त्याच्या.'' वैशाली.

क्षणभरानं करणला घेऊन शाम वाड्याच्या चौकात आला. तिथं दुर्गाची पुन्हा भेट झाली. दुर्गा म्हणाली,''दादा, दोन दिसानं तुम्ही चांगलवाडीला जाणार म्हणे'' दुर्गा.

''हो. तिथं मी दवाखाना सुरु करणार आहे.'' शाम.

''मंग बच्चूला पन बरुबर घिऊन जा ! '' दुर्गा.

''मी दवाखाना संभाळू का बच्चूला संभाळू?'' शाम.

''मला म्हनायचं हुतं, आमा तिघास्नी घेऊन जा.'' दुर्गा

''तुम्ही दोघं तिथं येऊन काय करणार? चांगलवाडोत चोऱ्या-माऱ्यांचं प्रमाण खूप कमी आहे. त्यामुळं रात्री शिट्या मारत राखण करण्याची पद्धत चांगलवाडीत नाही.'' शाम.

''अवो... दुसरं काम मिळालं न्हाई म्हणून मालक गुरख्याचं काम करत्यात. न्हाईतर सुतारकाम, बागकामात त्यांचा हात धरणारा कुणी सापडणार न्हाई. करवत, पटाशी, रंधा, टिकाव, फावडं समदी हत्यारं धूळ खात पडलिया घरात'' दुर्गा.

''भैरोसिंग याबाबत माझ्याशी कधीच बोलला नाही.'' शाम

''बोलता आलं तर बोलनार ना?'' दुर्गा

''म्हणजे?'' शाम

''म्हंजी, माझे मालक दहा-बारा वर्षाचं असताना पोरापोरात कडाकडी भांडन झालं. एका पोराच्या बापानं ह्यांच्या टाळक्यात सोटा मारला. तवा पास्नं ह्यांची बोलती बंद झाली. माजं लगीन झाल्यावर मला कळलं. पन त्यांच्या हातात हुनर होती. म्या त्यास्नी सोडलं न्हाई. बच्चू झाल्यावर अलिकडं लेकराशी खेळताना ये, पळ, जा असे सोपे सोपे सबूत बोलायला लागलेत. पन काल रातच्याला मला म्हनाले डॉक्टर बाबू वाडा सोडून जाणार असतील तर आपुन दुसरं काम शोधू.'' दुर्गा.

क्षणभर विचार करुन शाम म्हणाला,''एकूण काय, तुम्हाला या वाड्यात रहायचं नाही. ठीक आहे. दोन दिवसानं मी टेंपो बोलावला आहे. तू सामानाची बांधाबांध करुन ठेव. तुम्ही तिघं, मी, वैशाली - आपण सगळेच जाऊ चांगलवाडीला'' शाम.

''डॉक्टरीन बाई पण येनार आपल्यासंगं?'' दुर्गा.

''तिच्या आजोबा-आजींच्या वाड्यातच राहणार आहोत आपण. आजोबा आजींना भेटायला ती येणारच ! '' शाम.

वरील प्रसंगानंतर प्रत्येकजण आपापलं सामान बांधण्यात, वैशालीचं सामान वाड्यावर आणून टाकण्यात, एकमेकाला सूचना देण्यात, वाटेनं जाताना भूक लागली तर तोंडात टाकण्यासाठी चिवडा-फरसाण बांधून घेण्यात आणि एकुलता एक मुलगा दूर जाणार या विचारानं, डोळ्यातले अश्रू कुणाच्या नकळत पुसण्यात दिवस गेले ते कुणालाच जाणवलं नाही.

दोन दिवसांनी सकाळी बरोबर आठ वाजता, बंडूमामाच्या ओळखीचा 'परमार ट्रॅव्हल' कंपनीचा एक टेंपो, आणि सहा आसनी प्रवासी गाडी वाड्यासमोर उभी राहिली. शाम, भैरोसिंग आणि दुर्गा आळीपाळीनं एक एक सामान आणून देत होते आणि बंडूमामा टेंपोत चढून, मोठं सामान खाली, हलकं सामान त्याच्यावर अशा पद्धतीनं सामान जुळवत होते. दोन पिशव्या मामांच्या हातात देऊन दुर्गा म्हणाली,'' मामासाहेब, या दोन पिशव्या दोन ट्रंकांच्या मधे ठेवा. बच्चूच्या चड्या, शर्ट आन् दुधाची बाटली हाय त्यात.'' दुर्गा.

''अगं मग त्या पिशव्या जवळ घेऊन बस ना? त्या वस्तू कधी लागतील सांगता येणार नाही.'' मामा.

''त्याची सोय माज्या पर्समंधी केली हाय.'' दुर्गा

‘‘बच्चू गर्र गर्र असा आवाज काढतोय. कुठाय तो?’’

‘‘आजी त्याला दूध पाजतायत. आजींच्या मांडीवर दूध पितानाच त्याला असले नखरे सुचत्यात.’’ दुर्गा.

‘‘तुम्हो सगळे चांगलवाडीला गेलात की ताईला खूप सुनं सुनं, एकटं एकटं वाटणार आहे.’’ बंडू.

‘‘व्हय. पन् डॉक्टरीण बाई, तुमी सावरा त्यास्नी.’’ हे बोलताना दुर्गाचा गळा दाटून आला. बंडूमामानी दुर्गाची समजूत काढली. त्याचवेळी बच्चूचं तोंड पुसत पुसत शांताबाई बच्चूला घेऊन दुर्गाजवळ आली आणि म्हणाली,‘‘ दुर्गा, घे बाई तुझं खट्याळ लेकरु. चांगलवाडीला गेल्यावर त्याला नीट सांभाळा. तू कारमधे बस, नंतर बच्चूला तुझ्याजवळ देते.’’ शांता.

दुर्गा स्टेशन वॅगनमध्ये चढणार तेवढ्यात पंत तरातरा आले आणि ओरडून म्हणाले,‘‘दुर्गे.. थांब. माझ पैसे बुडवून पळून जाण्याचा बेत आहे तुझा. पण मी तुला असं जाऊ देणार नाही. भाडे कराराप्रमाणे तू मधेच गाळा सोडून गेलीस तर तीन महिन्याच्या भाड्याइतकी रक्कम मालकाला द्यावी असं लिहीलं आहे. शंभर रुपये टाक आणि मगच गाडीत चढ ! ’’ पंत. बंडूमामा मधे पडला आणि म्हणाला ‘‘पंत, गरीब बाईला का उगीचा छळताय? तुम्ही म्हणताय ते खरं आहे. पण दुर्गानं करार कुणाशी केलाय? घर मालकिणीशी ! मग दंड घरमालकिणीला मिळाला पाहिजे.’’ बंडू.

‘‘बंड्या, मला शहाणपणा शिकवू नकोस !’’ पंत.

तेवढ्यात शांता म्हणाली,‘‘दादा, बरं झालं मला आठवण दिलीस ! बच्चूला दूध पाजा असं सांगायला दुर्गा आली होती तेव्हाच तिनं शंभर रुपये माझ्याकडे दिले होते. हे घ्या’’ असं म्हणून शांतानं कनवटीचे शंभर रुपये काढले आणि पंताच्या हातात दिले. दुर्गाच्या डोळ्यात पाणी तरळू लागलं. ती म्हणाली,‘‘वहिनी साहेब, तुमचे किती उपकार मानू....’’ दुर्गा.

शांताबाईंनी तिच्या पाठीवर थोपटलं आणि म्हणाल्या,‘‘ अं हं, डोळ्यात पाणी आणायचं नाही ! शामबरोबर जातायनं दोघं, त्याला मदत करा, बच्चूला चांगलं सांभाळा आणि आनंदात रहा.’’ शांता.

भैरोसिंग, दुर्गा, शांताच्या, मामांच्या पाया पडले, पाठापाठ शाम आणि वैशालीनंही मम्मी-पप्पांचा निरोप घेतला. वाड्यातल्या स्त्री-पुरुषांनी शामला टाटा केलं. सगळे आपापल्या सीटवर बसले. दुसऱ्या क्षणाला स्टेशन वॅगन आणि टेंपो दिसेनासे झाले. वाड्यातली मंडळी आपापल्या खोल्यांकडं जाण्यासाठी वळणार तेवढ्यात पंत लगबगीनं आल आणि म्हणाले ‘‘हे काय? मी येईपर्यंत शामला दम धरता आला नाही?’’ या प्रश्नावर शांता आणि बंडूमामानी काहीच उत्तर दिलं नाही. पण एक भाडेकरु तोंड लपवून म्हणाला,‘‘यालाच म्हणतात वरातीमागनं घोडं.’’

रागानं लालबुंद होऊन पंत म्हणाले,''अरे बोलायचं असेल तर माझ्या तोंडावर बोला ना ! माझ्यामागं कुचकुच करुन, दुगाण्या झाडून, गाढवपणा सिद्ध करु नका.'' पंत.

पंतांचा संताप बघायला शांता, बंडूमामा, भाडेकरु कुणीच थांबलं नाही. फ़त्कारत, पाय आपटत पंत स्वयंपाकघरात गेले आणि तावातावाने म्हणाले ''तुम्हीपण शामला सांगू शकला नाहीत की पप्पा येईपर्यंत थांब म्हणून?'' पंत.

''आम्ही लाख सांगितलं, पण पॅसेंजर बसले आणि टेंपोला कुलूप घातलं की ते कशाला थांबतील?'' शांता

''मला शहाणपणा शिकवू नका.'' पंत.

''पंत, तुम्ही दोघंच आता या घरात राहणार आहात. ताईला समजून घ्या आणि तिच्याशी जरा सामोपचाराने वागा.'' बंडू.

''कां? तू कुठं लंडनला जाणार आहेस का?'' पंत

''लंडनला नाही, माझ्या बंगल्यातच राहणार आहे. पण ताईला असाच त्रास होत राहिला तर मी तिला माझ्या घरी घेऊन जाईन.'' बंडू.

''उत्तम ! चार दिवसानं घेऊन जाणार असशील तर आजच घेऊन जा.'' पंत.

''माझ्या हक्काचा एवढा मोठा वाडा असताना मी माझ्या भावाकडे बरी जाईन'' शांता.

''माझ्या बापानं हा वाडा तुझ्या नावानं करुन दिला म्हणून शेफारुन जाऊ नकोस. या वाड्यात मी म्हणेन ती पूर्व दिशा मानली जात होती आणि पुढंही मानली जाणार आहे.'' पंत.

''बघू काय होतंय ते, घोडा मैदान जवळच आहे..... दादा, सकाळी लवकर आला होतास. आज रजा घेतली असलीस तर जेवण करुन, थोडा आराम करुन मगच बंगल्यावर जा.'' शांता.

''नको, मावशींना सांगितलं नाही. सैपाक करुन माझी वाट बघत बसतील, बरं, येतो मी.'' दोघांना नमस्कार करुन बंडू निघून गेला.

✻✻✻✻✻

चांगलवाडीला पोहोचायला मंडळींना चार-पाच तास लागले. बडव्यांच्या जुनाट वाड्यासमोर टेंपो आणि स्टेशन वॅगन थांबली आणि त्या वाड्यात सळसळ माजल्याचा भास झाला. वाड्याला दिलेला पांढरा फिकट निळा रंग बघत बघत आणि धावतच वैशाली वाड्यात शिरली आणि आजोबांना नमस्कार करुन आजीला मिठी मारुन म्हणाली,''आजोबा, आजी. मला डॉक्टर कोकिळांच्या 'आय हॉस्पिटल'मध्ये असिस्टंट सर्जन म्हणून नोकरी मिळाली आहे. वीस हजार रुपये पगार आणि ऑपरेशनमधे मदत केली तर प्रत्येक ऑपरेशनचे पाच हजार असे सरासरो एकूण पंचवीस हजार रुपये मिळतील. मी तुम्हाला आता दरमहा सात-आठ हजार रुपये पाठवू शकेन. तेव्हा आता भिक्षुकी बंद ! घरबसल्या पत्रिका बघून सल्ला देणं चालू ठेवलंत तरी चालेल.'' वैशाली.

''वैशू, ह्यांना भलता सल्ला देऊ नकोस. दोन-तीन तास बाहेर असतात तेवढी माझ्या मागचो कटकट कमी होते.'' आजी.

''ऐक ! तुझ्या आजीला माझी कटकट वाटते, असो. तुला होस्टेल सोडावं लागलं असेल. राहण्या-जेवणाची काय व्यवस्था केली आहेस?'' बडवे गुरुजींनी प्रश्न केला.

''डॉक्टर शाम आपल्या वाड्यात दवाखाना काढणार आहे. साताऱ्याच्या घरातल्या त्याच्या दोन खोल्या रिकाम्याच आहेत. मी तिथं राहणार आहे. माझं सामान इकडं यायच्या आधी त्या खोल्यात नेऊन सुद्धा टाकलं आहे. माझी बिलकुल काळजी करु नका.'' वैशाली.

''पण काय गं, तुझ्या मित्राबरोबर आणखी एक कुटूंब आलेलं दिसलं. कोण आहेत ते?'' आजी.

''आजी, साताऱ्याला ते शामच्या वाड्यात रहात होते. छोटा मुलगा आहे दीड वर्षांचा. आम्ही सगळे त्याला बच्चू म्हणतो. त्याचे वडील भैरोसिंग आणि आई दुर्गा. भैरोसिंग शामला दवाखाना उभा करायला मदत करेल, बागेची मशागत करेल, अशा बोलीवरच आणलंय त्यांना.'' वैशाली.

''आणि बच्चू का कोण तो? तो काय करणार?'' आजी

''आजी, अगं छोटं बाळ आहे तो. तो काय करणार ! '' वैशाली.

त्याचवेळी शाम, त्याच्या कडेवर बच्चू आणि मागं भैरोसिंग आणि दुर्गा यांनी प्रवेश केला. बच्चूनं प्रश्न केला ''दा... जी?'

''हो, ही आजी आणि ते आजोबा. आपण सगळे त्यांना नमस्कार करु या ! '' शाम म्हणाला.

भैरोसिंग आणि दुर्गानं आजोबा आजींच्या पायावर डोकं टेकलं. बच्चू शामच्या कडेवरनं एकदम खाली उतरला आणि रांगत रांगत जाऊन दोघांच्या समोर डोकं टेकलं. दोघांनी कौतुक केलं, आशिर्वाद दिले. आजी म्हणाली,''अगोबाई, डॉक्टरांच्या आईवडिलांची खूप सवय दिसतीय या मुलाला !''

''हो, विशेषत: आईची. दुर्गा कामात असली की ती बच्चूला माझ्या आईजवळ सोडून जायची .... गुरुजी, दुर्गा घरातली, म्हणजे झाडलोट, स्वयंपाकपाणी वगैरे आणि भैरोसिंग माझ्या दवाखान्याची सुतार कामं आणि बागेची निगा राखेल. त्या कुटूंबाला तुमच्या आऊट हाऊसमध्ये राहण्याची परवानगी द्यावी. आऊट हाऊसचं भाडं किती ते सांगा. महिन्याच्या महिन्याला मी ते देत जाईन.'' शाम.

''डॉक्टर, तुम्ही खूपच व्यवहारी बोलताय. चांगलवाडीत इतकी व्यवहारी भाषा चालत नाही. तुम्ही आधीच पस्तीस हजार रुपये दिले आहेत. दवाखाना सुरु करा, आऊटहाऊस साफ करुन बच्चूच्या आईवडिलांना तिथं राहू द्या. भाड्याबिड्याचा विचार नंतर करु.'' गुरुजी.

''सगळ्या गोष्टी आधीच स्पष्ट झाल्या म्हणजे नंतर आपल्या संबंधात गैरसमज होणार नाही.'' शाम.

''तुम्ही म्हणताय ते ही बरोबर आहे. भैरोसिंग तुम्हाला मदत करणार आणि बागेची मशागत करणार आणि दुर्गा आमची आणि वाड्याची काळजी घेणार, तसंच स्वयंपाकपाणी सांभाळणार. या सेवाकार्याचं मोल किती आणि कसं ठरवणार? वाड्याची किरकोळ दुरुस्ती, रंगसफदी आणि दोन्ही मीटरचा खर्च तुम्ही आधीच दिला आहे. तेव्हा आता तुम्ही दर महिन्याला, दवाखान्याच्या भाड्यापोटी तीन हजार रुपये द्यावेत आणि जेवणा-खाण्याचा खर्च माणशी वाटून घेऊ.'' गुरुजी.

''ठीक आहे. दुर्गा, आऊटहाऊस साफ करुन तुझा संसार तिथं मांड.'' शाम.

त्यानंतर इतर बाबतीत लक्ष घालायला तो मोकळा झाला. त्यातली पहिली बाब होती गोदाक्कांना आणि वाघूदादांना भेटण्याची. शामनं त्याची मोटारसायकल काढली आणि वाघूदादांच्या बंगल्यावर गेला.

वाघूदादांच्या बंगल्यावर गोदाक्का आणि वाघू-राघूचं कुटूंब अशी बरीच माणसं जमली होती. वाघूनं बोलायला सुरुवात केली.

''आपुन समदी मंडळी जमली आहोत त्याचं कारन म्हंजी डॉ.शाम चांगलवाडीत आला आहे आन् बडवे गुरुजींच्या वाड्यात त्यो दवाखाना सुरु करनार हाय. शाम आपलाच मानुस हाय. आपल्याला काई दुखलं खुपलं तर त्याच्याकडून दवा-दारु घ्यायची आन् त्याची फो ताबडतोब दिऊन टाकायचो. आपले नातेवाईक, मित्रमंडळी,

शेजारी-पाजारी, त्यास्नी समजवायचं की आता दवा-दारुसाठी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या गावाला जायचं कारन न्हाई ! '' वाघू.

राघूच्या दोन नंबरच्या मुलीनं - यमुनानं विचारले ''काका, डॉक्टरांच्या दवाखान्यात मदतीसाठी नर्स लागेलच ना?'' यमुना.

''नर्स ठिवणार का न्हाई ते त्योच ठरवील. तू का इचारतियास? .. का रं दोस्ता?'' वाघू.

''दादा, तिच्या साळेनं सा म्हैन्याचा नर्सिंग कोर्स सुरु करण्याचे ठरविलं हाय. त्यो कोर्स करण्याची परवानगी द्या असा धोसरा लावला हाय तिनं आमच्या मागं.''

''आरं मंग घाल की तिला त्या कोर्सा मंदी. इचार कसला करतुयास?''-वाघू.

''इचार म्हंजी ... चार महिन्यानं तिला आठराव्वं वर्स लागंल. तिच्या लग्नाचा इचार करायला हवा ! '' राघू.

''म्या लगीन करनार न्हाई अन् डॉक्टर सायबांकडं नोकरीपन करनार न्हाई ! करडा मागं फिरत ऱ्हाते जिंदगीभर.'' यमुना

''चांडाळणी, तोंड आवर, मोठी मानसं बोलत असताना पोराटोरानी त्वांड उघडू नये.'' जनीनं यमुनाला दम भरला. यमुना रडव्या स्वरात म्हणाली,''ताईला त्येवडं तिच्या मनासारखं करु दिलंत, आन् मी नर्सिंगचा कोर्स करायचा म्हनतिया तर माज्यावरच आग पाखडताय. मी जातेच कशी.'' यमुना उठून तरातरा जाऊ लागली. शामची आणि तिची दारातच टक्कर झाली. ''अगो बाई' म्हणून यमुना दारातच थबकली. शामनं विचारलं ''यमुना, घाई घाईनं कुठं निघाली होतीस?''

''आमची साळा सा म्हैन्याचा नर्सिंगचा कोर्स सुरु करणार आहे. मी बाबांना म्हणाले की मला त्यो कोर्स करण्याची परवानगी द्या. तर आईनं मागं लगीन करन्याचा विषय काढला पन् मला तुमच्या दवाखान्यात नोकरी करायची हाय.'' यमुना.

''पण मी दवाखान्यासाठी नर्स ठेवणार आहे असं तुला कुणी सांगितलं?'' शाम.

''सांगितलं न्हाई कुनी. माझं मीच ठरवलं.'' यमुना

''राघ्या, ह्ये सगळंच झंगाट दिसतया'' वाघू

राघूनं आपलं कपाळ बडवून घेतलं. क्षणभरानं शाम म्हणाला,''यमुना, पण माझ्याकडं पेशंट येतीलच याची खात्री नाही. कारण त्यांना तालुक्याच्या किंवा जिल्ह्यातल्या डॉक्टरची सवय झाली आहे. त्यामुळं माझा दवाखाना म्हणजे 'घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी भाजायचा' असा प्रकार होणार आहे. माझी प्रॅक्टीस चालली नाही तर तुला पगार कुठून देऊ?'' शाम.

''दोन-चार महिने पगार दिला नाही तरी चालेल ! '' यमुना.

''राघू दादा, वहिनीसाहेब, तुम्हीतरी यमुनाला समजावून सांगा.'' शाम.

''आमी दोगांनी तिच्या हट्टाफुडं हात टेकलं हैती ! '' राघू.

''तुमी असं गुळमुळं काय बोलताय? मुस्काट फोडून बोलती बंद करा तिची'' सौ.राघू

''तू गप् गं ! पोरीला खाऊ-पिऊ घालून वाढवलं त्ये काय मुस्काट फोडन्यासाठी? आन् असली मुस्काट फोडलेली पोरगी मला सून म्हणून नको असं वाघूदादा म्हनाले तर पोरीला काय विहिरीत ढकलून द्यायचं. जो तो आपलं नशीब घेऊन येतुया. नशिबात लिवलं असल तसं व्हनारच !'' राघू.

क्षणभर कुणीच काही बोललं नाही. क्षणभरानं शाम म्हणाला,''राघूदादा, सगळ्या गोष्टी नशिबावर सोडून सोडून कसं चालेल? देवानं माणसाला बुद्धी कशासाठी दिली आहे? सगळं नशिबावर सोडलं तर माणसाच्या प्रयत्नाला आणि धडपडीला अर्थच उरणार नाही. म्हणून माझ्या मते यमुनाला तो कोर्स करु दे. शिक्षण वाया जात नाही. मधल्या काळात मला खूप कामं उरकायची आहेत. दवाखान्याचं फर्निचर करुन घ्यायचं आहे. चांगलवाडीतल्या सगळ्यांना निमंत्रणं द्यायची आहेत. गोदाक्काच्या हातून दवाखान्याचं उद्‌घाटन करुन घ्यायचं आहे. या सगळ्या कामाला चार पाच महिने लागतीलच. तोपर्यंत यमुनाचा कोर्सही संपेल.'' शाम.

बायकोकडं बघून राघू म्हणाला,''ऐका, याला म्हनत्यात हुशारी आन् श्यानपन. शामराव, आक्का ज्या कामाला हात घालील त्याचं सोनं होनारच. लई बरकत हाय आक्काच्या हातात .... यमे, शामरावांनी तुझ्या बाजूनं कौल दिला आहे. त्यास्नी गोड-धोड, च्या-पानी काई द्याल का न्हाई !!'' राघू.

सौ.वाघू आणि यमुना पटकन उभ्या राहिल्या. सौ.वाघूंनी विचारलं ''डॉक्टर भाऊजी, तुम्हाला बेसनाचा लाडू आवडतो ना?'' ''बेसनाचा, भाजलेल्या कणकीचा, कुस्करलेल्या पोळीचापण लाडू आवडतो. चावताना दाताला त्रास होणार नाही असं काहीही चालेल.'' शाम.

सौ.वाघू आणि यमुना स्वयंपाकघरात गेल्या. त्याचवेळी गोदाक्काचा हात धरुन आणि ट्रान्झिस्टर कानाला लावून शंकरनं हॉलमध्ये प्रवेश केला. गोदाक्काला बघून सगळी मंडळी तिच्या पाया पडली. आक्कानं विचारलं,

''तू कवा आलास रं लेकरा? बाड-बिस्तरा घेऊन आलास ना?'' गोदाक्का.

''हो आत्या ! '' शाम

''मंग आता दवाखाना कधी सुरु करनार?''

''फर्निचर आणि किरकोळ दुरुस्त्या करायला चार-पाच महिने लागतील. ती कामं उरकली की चांगला दिवस बघून तुझ्या हस्ते दवाखान्याचं उद्‌घाटन करु'' शाम.

''आरं माज्यासारक्या रंडकी कडून ओपनिंग कशाला करवतोस? तुज्या वाड्याचा मालक चांगला पंडीत हाय, त्याला बोलाव. त्यो न्हाई म्हनाला तर पंचायत समितीचा सभापती येतोय का बघ. त्यानंबी नकार दिला तर जिल्हादिकारी, त्याला गळ घाल.'' आक्का. ''त्या सगळ्या अधिकाऱ्यांना मी स्वत: जाऊन निमंत्रणपत्रिका देणार आहे. पण उद्‌घाटनाची फोत तुझ्या हातानंच कापली गेली पाहिजे. वाघूदादा मी म्हणतोय ते बरोबर आहे ना?'' शाम.

''लाखमोलाचं बोलतुयास ! आक्का, शामराव डॉक्टरी शिकायला लागले तवापास्नं तू त्यांची धडपड, कष्ट बघितले हायेस. म्हणून तूच त्यांच्या दवाखान्याची फोत कापली पायजेस.'' वाघू.

''तू गप रं मुड्या ! '' गोदाक्का.

''भलेऽऽ, ऐका, या पोराला लेकरा, शामराव, डॉक्टर म्हनतियास, आन् मला मात्र वाघ्या, मुड्या .....'' वाघू.

''आरं तसं बोलायची सवय झालिया. मला म्हनायचं व्हतं की थोरामोठ्याच्या हातानं फोत कापली की पंचक्रोशीत बभ्रा लवकर होतुया.'' आक्का.

''आक्का, जिल्ह्यातल्या एक दोन पेपरवाल्यांना च्या-पानी दिलं की शामरावांच्या दवाखान्याची बातमी आख्ख्या महाराष्ट्रात पोचल...'' वाघू.

''मग ठरलं तर, माझ्या दवाखान्याचं उद्‌घाटन गोदाक्कांनी करायचं !'' शाम.

तिथं जमलेल्या लोकांनी टाळ्या वाजवून त्या प्रस्तावाला संमती दिली. नंतर शाम वाघूदादांना म्हणाला, ''दादा, मला आणखी दोन कामं करायची आहेत. फर्निचर करण्यासाठी काही सामान विकत घ्यायचं आहे आणि बँकेत अकाऊंट उघडायचा आहे.'' शाम.

''फर्निचरसाठी काय लागनार हाय त्याची यादी केलीय का?''

शामनं यादी वाघूच्या हातात दिली. यादी वाचून वाघू म्हणाला ''ही यादी माहेश्वरी टिंबर मार्टला देऊ. माझ्या बंगल्याचं लाकूड काम माहेश्वरीनंच केलं होतं. त्यो माल घरी पोचतं करील. बिल सवडीनं दिलं तरी चालेल.''

''सवडीनं म्हणजे बँकेत अकाऊंट उघडला आणि चेक-बुक मिळालं की दुसरे दिवशी मी चेक देईन.''

वाघू आणि शाम 'माहेश्वरी टिंबर मार्ट' मधे पोहाचले, ओळख-पाळख झाली. शामनं यादी मालकाकडं दिली, आणि बिल दोन चार दिवसानं देईन असं आश्वासन दिलं.

''अरे.... तुमी वाघूदादाचे पावणे. वाघूदादाचा आन् आमचा देवाण-घेवाणीचा व्यवहार दहा वर्सापासून चालू आहे. काय काळजी करु नका. माल उतरवून घ्यायला घरी कुणी असेल ना?''

''माझा माणूस असेल, त्याचं नाव आहे भैरोसिंग.''

एक मोठ्ठं काम उरकल्याचं समाधान घेऊन शाम आणि वाघू स्टेट बँकेच्या शाखेत पोहोचले. सिक्यूरिटीनं कडक सलाम ठोकला. वाघूनं विचारलं ''पांडेजी, मॅनेजर साहेब आहेत का?'' वाघू.

''हायेत की !'' पांडे

''जाऊ का पाहुण्यांना घेऊन केबीनमध्ये?'' वाघू

''जावा की, तुमास्नी आन् राघूदादास्नी आडवण्याची हिंमत हाय का कुनाची?'' पांडे

वाघू आणि शाम मॅनेजरच्या कॅबिनमध्ये गेले. मॅनेजरनं विचारलं - ''वाघूदादा, आज काय काम काढलंत? हे पाहुणे कोण?''

''हे डॉ.शामराव, चइइड आहेत. चांगलवाडीत दवाखाना सुरु करणार आहेत. त्यांचा अकौंट उघडायचा आहे.'' वाघू.

''वेलकम् सर ! मी शरद निमजे. या ब्रँचचा मॅनेजर.'' मॅनेजर

मॅनेजरनी त्यांच्या कपाटातून ३/४ फॉर्म्स काढले आणि ते भरुन द्यायला सांगितले.

त्याचवेळी, मॅनेजरच्या केबिनच्या बाहेर सिक्युरिटी गार्ड, पांडेजी आणि एक ग्राहक यांच्यात बाचाबाची चालू असल्याचा आवाज आला. क्षणभरानं पांडेजी मॅनेजरच्या केबिनमध्ये आले. मॅनेजरनी विचारलं ''पांडेजी, कुणाशी भांडत होता?''

''त्योच वो. संभ्या चांगल. दररोज येऊनशान मॅनेजरला भेटायचंय, शाखा व्यवस्थित सांबाळतोय का न्हाई ते तपासायचंय असं सांगून बेधडक तुमच्या केबिनमधि घुसण्याची धडपड करतुया ! चांगलवाडीचा महाराजाच जणू?'' पांडे

''त्याचा पणजोबा चांगलवाडीचा राजाच होता. राजपाट गेला, श्रीमंती गेली, डोक्यावर परिणाम झालाय त्याच्या. 'पाहुणे आलेत, मॅनेजरसाहेब गडबडीत आहेत' असं सांगा म्हणजे जाईल तो निघून आणि आपल्या अकौंटंट साहेबांना सांगा मी बोलावलंय'' मॅनेजर.

पांडे निघून गेले. तोपर्यंत शामनं अकौट उघडण्याचे सर्व सोपस्कार पूर्ण केले. क्षणभरानं अकौंटंट केबिनमध्ये आले आणि त्यानी सातारा ब्रँचचं पत्र मॅनेजरपुढे ठेवलं. मॅनेजरनी पत्र वाचून पेपरवेटखाली ठेवून दिलं. अकौंट उघडण्याच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करुन मॅनेजरनं शाम आणि वाघूदादाना निरोप दिला. रणदिव्यांनी मॅनेजरला विचारलं, ''सर, सातारा ब्रँचच्या पत्राचं काय करायचं?''

''रणदिवे, पाच-साडे पाच लाखाचं डिपॉझीट नाकारण्याइतकं बावळट आहोत का आपण? दोन-चार दिवस ते पत्र आपल्याला मिळालंच नाही असं समजा. नंतरच्या तारखेला इनवर्ड करा. सातारा ब्रँचकडून चौकशी झाली तर त्यांना कळवू की तुमचं पत्र मिळायच्या आधीच डॉक्टर साहेबांचा अकौंट उघडल्यामुळं तुमच्या पत्राची दखल घेता आली नाही त्याबद्दल दिलगीर आहोत.'' रणदिवे हसत हसत आपल्या जागेवर गेले.

वाघूदादा आणि शाम ब्रँचच्या बाहेर आले. डॉ.शाम कसलातरी विचार करतोय हे बघून वाघूनं शामला विचारलं,''डॉक्टर, कसला विचार करताय?'' वाघू.

''विचार म्हणजे .... दोन अडीच वर्षाच्या मुलासाठी पांगुळगाडा आणि लाकडी खेळणी मिळतील का कुठं, त्याचा विचार करत होतो.'' शाम.

''पांगुळगाडा आणि लाकडी खेळणी? आत्तापासून तयारी करुन ठेवणार आहात?'' वाघू.

''काय हे दादा, माझी चेष्टा करताय? साताऱ्याहून येताना मी एका कुटूंबाला माझ्याबरोबर आणलं आहे. त्यांचा दोन अडीच वर्षाचा छोटा मुलगा आहे. पांगुळगाडा आणि रंगीत खेळणी त्याच्यासाठी हवी आहेत.''

''तुमी ज्याला पांगुळगाडा म्हनता त्याला इकडं ढकलगाडी म्हनत्यात. चला, पुन्यांदा माहेश्वरी मदी जाऊया.'' वाघू.

माहेश्वरीच्या मालकानं हव्या त्या वस्तू दिल्यानंतर विचारलं ''डॉक्टरसाहेब, दवाखाना कुठं सुरु करणार आहात?''

''बडवे गुरुजींच्या वाड्यात. दोन-तीन खोल्या घेतल्या आहेत भाड्यानं.'' शाम.

''सगळी तयारी झाली आणि गुरुजींनी मुहूर्ताचा दिवस सांगितला की मला कळवा. मांडव-बिंडव घालू, रोषणाई करु, स्पीकर लावू, सनई-चौघड्याचा दणका उडवून देऊ.'' मालक.

''अहो पण तेवढा खर्च मला परवडला पाहिजे.'' शाम.

''तो खर्च मी करणार ! चांगलवाडीत दवाखाना निघतोय, चांगला एमबीबीएस डॉक्टर तो दवाखाना चालवणार आहे ही गोष्टी सगळ्यांना कोकलून सांगितलीच पाहिजे.'' माहेश्वरी.

माहेश्वरीच्या मालकाचा आग्रह डॉ.शामला स्वीकारावा लागला. विकत घेतलेलं सामान कॅरीअरला बांधून, वाघूला त्याच्या बंगल्यावर सोडून डॉ.शाम घरी परतला.

बडवे गुरुजींनी देवपूजा उरकली होती. दुर्गा स्वयंपाक घरात काम करत होती. बच्चू गुरुजींच्या जवळ वाटी-चमचाशी खेळत होता आणि गुरुजी मंत्र म्हणत होते. त्यांच्या मानेला झटके बसत होते, त्याची बच्चू नक्कल करीत होता. गुरुजींनी खूण करुन दुर्गाला जवळ बोलावले. बच्चूच्या बाळलीला बघून दुर्गा हरकून गेली. तेवढ्यात मोटारसायकलचा आवाज आला. वाटी-भांडं टाकून बच्चू दरवाजाकडे रांगत रांगत जाऊन लागला. तोंडानं दाड्ड्ड दाड्ड्ड असं बडबडत होता.

''दादा आल्याचं बच्चूला कसं कळलं?'' दुर्गा

''मोटारसायकलचा आवाज आला खरा.'' गुरुजी

बच्चूच्या पाठीवर हलकी चापटी मारुन दुर्गानं बच्चूला उचलून कडेवर घेतलं आणि म्हणाली,''अरे, दादांना आत तरी येऊ दे !''

शाम आत आला. बच्चूनं त्याच्याकडे झेप घेतली. त्याला सावरुन शाम म्हणाला, ''दुर्गा, कॅरिअरवर बॉक्स बांधली आहे ती आत आण.'' शाम.

''यवडं काय आनलंय बॉक्सा मंदि?'' दुर्गानं विचारलं.

''उघडून बघ !'' शाम.

दुर्गानं बॉक्स उघडली आणि आश्चर्यानं म्हणाली,''दादा, कशाला आनलीस ढकलगाडी आन् लाकडी खेळणी?'' दुर्गा.

''तुझ्या लेकराची ढोपरं बघ. रांगत रांगत घरभर फिरत असतो. त्याची पावलं आणि गुडघे काळेकुट्ट झाले आहेत ! आणि लवकरच त्याला दात येऊ लागतील. चमचे चावण्याचं काम चालू असतं. त्याऐवजी ही लाकडी खेळणी चावली तर हिरड्यांना इजा न होता दात बाहेर पडायला मदत होईल ... आणि भैरोसिंगला सांग मी बोलावलं आहे.'' शाम.

बच्चूला शामसोबत सोडून दुर्गा भैरोसिंगला घेऊन आली.

''मला बोलालंत जी?'' भैरोसिंग

'' अरे व्वा ! तू एक वाक्य न अडखळता बोललास, शाब्बास !'' शाम.

''तुमचं औषध चांगलं लागू पडलं.'' दुर्गानं हळूच आनंदाश्रू पुसले.

''नाही दुर्गा, माझ्या औषधाचा परिणाम फक्त पंचवीस टक्के झाला असेल. उरलेला परिणाम तुझ्या प्रेमळ वागण्यानं झाला आहे. तू रोज रात्री त्याच्या टाळूला आणि पाठीच्या मणक्याला तेल मालीश करत होतीस हे मी पाहिलं आहे .... भैरोसिंग, मी बच्चूसाठी ढकल गाडी आणली आहे, पण ती चालवतांना गाडीची चाकं बाहेर पडतील अशी भिती वाटतीय. म्हणून दोन्ही चाकाच्या पुढं एक बोट ड्रील करुन त्यात लाकडी पाचर मार म्हणजे चाकं बाहेर पडणार नाहीत.'' शाम.

गाडा घेऊन भैरोसिंग आणि त्याच्या मागं, बच्चूला उचलून घेऊन दुर्गापण निघून गेली.

क्षणभरानं गुरुजी कुणाची तरी पत्रिका पहात होते. त्यांच्याजवळ जात शामनं विचारलं,

''गुरुजी, दवाखान्याचं फर्निचर उभे करण्यासाठी एकादा चांगला दिवस सांगाल का?'' शाम.

''मी आत्ता तुमचीच पत्रिका पहात हातो. माझ्या भविष्य ज्ञानावरुन मी सांगू शकतो की पुढची दहा वर्ष तुम्ही चांगलवाडीतल्या लोकांची दु:खं दूर करुन खूप नाव कमावणार आहात. त्यानंतर या वाड्याचा कायापालट करुन इथंच दहा बेडचं दुमजली हॉस्पिटल उभं करण्याचं काम तुमच्या हातून होणार आहे.'' गुरुजी.

''वैशालीची, तुमच्या नातीची मला मदत होईल का?'' शाम

''वैशाली? .... हं, सांगतो. आम्हाला मूल-बाळ झालंच नाही, त्यामुळं वैशाली आमची 'बायॉलॉजिकल ग्रँड डॉटर' आहे असं म्हणता येणार नाही. आमची पन्नाशी जवळ आल्यावर आणि आता मूलबाळ होण्याची शक्यता नाही अशी खात्री पटल्यावर आम्ही त्या वास्तवाशी समझोता केला. पण आमच्या नशिबात वेगळंच लिहीलं होतं. थंडीचे दिवस होते. एके दिवशी पहाटे, पाच सहा महिन्याच्या मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. दार उघडून बघितलं तर पायरीवर दुपट्यात गुंडाळलेलं, चार-पाच महिन्याचं मूल, थंडीनं कुडकुडत, रडत होतं. त्या मुलाला पायरीवर कुणी ठेवलं होतं ते कळलं नाही, कारण जवळपास कुणीच दिसलं नाही. आम्ही ते मूल घरात आणलं. आजीची कूस मिळताच मूल शांत झालं. नंतर कळलं की ती एक, कोवळी मुलगी होती. सकाळी मी पोलिसांना आणि पंचायत समितीला मुलगी सापडल्याची वर्दी दिली आणि आम्हाला मूळ-बाळ नसल्यानं मुलगी आमच्याकडंच राहू दे अशी विनंती केली.'' पंत.

''ती तुम्हाला आजोबा-आजी म्हणते, पण आई-वडीलांबद्दल कधी चौकशी केली नाही?''

''आम्ही तिला तिच्या आई-वडीलांबद्दल एवढंच सांगितलं आहे की ते दोघं पुण्याला नोकरी करत होते आणि तू तान्ही असताना एकदा पुण्याहून इकडं येताना एस.टी. ला, एका मालट्रकनं जोरात धडक मारली आणि त्या अपघातात तुझे आईवडील मारले गेले, तू मात्र वाचलीस.''

क्षणभर कुणीच काही बोललं नाही. नंतर गुरुजी म्हणाले,

''डॉक्टर, तुम्ही विचारलंत की चांगलवाडीत दहा बेडचं हॉस्पिटल उभारण्यात तुम्हाला वैशूची मदत होईल का, त्याचं उत्तर देण्याआधी मीच विचारतो, ''तुमची मैत्री किती घट्ट आहे?''

''गुरुजी, मैत्री मैत्री असते. त्यात वरवरची, घट्ट, पातळ, टिकावू असं काही नसतं.'' शाम हसत हसत म्हणाला.

''तुम्ही म्हणता ते शाळा-कॉलेजातल्या सामान्य विद्यार्थ्यांना लागू पडत असेल. पण तुमची आणि वैशालीची मैत्री वेगळ्या पातळीवरची आहे असा माझा होरा आहे.'' गुरुजी.

''गुरुजी, एक गम्मत सांगतो. माझ्यानंतर माझ्या आईला एक मुलगी हवी होती. पण ते शक्य झालं नाही. वैशालीनं ती उणीव भरुन काढली आहे असं म्हणता येईल.''

''तुम्ही म्हणताय ते खरंही असेल, पण तुम्ही आणि वैशाली बोलता तेव्हा भाऊ-बहिण बोलतायत असं वाटतच नाही, प्रियकर-प्रेयसी बोलत आहेत असा भास होतो.'' गुरुजी.

त्याचवेळी वैशालीची आजी तरातरा बाहेर आली, नवऱ्याला म्हणाली,''अहो, त्या पोराला किती छळणार आहात. ते एकमेकाशी बोलतात तेव्हा भाऊ-बहिण, मित्र-मैत्रिण का आणखी काही वाटतात, त्याच्याशी तुम्हाला काय देणं-घेणं आहे? .... भैरोसिंग ... भैरोसिंग....''

भैरोसिंग धावतच त्या खोलीत आला आणि म्हणाला,

''मला बोलावल जी...?''

''आज कामाला सुट्टी घेतली आहेस का?'' आजी

''न्हाई जी. डॉक्टर मालकांशी बोलत व्हते म्हनून बच्चूशी वाइच खेळत होतो.'' भैरोसिंग

''बच्चूला माझ्याकडे आणून सोड आणि तुम्ही काम सुरु करा. तुमचा नाष्टा-पाणी दुर्गा कामाच्या ठिकाणी आणून देईल.'' आजी.

आजींची तंबी मिळाल्यामुळं फर्निचर उभं करण्याचं काम हाती घ्यावंच लागलं.

शामच्या दवाखान्याला हळूहळू आकार येऊ लागला आणि सातार्‍यात पंतांच्या दहशतीला सुरुंग लावण्याचे नगारे वाजू लागले. त्याचं नेतृत्व अर्थात वैशालीकडं होतं. त्या दिवशी रात्री साडेनऊ वाजता, पंत नेहमीप्रमाणे 'मेन स्वीच' ऑफ करायला गेले आणि त्यांना धक्काच बसला. मेनस्वीच गायब झाला होता आणि पंतांच्या घरापुरता स्वतंत्र मीटर बसवला होता. पंतांनी आरडा-ओरड सुरु केली. पंत माजघरात आले. तिथं बायको दिवाणावर झोपलेली दिसली. पंत ओरडून म्हणाले - ''व्वा ! मालकीणबाईंनी खुशाल ताणून दिली आहे. नवऱ्याची, घराची काळजीच नाही. ए... ऊठ, नाहीतर घालतो पाठीत एक दणका'' असं म्हणून पंतांनी हात उगारला पण हात वरच्यावर पकडला गेला. वैशालीनं पंतांचा हात पिरगळून पकडला होता. वैशाली म्हणाली,

''व्वा ! पत्नीबद्दल प्रेम व्यक्त करण्याची काय शालीन पद्धत आहे तुमचो ! काकूंवर पुन्हा हात उगारलात तर तो हात मोडून ठेवीन !'' वैशाली.

''सोड, माझा हात सोड.'' पंत ओरडले. त्यापेक्षा वरच्या पट्टीत वैशाली म्हणाली, ''काकूंवर पुन्हा हात उगारणार नाही असं कबूल करा, तरच हात सोडते.'' वैशाली.

''माझ्या आसऱ्याला आलेली कुत्री, माझ्यावरच भुंकतीय? पेकाटात लाथ घालीन, मग जाशील केकाटत, हात सोड म्हटलं ना ! '' पंत.

क्षणभर विचार करुन वैशालीनं आरडा-ओरडा करायला सुरुवात केली ''वाचवा, वाचवा.... कुणीतरी?'' वैशाली

डॉक्टरीणबाईंचा ओरडा ऐकून काळेकाका आणि मोरे मावशी धावत आले आणि विचारलं ''मॅडम, काय झालं? ओरडताय का?'' काळे काका.

''काका, तुम्हीच सांगा, मुलांच्या वार्षिक परीक्षा जवळ आल्यायत. अशा वेळी मालकांनी दिवे घालवले तर मुलांनी काय करायचं? म्हणून मालकीणबाईंनी मला सांगितलं की सगळ्या वाड्याचा वीजपुरवठा बंद करणारी यंत्रणा काढून टाक. इलेक्ट्रीशियन बोलावून मी तेच केलं. पंतांना आरडाओरडा करण्याचं कारणच काय?'' वैशाली.

''भाडेकरुंनाच नाही, घरच्या लोकांना छळण्यात सुद्धा पंतांना आनंद मिळतो.'' मोरे मावशी

''आसुरी आनंद मिळत असेल ! '' काळे काका

''ए ... काळ्या, मी घेतोय तेवढ्या भाड्यात, तुला डोकं टेकण्याएवढी तरी जागा मिळेल का कुठं?'' पंत

''मॅडम, ऐका ! सत्तरी ओलांडलेल्या माणसाशी कसं बोलावं त्याची पाचपोच ज्याला कळत नाही, त्याच्याशी वाद-विवाद करण्यात अर्थच नाही.'' काळे.

''मालकाला साध्या गोष्टी कळत नसतील तर पोलिसातच तक्रार करायला हवी?'' मोरे मावशी.

''ए टवळे .... पोलिसात तक्रार करणार? खुशाल कर ! वाटल्यास माझ्या मोबाइलवरनं तक्रार कर.'' पंतांनी त्यांचा मोबाईल फोन मोरे मावशीसमोर धरला. मोरे मावशी म्हणाल्या,

''तुमचा फोन का देताय ते मला चांगलं ठाऊक आहे. तुमच्याच फोनवरुन, तुमच्या विरुद्ध तक्रार केली तर त्याची दखल घेऊ नका असं क्लार्कला पटवलं असेल तुम्ही.'' नंतर मोरे मावशींनी स्वत:चा मोबाईल काढला आणि सरकारवाडा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली. पाच मिनीटांनी उलट मॅसेज आला,''पोलिस पार्टी बाहेर गेली असल्याने आणि उद्या रविवार असल्याने, सोमवारी सकाळी नऊ वाजता तुमच्या तक्रारीची दखल घेतली जाईल.''

‘‘उलट मॅसेज काय आला?’’ पंतांनी चौकशी केली

‘‘कळेलच तुम्हाला परवा सकाळी, नऊ वाजता.’’

भाडेकरु आणि पंत आपापल्या घरी झोपायला निघून गेले. पंतांना खात्री होती की याआधी झालं, तसंच उद्या होईल. पण पंतांची इच्छा होती त्याच्या उलट झालं.

सोमवार सकाळी नऊ वाजता डी.एस.पी. जगन्नाथ साळवी स्वत: वाड्यात हजर झाले. त्यांनी दोन शिपाई बरोबर आणले होते. एका शिपायाला मुख्य दरवाजावर बसवलं आणि दुसऱ्याला बरोबर घेऊन वाड्याच्या चौकात आले आणि विचारलं ‘‘मोरे मावशी कोण आहेत? त्यांनी घर मालकाविरुद्ध तक्रार नोंदवली होती?’’

मोरे मावशी समोर आल्या, दुसऱ्या बाजूनं वैशालीपण आली. डीएस्पी ला बघून वैशाली आनंदानं ओरडली ‘‘जग्गू तू?’’ वैशाली. ‘‘यस् मी ! साताऱ्याला पोस्टींग झालीय. आठ दिवसापूर्वी चार्ज घेतला. पण तू इथं कशी? होस्टेल सोडलंस? आणि आपल्या ‘तिकडी’तला शामळू कुठाय?’’ डीएस्पी.

‘‘ए ... त्याला शामळू म्हणू नकोस. शाम एमबीबीएस झालाय. चांगलवाडीला गेलाय. आमच्या वाड्यातच दवाखाना काढला आहे. तू मात्र जसा होतास तसाच आहेस.’’ वैशाली.

‘‘काय करणार? मी जसा आहे तसाच राहणार ज.सा. जगन्नाथ साळवी.’’ दोघं एकमेकाला टाळी देऊन हसत राहिले. त्याचवेळी शामची आई बाहेर आली. जगन्नाथ पटकन तिच्या पाया पडला. ‘‘कोण? जगन्नाथ ना तू? शामचा मित्र? इतकी वर्ष कुठं गायब झाला होतास? मोरे मावशींच्या तक्रारीची चौकशी करायला आला आहेस ना? मग माझ्या पाया पडून, तुझ्या वर्दीचा अपमान करु नकोस !’’ शांता.

‘‘उलट तुमच्या शिकवणीमुळं मला ही वर्दी मिळाली आहे ही गोष्ट मी कधीही विसरणार नाही ! ... बरं, पंत कुठं आहेत?’’ जगन्नाथ.

‘‘तू कशासाठी आला आहेस ते ओळखण्याइतके ते चाणाक्ष आहेत, त्यामुळं घरातल्या खोलीत, बागेतल्या झाडामागं, गवताच्या गंजीतसुद्धा लपून बसतील’’ काकू.

‘‘ हा वाडा तुमच्या नावावर असूनसुद्धा गेल्या पंधरा-वीस वर्षात पंताविरुद्धच्या तक्रारींनी दोन फायली भरल्या आहेत. त्यावेळच्या अधिकाऱ्यांनी तक्रारीची शहानिशा करुन ‘तक्रार मागं घेतली, चौकशी करुन दोन्ही पक्षात समेट

घडवून आणला, भाडेकरुला / मालकाला समज दिली' वगैरे शेरे मारुन तक्रारी फाईल केल्या आहेत. तसं करण्यात लाचलुचपतीचा थोडा भाग असण्याची शक्यता आहे, पण असं कितीदा आणि का करायचं?'' जगन्नाथ.

''तू आता जिल्ह्याचा पोलीस प्रमुख म्हणून आलायस ना, तूच ठरव पुढं काय करायचं.'' शामची आई.

''मला वाटतं पंतांना चार-आठ दिवस पोलिस कोठडीत, कच्च्या कैदेत डांबून ठेवावं. तरीसुद्धा त्यांच्या डोक्यात प्रकाश पडला नाही तर बघू पुढं काय करायचं ते.'' जगन्नाथ

''कोठडीत डांबून ठेव, मधून धाक दाखव. पण फार मारहाण करु नकोस''काकू.

''बघितलंस वैशू? मराठी स्त्रिया आपल्या नवऱ्याबद्दल किती भावूक आणि हळव्या असतात ते? ठीक आहे. मारणे ! सॉरी माझ्या सहकाऱ्याचं नाव मारणे आहे.

एक शिपाई तत्परतेन पुढे आला. सॅल्यूट करुन उभा राहिला ''यस सर?''

''शिंदेला सांग, वाड्याबाहेर कुणाला जाऊ देऊ नकोस. मी वाड्यातल्या खोल्या तपासतो. तू वाड्याबाहेर लपण्याच्या जागा - अवजारांची खोली, संडास, बागेतली झाडं, गवताची गंज सगळं तपास. कमॉन, क्वीक'' जगन्नाथ.

दोघं कामाला लागले. जगन्नाथनं घरातल्या सगळ्या खोल्या तपासल्या. क्षणभरानं पंतांचा ओरडण्याचा आवाज आला ''ए.. शिपुर्ड्या, सोड मला. मी सरकारी नोकर आहे, जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय तू मला अटक करु शकत नाहीस.'' पंत.

शिपाई पंतांच्या दंडाला धरुन, माजघरात घेऊन आला. जगन्नाथनं विचारलं, ''पंत कुठं सापडले?''

''लई फिरवलं म्हाताऱ्यानं ! या झाडामागं लप, त्या झुडपामागं लप, शेवटाला गवताच्या गंजीत घुसत व्हता. धोतराचं टोक धरुन वढल्यावर नागडं व्हायच्या भितीनं आपसूक आला भाईर ! तरी वरडणं चालूच व्हतं 'मराल ! मराल ! सरकारच्या परमिशन शिवाय मला अटक केली तर ददद फाटंल तुमची'.''

''सांग त्याला, जिल्हाधिकाऱ्याचं पत्र आहे आमच्याकडे. केस उभी राहील त्यावेळी ते आम्ही न्यायालयात सादर करुच.'' जगन्नाथ

पत्नीपुढे हात जोडून पंत केविलवाण्या स्वरात म्हणाले,''अहो, मी तुमच्या पाया पडतो. पण मला सोडवा या संकटातून.'' पंत.

''आता पाया पडून काय उपयोग? मामंजीनी हा वाडा माझ्या आणि शामच्या नावानं करुन ठेवला तेव्हापासून तुम्ही माझा आणि भाडेकरुंचा छळ मांडलात. मी शाम डॉक्टर व्हायची वाट पहात होते. पण आता नाही. जगन्नाथ घेऊन जा त्यांना आणि आज आलास तसा नको, पण काकूच्या हातचं आळवाचं फदफदं खाण्याची इच्छा झाली तर पुन्हा ये कधीतरी.'' ममा.

काकूच्या पाया पडून, दोन सहकारी, पंत, मोरे मावशी आणि काळेकाकांना घेऊन व्हॅन पोलीस स्टेशनकडं वळविली.

* * * * *

मध्यंतरी बरेच दिवस उलटले.

सनईचे मंजूळ सूर ऐकू येत होते. बडवे गुरुजींच्या वाड्यासमोरच्या मोकळ्या जागेत एक मोठा मांडव घातला होता. मांडवाचे दोन भाग केले होते. एका भागात खुर्च्या मांडल्या होत्या आणि दुसऱ्या भागात लेकुरवाळ्या स्त्रियांसाठी आणि वृद्ध स्त्री पुरुषांसाठी सतरंज्या पसरल्या होत्या. मांडवाच्या कनातीला शिडी लावून एक कामगार वर चढला होता आणि शाम स्पीकर इकडं वळव, तिकडं वळव अशा सूचना देत होता. त्याचवेळी नखशिखांत नटलेली वैशाली शामजवळ आली. त्याचा हात धरुन ओढत घरात नेऊ लागली. शाम म्हणाला,''वैशू, अगं काय करतीयांस, मला स्पीकर ॲडजस्ट करु दे.'' शाम.

''ते काम कुणीही करेल. तू आधी घरात चल. बघ तरी काकू किती सुंदर दिसत आहेत.' वैशाली.

''माझीच आई आहे, सुंदर दिसणारच ! आणि तुझ्यापेक्षा सुंदर दिसत असेल तर बघायलाच हवं !'' शाम.

वैशालीनं शामच्या दंडावर हलकी चापट मारलो आणि त्याचा हात धरुन ओढत माजघरात घेऊन आली. माजघरातल्या आरशासमोर उभी राहून शामची आई आपलं नखशिखांत नटलेलं रुप न्याहाळत होती. शाम क्षणभर टक लावून ममाकडं बघत राहिला. नंतर म्हणाला ''ममा, मला तर वाटलं होतं डॅडींचं प्रकरण नुकतंच झाल्यामुळं तू कदाचित माझ्या दवाखान्याच्या उद्घाटनाला येणार नाहीस.'' शाम.

''अरे, जे स्वप्नं, मी गेली सहा-सात वर्ष मनातल्या मनात रंगवीत होते, ते स्वप्नं साकार होताना बघायला मी हजर राहणार नाही असं होईल का कधी?'' शामची आई.

''ममा, मी बंडूमामाला दोनदा फोन करुन आग्रह केला हाता की...'' शाम.

त्याचवेळी बंडूमामा, त्याचे दोन मित्र आणि 'माहेश्वरी' ट्रॅव्हल्सचे मालक अशा चौघांनी माजघरात प्रवेश केला आणि ओरडतच शामला शुभेच्छा दिल्या. माहेश्वरीचा मालक सगळ्या घरात फिरुन आला. बंडूमामाला म्हणाला,''बंड्या, तुज्या भाच्यानं डिस्पेस्नरीची चोख्खी वेवस्था केली आहे.'' नंतर शामचा हात हातात घेऊन म्हणाला, ''डिक्रा, मी सांगते, तुजा दवाखाना बेस चालणार. पन त्या टायमाला तुज्या मामाला आन् मायला विसरु नकोस !'' माहेश्वरी.

बंडूमामाचा आणखी एक मित्र तिघांजवळ आला आणि म्हणाला,''बंड्या, तू तुझ्या भाच्याला योग्य सल्ला दिलास. एक सुंदर, तरतरीत नर्स ठेवायचा सल्ला ! पेशंटच्या मरगळलेल्या मनाला उभारी देणारं एक पात्र या नाटकात पाहिजेच ! गुरुजी, ती पांढऱ्याशुभ्र कपड्यात वावरतीय ती कोण?'' रावतनं विचारलं.

''ती राघूदादांची दोन नंबरची मुलगी यमुना. तिनं नुकताच नर्सिंगचा कोर्स पूर्ण केला आहे आणि आजपासून ती डॉ.शामच्या दवाखान्यात नर्स म्हणून काम करणार आहे..... आणि आता गप्पा मारत बसू नका. मुहूर्ताचा क्षण पकडून फोत कापली गेली पाहिजे. चला, चला पटकन.'' गुरुजींनी घाई केली.

माजघरात जमलेली मंडळी लगबगीनं मांडवात आली. मिळेल त्या ठिकाणी जागा पकडून स्थिरस्थावर झाली. आपापसात गप्पा सुरु झाल्या. पोरांचं रडणं, बायकांचं पोरांवर खेकसणं चालूच होतं.

त्याचवेळी पोलिसांच्या गाडीचा सायरन ऐकू आला. गर्दीतला गोंधळ एकदम शांत झाला. गावचे नवे पोलीस पाटील पुढे गेले. जिल्हा सुपरिटेंडेंट जगन्नाथ साळवी कारमधून खाली उतरले. पोलीस पाटलानं कडक सॅल्यूट ठोकला. पाठोपाठ शाम आला. शामनं जगन्नाथला मिठीच मारली आणि म्हणाला,''जगन्नाथ तू आत्ता इथं कसा?'' शाम.

''कसा म्हणजे? तुझ्या दवाखान्याचा उद्‌घाटन समारंभ आणि मी हजर राहणार नाही? तू मला निमंत्रण पाठवलं नाहीस तरी आपल्या एरीयात कुठं काय होणार आहे त्याची दखल आम्हाला घ्यावीच लागते. तू कार्यक्रमाकडे लक्ष दे. बाकी गप्पा नंतर मारु.'' जगन्नाथ.

शामनं जगन्नाथला ममाजवळ बसवले. त्याच्याशेजारी पंचायतीचे अध्यक्ष आणि इतर मंडळी, गोदाक्का, वाघू आणि राघूच्या कुटूंबातलो मंडळी बसली होती. माईक टेस्टींग झालं आणि गुरुजींनी बोलायला सुरुवात केली.

''चांगलवाडीतल्या आणि आजूबाजूच्या वस्तीतल्या रहिवाश्यांचं, डॉ.शाम यांच्या दवाखान्याच्या उद्‌घाटन प्रसंगी मी अतिशय आनंदानं स्वागत करतो.''

प्रेक्षकात बसलेला एक टारगट तरुण, शेजाऱ्याला कोपरानं ढोसून म्हणाला,'' या म्हाताऱ्याला आनंदाच्या उकळ्या फ़ुटायला काय झालं?''

दुसरा प्रेक्षक म्हणाला,''त्याला उकळ्या फ़ुटतायत ना, मग आपल्याला पण आनंद झालाय असं दाखवायचं, टाळ्या वाजवून ! आत्ता लगेच नाही. आजूबाजूच्या लोकांनी टाळ्या वाजवल्या की आपण पण वाजवायच्या !''

''च्या मायला, असं असतं व्हय टाळ्याचं हयटाक?'' दुसरा.

गुरुजींनी पुढे बोलायला सुरुवात केली -

''गेल्या काही दिवसात चांगलवाडीत तीन-चार चांगल्या घटना घडल्या आहेत. चांगलवाडीच्या पोलीस पाटलांना सब इन्स्पेक्टर म्हणून बढती मिळून, त्यांची चार महिन्याच्या ट्रेनिंगसाठी लोणावळ्याला पाठवणी झाली आहे आणि त्यांच्या जागी आपल्या गावातले सावजी महाळुंगकर यांची पोलीस पाटील म्हणून नेमणूक झाली आहे. दुसरी घटना म्हणजे माझी नात कुमारी वैशाली हिची साताऱ्यातले प्रख्यात सर्जन डॉ.कोकीळ यांची असिस्टंट म्हणून नोकरी मिळाली आहे, आणि सर्वात महत्वाची घटना म्हणजे आज डॉ.शाम यांच्या दवाखान्याचं उद्‌घाटन होत आहे. या सगळ्या मंडळींना त्यांच्या कामात खूप यश मिळो अशी देवाला प्रार्थना करुया आणि टाळ्या वाजवून त्या सर्वांचे स्वागत/अभिनंदन करुया.''

टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होतो. क्षणभरानं गुरुजी त्यांचं मनोगत पुढं चालू करतात -

''आतापर्यंत आपल्या वाडीतल्या लोकांना साधा ताप-जाळ आला, तरी दवा-पाण्यासाठी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या डॉक्टरकडं जावं लागायचं. तिथं गर्दी असली तर आपल्या पेशंटला अर्धा अर्धा तास ताटकळत बसावं लागायचं. आता तसं होणार नाही. शाम एक निष्णात डॉक्टर आहेतच पण गेल्या दीड-दोन महिन्यात बच्चूसारख्या दोन अडीच वर्षाच्या मुलापासून ते आमच्यासारख्या आजोबा-आजीशी त्याचं वागणं पाहिलं आहे, त्यावरुन मी छातीठोकपणे सांगतो की, शाम डॉक्टर म्हणून मोठा आहेच, पण माणूस म्हणूनही तितकाच मोठा आहे ! (प्रचंड टाळ्या). डॉक्टर शामला पुढच्या आयुष्यात उदंड यश आणि सुख-समाधान मिळो अशी परमेश्वराला प्रार्थना करतो आणि आपल्या सर्वांच्या परिचयाच्या गोदाक्कांना विनंती करतो की त्यांनी दवाखान्याच्या प्रवेशद्वारावर बांधलेली फोत कापून दवाखान्याचं रितसर उद्‌घाटन करावं आणि नंतर त्या शामरावांच्या वाड्यात रहात होत्या, त्या काळातल्या काही आठवणी सांगाव्यात. धन्यवाद !'' गुरुजी.

शामच्या आईनं गोदाक्काचा हात धरुन फोत बांधलेल्या दरवाज्या जवळ गेलं. जाता जाता गोदाक्का म्हणाली ''बाई गं, तुझ्या लेकरामुळं मला ह्यो सोन्याचा दिवस बघाया मिळाला. त्या लेकराला जनम देणारी आन् डॉक्टरीचं शिक्शान घेन्यासाठी पाठिंबा देणारी तू धन्य हायेस.'' गोदाक्का.

''आक्का, मी शामला जन्म दिला, पण त्याच्या मनात डॉक्टर होण्याचं खूळ तुम्हीच भरवलंत. नाहीतर माझ्या हलकट नवऱ्यानं त्याला शंभर/दीडशे रुपये पगारावर, जिल्हाधिकाऱ्याच्या ऑफिसात खर्डेघाशी करण्यासाठी चिकटवून दिलं असतं ! शामची आई.

त्याचवेळी वाघू, राघू, त्यांचे कुटूंबिय, पंचायत समितीचे सभासद गोदाक्काच्या मागेपुढे-बाजूला उभे राहिले. यमुनानं चांदीच्या तबकात ठेवलेली कात्री पुढे केली. गोदाक्कान फोत कापली. कॅमेऱ्याचे फ्लॅश उडाले. टाळ्या आणि चौघड्याचा दणदणाट झाला. डॉक्टर शामचं अभिनंदन करण्यासाठी प्रेक्षकांची झुंबड उडाली. गुरुजींनी सगळ्यांना आपापल्या जागेवर बसण्याची आणि गोदाक्काचे आणि शांताबाईचे - शामरावाच्या आईचे विचार ऐकण्याची विनंती केली. गोदाक्का माईकसमोर आली आणि बोलायला सुरुवात केली -

''माज्या लेकराच्या म्हंजी डॉक्टर शामच्या दवाखान्याची फोत कापायच्या समारंभासाठी जमलेल्या समद्यास्नी माजा दंडवत. आपलं घरदार आणि कामधंदा सोडून इथवर आलात, मला ओपनिंगची फोत कापायला लावलीत त्याबद्दल थांकू ! (प्रेक्षकांकडून खूप टाळ्या आणि हंशा) शाम पाचवी-सहाव्वीत व्हता तवापासून म्या त्याला वळखतिया. शाम, गुरुजींची नात वैशू आन् आता सुपारीटंट झालेला जग्गू जिवाभावाचे मैतर (प्रचंड टाळ्या आणि हंशा) तिघंबी हुशार, म्या पयला, तुमी दुसरे तिसरे अशी चढाओढ लागायची. अकरावी पास झाल्यावर तिघांच्या घरी चर्चेचं गुऱ्हाळ सुरु झालं. फ़डं शिकायचं का नोकरी धरायची? विच्छा असेल त्याला वाट सापडत्ये म्हनत्यात. शामच्या मागे त्याचे मामा आन् माय उभे राहिले, वैशालीच्या मागं गुरुजींचा भक्कम पाठींबा व्हता, जग्गूच्या पाठीशी 'कमवा आन् शिका' ही चळवळ सुरु करणारे कर्मवीर भाऊराव पाटील उभे राहिले. तीनही पोरांनी, टेकू देनाऱ्याची लाज राखली. पयल्या दर्जाचं यश मिळवून, मोठमोठ्या डिगऱ्या मिळवून चांगलवाडीची आन् साताऱ्याची बी शान वाढवली (टाळ्या) पन् शाम येकाबाजूनं यश मिळवत व्हता आन् दुसऱ्या बाजून त्याचा बाप त्या यशावर डांबर फाशीत व्हता. म्याट्रिक झाल्यावर फ़डं शिकायचं, का कलेक्टर कचेरीत शंभर-दीडशे रुपयाची नोकरी करायची या मुद्यावर रोज राडा व्हायला लागला. पन शेवटीला माझ्या लेकरानं लढाई जिंकलीच ! सा वर्ष डॉक्टरी शिकून चांगलवाडीत दवाखाना मांडलाच ! अवो, तुमास्नी काय सांगू, माजं लेकरु माज्या खोलीत रातच्या दीड-दोन वाजेपोत्तर लिखा-पढी करत बसायचं ! पन त्याच्या बापाला कवतुक न्हाईच, कणव पन् आली न्हाई. माझ्या खोलीत शिरुन, माझ्या देखत, सकाळी सा वाजता, लेकराच्या कमरेत लाथ घालून त्याला उठवायचा !!''

बोलता बोलता गोदाक्काच्या डोळ्यातून पाणी ओघळू लागलं. शामच्या आईनं तिच्या खांद्यावर थोपटून शांत करण्याचा प्रयत्न केला. गोदाक्कानी डोळे पुसलेक आणि म्हणाल्या,''मंडळी, माज्या लेकनराच्या आयुक्षात फ़ुडं काय झालं ते त्याची मायच सांगल. माज्या लेकराला आकाशाएवढं यश मिळो यवडीच विनवणी हाय देवाला. समद्यास्नी रामराम ! ''

गोदाक्का त्यांच्या जागेवर बसल्या. दोन मिनीटं टाळ्यांचा गजर होत राहिला. टाळ्या शांत झाल्यावर शामची आई माईकसमोर आली, बोलायला सुरुवात केली,

''या समारंभाला जमलेल्या चांगलवाडीतल्या आणि आजूबाजूच्या वस्तीतल्या सर्व लहानथोर मंडळींना माझा नमस्कार ! गोदाक्का माझ्या थोरल्या बहिणीसारख्याच आहेत. त्यांनी शामला आशिर्वाद दिला तो आक्कांच्या प्रेमाचा आणि मोठ्या मनाचा पुरावाच आहे. माझ्या मुलानं, डॉ.शामनं किती कठीण परीस्थितीत सहा वर्ष डॉक्टरीचं शिक्षण घेतलं आणि गुरुजींच्या वाड्यात हा दवाखाना थाटला, त्यासाठी माझ्या मुलाचं कौतुकच आहे. पण माझ्या नवऱ्यानं, माझ्या मुलाचा इतकी वर्ष छळ मांडला होता त्याला 'हलकटपणा' हेच नाव देता येईल.''

''आमच्या लग्नानंतरची गोष्ट सांगते. लग्नसोहळा उरकला, पाहुणे रावळे गेले, नंतर आम्हा पति-पत्नीला एकांत मिळाला. 'आली हासत पहिली रात' असं म्हणण्या ऐवजी माझ्या नवऱ्यानं मला धमकावलं 'आपल्याला पहिली मुलगीच झाली पाहिजे', मी कारण विचारलं, 'पहिली बेटी, धनाची पेटी' अशी म्हण आहे म्हणून...? माझं म्हणणं पूर्ण ऐकून घेण्याऐवजी ते चिडून म्हणाले,''मूर्ख आहेस, आपल्याला मूलबाळ होत नाही, आपण वांझोटे आहोत अशी समाजात निंदा व्हायला नको, म्हणून मूल आणि मुलगी झाली की सतराव्या वर्षी तिचं लग्न करुन दिलं की नंतर बापाचा पैसा उडवायला आपण मोकळे.'' नवऱ्याचे हे क्षुद्र विचार मी पहिल्या रात्रीच ऐकले. नवऱ्याच्या दुर्दैवानं आणि माझ्या सुदैवानं म्हणा, आम्हाला पहिला मुलगाच झाला, तोच हा शाम.''

''मुलगा झाला म्हणून मामंजीनी गावभर पेढे वाटले, सबंध वाड्यावर लुकलुकत्या दिव्यांची रोषणाई, बारा दिवस, बारा तास चालू होती. मंत्रजागर, जेवणावळी चालू होत्या, पाहुण्या रावळ्यांची ये-जा चालू होती, या सगळयात भागीदार नव्हता तो माझा नवरा.''

''वर्ष-सहा महिन्यांनी शामचे आजोबा वारले. त्यापूर्वी त्यांनी आमचा वाडा व भोवतालची मोकळी जागा, माझ्या आणि शामच्या नावावर करुन ठेवली. तेव्हापासून माझ्या, शामच्या आणि भाडेकरुंच्या छळाला सुरुवात झाली ! मला आणि शामला विनाकारण मारझोड करणे, रात्री दहानंतर संबंध वाड्यातले दिवे बंद करणे, चौकात दंगा

केला म्हणून भाडेकरुंच्या मुलांना झोडपणे, मुलांना वळण लावलं नाही म्हणून भाडेकरुंच्या घरातली भांडी उचलून नेणे,

तिथं जमलेल्या गावकऱ्यांनी उभं राहून टाळ्यांचा गजर कला आणि नंतर 'डॉक्टरसाहेब, तुम्ही बोला' असा आग्रह सुरू केला. शामनं हात वर करून सगळ्यांना बसायची विनंती केली. शाम म्हणाला -

''मित्रानो, खरं तर अशा समारंभात बोलण्याची डॉक्टर लोकांना सवय नसते. त्यांना चौकशा करण्यात जास्त रस असतो. पेशंट आला की प्रश्नांची सरबत्ती सुरू होते. हंऽ काय झालंय? कुठं गेला होता? काय खाल्लंत? थंडीचे दिवस आहेत, कांबळं का पांघरलं नाही? दुसऱ्या डॉक्टरकडून काही औषधपाणी घेतलं होतं का? त्या डॉक्टरची चिठ्ठी जवळ आहे कां? शौचाला/लघवीला किती वेळा जावं लागतं? तेव्हा इंद्रियाची जळजळ होते का?..... मित्रानो, हसूं नका. अशा प्रश्नांची उत्तरं मिळाली की, तुमची आणि माझी मैत्री जुळलीच म्हणून समजा. आणखी एक गोष्ट. यमुना जवळ ये. ही यमुना - राघूदादाची मुलगी - तिच्या शाळेनं - चांगल विद्यालयाने - सहा महिन्याचा नर्सिंगचा कोर्स सुरू केला होता. यमुनानं जिद्दीनं तो कोर्स पूर्ण केला आहे. त्याबद्दल आपण तिचं कौतुक करू या. (जोरदार टाळ्या). मी दवाखान्यात नसेल, व्हिजिटला गेलो असेन, तेव्हा यमुना पेशंटकडे लक्ष देईल.'' - श्याम.

त्याच वेळी एक तरुण उभा राहिला आणि विचारलं - 'डॉक्टरसाहेब, महारोग झालेल्या पेशंटकडं पण यमुना लक्ष देईल का?' - तरुण

'त्यासाठी सरकारी दवाखाने आहेत. पण तुमच्यासारख्या, नव्यानं लागण झालेला पेशंट आला तर काय करायचं त्याचं शिक्षण मी यमुनाला देऊन ठेवीन. काळजी करू नका.' - डॉ. शाम.

'तुम्ही रोग प्रसार केंद्र आहात? लोकांना महारोग व्हावा आणि तुमची भरभराट व्हावी अशी इच्छा करताय?' - तरुण

'नाही! तुमच्या फालतू प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न करतोय.' - शाम.

गुरुजींनी दोघांना शांत राहण्याची विनंती केली. पुढं म्हणाले, 'मंडळी, शेजारच्या मांडवात सगळ्यांसाठी चहा-नाश्त्याची सोय केली आहे. सर्वांनी त्याची चव घ्यावी ही विनंती. धन्यवाद!' - गुरुजी.

शेजारच्या मांडवातल्या चहा-नाश्त्याची चव घेण्यासाठी गावकऱ्यांची एकच झुंबड उडाली. जगन्नाथच्या सांगण्यावरून एक पोलीस शामची ज्या युवकाशी शाब्दिक झटापट झाली होती त्याच्यावर नजर ठेवून होता. त्या

युवकाचं नाव होतं समशेर मुकादम. समशेरनं चहा-नाश्त्याचा स्वाद घेतला आणि तो बाहेर पडणार तेवढ्यात त्याच्यावर नजर ठेवणाऱ्या पोलिसांनी त्याची मानगुट पकडली आणि त्याला जगन्नाथाच्या कारमध्ये ढकलला.

काही वेळानं जगन्नाथनं समशेरची उलट तपासणी सुरू केली.

'मी विचारीन त्या प्रश्नांची खरी खरी उत्तरं दे.... नाव काय तुझं?'

'समशेर मुकादम.'

'बापाचं नाव काय? का बिन बापाचा आहेस?'

'तुकाराम मुकादम. आणि तुम्ही वरिष्ठ पोलीस अधिकारी असलात तरी मला 'बिनबापाचा' अशी शिवी देण्याचा अधिकार तुम्हाला नाही.'

'अरे व्वा! स्वत:च्या आई-बापाबद्दल इतका अभिमान आहे? काय करतात तुझे वडील?' - जगन्नाथ.

'मुकादम आहेत. सुगीच्या दिवसात आणि इतर दिवशीही चांगलं वाडीतल्या शेतकऱ्यांना कापणी, मळणी, पोती भरणासाठी किंवा इतर कामासाठीही माणसं आणि पोती पुरवतात.' - समशेर.

'तू वडिलांना मदत करतोस की नाही.' - जगन्नाथ.

'नाही. त्यांचं, आपलं पटत नाही.' - समशेर

'न पटण्याचं कारण?' - जगन्नाथ.

'माणसं पुरवायची आणि वर शिव्या पण खायच्या? आपण कुणाचं ऐकून घेत नाही, घेणार पण नाही.' - समशेर.

'वाघू-राघू दादांच्या श्रीमंतीचा तुला हेवा वाटतो म्हणून त्यांचा अपमान करण्यासाठी....'

'श्रीमंती? वाघू-राघूच्या पूर्वजांनी लुटु-पुटुच्या लढाया करून जिथं पाय टेकला ती जमीन आपली असं करून त्या वेळच्या अधिकाऱ्यांकडून सत्तर-ऐंशी एकर जमीन आणि डोंगरावरली सागवानाची झाडं बळकावली आहेत.' - समशेर.

‘अरेऽ व्वा, खूप माहिती गोळा केली आहेस. शिकलायस किती?’ - जगन्नाथ.

‘नववी नापास.’ - समशेर.

‘पुन्हा परिक्षा दिली नाहीस?’ - जगन्नाथ.

‘चांगलवाडीतल्या एकुलत्या एका शाळेनच हाकलून दिल्यावर, पुन्हा परिक्षा कोण घेणार?’

‘शाळेनं हाकलून कां दिलं?’

‘कारण, तुमची आणि डॉ. शामरावांची लाडकी, यमुना!!’

‘पण मी तर ऐकलं - परिक्षेच्या वेळी कॉपी केलीस तू. आणि दोष ढकलतोयस यमुनावर?’

‘आपण कॉपी वगैरे करण्यातलं न्हाई.’

‘मग काय, मास्तरांचं वैर होतं तुझ्याशी?’

‘वैरच म्हणायला पाहिजे. माझ्या मित्रानं ‘ॲटमॉसफिअरला’ मराठी शब्द काय‘ असं विचारणारा कागद बोळा करून माझ्याकडं फकला.’

‘तो गोळा चुकून यमुनाच्या अंगावर पडला. यमीनं तो कागद मास्तरांच्या कडं दिला. मास्तरांनी चौकशी न करता आमच्या दोघांच्या उत्तरपत्रिका हिसकावून घेतल्या. नंतर हेड मास्तरांनी चौकशीचं नाटकं केलं. यमीच्या जबानीवर विश्वास ठेवून शाळेनं आम्हा दोघांना रस्टिकेट केलं. दुसऱ्या अर्थानं, शाळेनं दोन गुंड जन्माला घातले.’ - समशेर.

‘काय?’ जगन्नाथ आश्चर्यानं क्षणभर समशेरकडं बघत राहिला. नंतर म्हणाला, ‘समशेर, तुझ्या बोलण्यावरनं वाटतंय तू खरं बोलत आहेस, तुझ्यावर अन्याय झाला आहे.’ - जगन्नाथ.

‘नशीब माझं! एका वरिष्ठ अधिकाऱ्याला तरी माझं बोलणं खरं वाटलं’ - समशेर.

‘डीएसपी समोर लटपट पंची चालणार पण नाही. पुढं काय करायचं ठरवलं आहेस?’

‘अजून तसं काही ठरवलं नाही. आई-बाप खायला घालतायत तोपर्यंत राहायचं. नंतर....’ समशेर गप्प झाला.

'नंतर काय? आई-बापानं खायला घालणं बंद केलं की बापाचा मुद्देमाल गोळा करून पुण्या-मुंबईकडं पळून जायचं, मुद्देमाल संपला की चोऱ्या माऱ्या करायला सुरुवात करायची, असच ना? मग तू आहेस, आणि पोलिसांचा ससेमिरा आहे. त्यापेक्षा माझा 'खासगी मदतनीस' म्हणून नोकरी करशील?' - जगन्नाथ.

'खासगो मदतनीस? म्हणजे?' - समशेर.

'थोडक्यात सांगतो, खासगी मदतनीस म्हणजे 'माझ्या विश्वासतला, मी निवडलेला, माझ्या खाजगी कामात मदत करणारा बूट पॉलिश पासून माझं जेवणखाणावर लक्ष ठेवणारा, पैशाचे व्यवहार सांभाळणारा आणि या सगळ्याची डायरीत नोंद ठेवणारा कारकून, तो 'खासगी मदतनीस'. तशी नोकरी करणं तुला आवडेल?'

'सर रागावू नका. पण एक प्रश्न विचारू?' - जगन्नाथ.

'सर, तुमची पत्नी हयात नाही कां?' - समशेर.

जगन्नाथ खळखळून हसू लागला. हसूं विरल्यावर जगन्नाथ म्हणाला, 'तुला कां वाटलं की माझी पत्नी हयात नाही. खरंतर माझं लग्न झालेलं नाही. भावी काळात लग्न करण्याचा विचारही नाही. माझी सजेशन मान्य केलीस तर तुला सगळ्या गोष्टी हळूहळू कळतीलच. तू ठरव आणि चार दिवसात मला कळव. हे माझं कार्ड.'

जगन्नाथनं कारचं दार उघडलं. ड्रायव्हरला बोलावलं आणि सांगितलं, 'सोनाळकर, या मुलाला त्याच्या घरी सोड आणि त्याच्या वडिलांना किंवा आईला सांग की डी. एस. पी. नी तुमच्या मुलाला पोलिसांत भरती करून घेण्याचं ठरवलं आहे. त्याच्या जन्मापासून आत्तापर्यंत घडलेल्या सगळ्या घटनासंबंधी जी काही कागदपत्रं असतील, त्याच्या झेरॉक्स कॉपीज घेऊन, समशेरसह येत्या सोमवारी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत साताऱ्याला पोलीस हेडक्वॉटरमध्ये भेटायला या. सोमवारचा एकच दिवस आहे. नंतर डी. एस. पी. साहेब दहा दिवस दौऱ्यावर जाणार आहेत.' - जगन्नाथ.

समशेरला घेऊन सोनाळकर मुकादमाच्या घरी पोहोचले. लाल दिव्याची पोलिसांची कार बघून गल्लीतली मोठी माणसं, बायका-पोरं जमा झाली आणि आपापसात चर्चा सुरू झाली -

'अगोबाईऽ शमशा पोलिसांच्या गाडीतून उतरला.' - पहिली स्त्री.

'समशेरची वाट लागणार.' - एक पुरुष.

'त्या गुंडाला असाच दणका पाहिजे होता.' - एक म्हातारा.

'स्वत:च्या भविष्याबद्दल काळजीच नाही लेकाच्याला.' - एक चाळीशी गाठलेला सरकारी नोकर.

'वयाची अठरा वर्ष भानगडी करण्यात घालवली. आता बस म्हणावं खडी फोडत.' - दुसरी स्त्री.

'एऽ गप्प बसा! कुनाच्या नशिबात काय लिवलं हाय, कुनाला कळलतं का? पंधरा वीस वर्सानं हाच गुंड, आपल्या गल्लीत, असलीच गाडी घेऊन येईल तवा डोळं फाटतील तुमचं.' - दुसरा म्हातारा.

'तसं जालं तर आमी त्याचं बी कौतुक करू.' पहिली स्त्री.

-----

मामा आणि त्याच्याबरोबर आलेल्या पाहुण्यांना टाटा करून शाम घरात आला. शामची आई सामानाची बांधा-बांध करून जगन्नाथाची वाट बघत होती. शाम म्हणाला - 'ममा, दोन-चार दिवस राहिलीस तर बिघडेल का? बाबा घरी नाहीतच. मग तू एकटी....' शाम.

'हो. आता मला एकटीनंच जन्म काढायचा आहे. एवढा मोठा वाडा मोरे मावशीवर सोपवून आले आहे. त्या बिचाऱ्या काय काय करतील? नोकरी सांभाळतील, का वाड्याकडं लक्ष देतील?' - ममा.

'तू तुझे दाग-दागिने इथल्या बँकेच्या लॉकरमध्ये ठेवणार आहेस ना. मग ते काम करण्यासाठी दोन दिवस तरी रहा!' - शाम.

ते काम तूही करू शकशील. सगळे दागिने तुझ्या बायकोसाठीच सांभाळायचे आहेत.' - शांताबाई.

'मी लग्न करणार आहे असं तुला कुणी सांगितलं?'

प्रवेश करून जगन्नाथानं काडी लावली -

'कुणी सांगायला कशाला कशाला पाहिजे. काकूंचा अधिकार आहे तो!' - जगन्नाथ.

'जग्या, च्यायला, तू आईला भडकावू नकोस. माझ्यापेक्षा दीड दोन वर्षानं मोठा आहेस. तू कधी लग्न करणार आहेस ते सांग.' - शाम.

'मी लग्नाला एका पायावर तयार आहे. पण माझा 'बायोडाटा' ऐकून मुलीचं पळ काढतात.' - - जगन्नाथ.

जगन्नाथ आणि शाम, एकमेकाला टाळी देऊन, हसत राहतात. शामची आई म्हणते - 'बघू नका चेष्टेनं. साताऱ्यात माझी एक मैत्रिण आहे. ती मॅरेज ब्युरो चालवते. तिच्याकडे सगळ्या जातीतल्या मुला-मुलींची स्थळं आहेत. तिच्याकडं मी तुमच्या दोघांची नावं नोंदवली आहेत.' - शामची आई.

'आमच्या नावापुढे आमचा व्यवसाय नोंदवला आहे ना? मी पोलीस अधिकारी, वीस दिवस फिरतीवर, आणि शाम चांगलवाडी सारख्या छोट्या खेड्यात डॉक्टरी करतो. मग आम्हाला सत्तर टक्के भिती नाही.'

जगन्नाथ आणि शाम एकमेकाला टाळी देतात. त्याच वेळी बच्चूला घेऊन दुर्गा खोलीत प्रवेश करते. शामच्या आईला बघून, दुर्गाच्या कडेवरनं उतरून, एकेक पाऊल टाकत, जीऽऽ जीऽऽऽ म्हणत तो शांताबाईकडे जाऊ लागतो. शांताबाई म्हणते, 'आलेऽ आले. माझा गोपाळकृष्णा चालायला लागला. येऽऽ शांताबाईनी त्याला उचलून घेतलं. याचे पटापट मुके घेतले. नंतर दागिन्याच्या पिशवीतून चांदीचे पैंजण काढले आणि बच्चूच्या पायात अडकवले. पैंजणाचा आवाज ऐकून बच्चू नाचू लागला. एकदा स्वत:च्या आईकडं, एकदा शामकडं, एकदा आजीकडं अशा फऱ्या मारणं सुरू झालं. पैंजणाचा आवाज आला की खाली वाकून पैंजण चाचपून बघायचा. पुन्हा फरी मारणं चालू. हा प्रकार बघून जगन्नाथ म्हणाला, -

'काकूऽऽ लहान मुलं म्हणजे आनंदाचा झराच असतात. शाम, काकूंचं म्हणणं मनावर घे, लवकर लग्न कर, आणि असं सुंदर मूल त्यांच्या कुशीत जोजावण्यासाठी दे. दुर्गा, मी म्हणतो ते खरं आहे ना?'

'अवो, दादा चांगळवाडीला निघाले व्होते तवा म्याबी दादांना गळ घातली व्हती. म्हनलं, चांगलवाडीला जायाच्या आधी एक सुंदर मुलगी शोधा, लगीन करा आन बायकोला घिऊन जा खुशाल वाडीला. पोरं होत्यात आपोआप!!' - दुर्गा.

दुर्गाच्या या बोलण्यावर सगळे हसत सुटले. पण त्याचवेळी गुरुजींच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आला. 'शाम लवकर ये. तुझी आजी निपचित पडली आहे. श्वास घेत नाही, काही हालचालही करत नाही.' - गुरुजी.

गुरुजींचा आवाज ऐकून शाम आणि दुर्गा आजींच्या खोलीकडं धावले. गुरुजींची पत्नी पलंगावर निपचित पडली होती. शामनं दुर्गाला आजीचे कपडे सैल करायला सांगितले आणि स्वत:ची बॅग घेऊन आला. बॅगेमधून सीरिंज, एक इंजेक्शन काढलं आणि ते आजींच्या हृदयात टोचलं आणि दुर्गाला त्यांच्या पायाला मसाज करायला सांगितलं. आणि स्वत: छातीवर दाब देऊन पंपिंग करत राहिला. काही क्षणात आजींचा अडकलेला श्वास सुटला आणि त्यांनी डोळे उघडले. सगळ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. आजींनी उठून बसण्याची धडपड चालवली. पण

शामनं सकाळापर्यंत हालचाल न करण्याचा सल्ला दिला. आजी म्हणाल्या, 'शाम, सगळा समारंभ अगदी छान झाला हो. अगदी दृष्ट लागण्यासारखा झाला. पण माझ्यामुळं विघ्न येऊन, साखरेच्या चहात मिठाचा

खडा टाकल्यासारखं झालं. तुझ्या आईला सांग मला माफ करायला.... मला आता खूप बरं वाटतयं. तुम्ही जा आपापल्या कामाला.' - आजी.

'आजी, मला सांगा तुम्ही पाणी कसं पिता?' - शाम.

'इश्श, कसं म्हणजे काय? सगळे पाणी पितात, तसं मी पण पिते.' - आजी.

'ते ठीक आहे. पण मला विचारायचं होतं की पाणी पिण्याची पद्धत कशी आहे? पाण्याचं भांडं तोंडाला लावून, का आऽऽ करून, भांडातलं पाणी तोंडात टाकून घटाऽ घटाऽऽ असा आवाज करत पाणी पिता?' - शाम.

'हो. पाणी तोंडात टाकूनच पाणी पिते.' - आजी.

'आपल्या भोवतालची माणसं, इतर प्राणी, असं तोंड वर करून पाणी पिताना बघितलय कधी? नाही ना? म्हातारपणी घशाच्या नसां संकुचित होतात. पाणी पिण्यासाठी तोंड वर केलं की त्या नसांवर दाब येतो. त्यामुळं मेंदूकडं जाणारा रक्त प्रवाह कमी होतो आणि चक्कर येते. म्हणून आजपासून भांडं तोंडाला लावून पाणी पिण्याची सवय करा. दुर्गा, तू आजीकडं लक्ष ठेव. किंवा पाण्याचा तांब्या - भांडं त्यांच्याजवळ ठेवूच नको'

आजोबा, आजी हसत सुटले. दुर्गासुद्धा तोंडावर पदर घेऊन हसू दाबण्याचा प्रयत्न करू लागली. सगळं स्थिरस्थावर झाल्यावर शामची आई आणि जगन्नाथ, गुरुजींचा आणि आजींचा निरोप घेऊन साताऱ्याकडं निघून गेले.

साताऱ्याला पोहोचेपर्यंत दिवे लागण झाली होती. शांताबाईंना त्यांच्या वाड्यात सोडून जगन्नाथ त्याच्या क्वार्टरकडं निघून गेला. शांताबाई त्यांच्या वाड्यात शिरताच त्या वाड्यातले भाडेकरू आळीपाळीनं भेटून, त्यांची, दवाखान्याच्या उद्‌घाटन समारंभाची चौकशी करून गेले. कुणी तांब्याभर पाणी

आणून दिलं, कुणी चहा-बिस्किटं आणून दिली. कोण कोण आलं होतं, वैशाली का गेली नाही, ती वाड्यातच, तिच्या नव्या मित्राबरोबर का राहिली होती वगैरे माहिती देण्या-घेण्यात शांताबाई गुंग होत्या. तेवढ्यात वैशालीचा ओरडण्याचा आवाज आला. 'करण, माझा पदर सोऽऽड.' शांताबाई लगबगीने वैशालीच्या खोलीकडं धावल्या. त्यांना एवढंच दिसलं की वैशाली तिच्या खोलीच्या अर्धवट बाहेर आली आहे. आणि मागून कुणी तरी तिचा पदर ओढत आहे. शांताबाई खोलीच्या जवळ गेल्या, दार ढकललं, आणि पदर ओढणाऱ्या तरुणाच्या कानशिलात

भडकावली. आणि विचारलं, ‘कोण आहेस रेऽ तू? माझ्या लेकीचा पदर ओढताना लाज वाटली नाही तुला? मुकाट्यानं चालता होऽ आणि पुन्हा या वाड्यात पाऊल टाकू नकोस.’ - शांता.

‘एऽऽ बुढिया, तू क्या समझती है आपने आपको? यह जायदाद तुम्हारी है?’ करण.

‘हो! हा वाडा माझ्याच मालकीचा आहे.

‘तुला काय वाटलं हा वाडा, या वाड्यात राहणारी माणसं, गुलाम आहेत तुझे? माझ्या मुलीच्या पदराला हात घातलास? आत्ताच्या आत्ता चालता हो वाड्याच्या बाहेर.’ - शांताबाई.

‘काकू, माझं ऐकून घेता का थोडे. आमच्या हॉस्पिटलमध्ये डोळ्याच्या ऑपरेशनचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी वेगवेगळ्या मेडिकल कॉलेजमधले तीन-चार सर्जन आले आहेत, नेहमीच येतात. कारण हा त्यातलाच एक विद्यार्थी आहे. त्याला हॉस्टेलात राहायचं नव्हतं. म्हणून डॉक्टर कोकीळ म्हणाले, तुमच्या वाड्यात एखादी खोली देण्यासारखी असेल तर करणला तिथं राहू दे. म्हणून मी त्याला आपल्या वाड्यावर घेऊन आलो. आमची ओळख झाली. मैत्री झाली....’ वैशाली.

‘चार आठ दिवसात मैत्री इतकी गाढ झाली की, पदर ओढण्यापर्यंत मजल मारली या गुंडानं, असंच ना!!’ - शांता.

‘नाही काकूऽ त्या हेतूनं पदर ओढला नव्हता. आम्ही एकमेकाची थट्टा मस्करी करत होतो. माझ्या बोलण्यावर प्रतिक्रिया दाखवण्यासाठी करणनं हात उगारला, मी दाराकडं पळाले, मला आडवण्याचा करणनं प्रयत्न केला. त्या गडबडीत माझा पदराचं टोक त्याच्या हातात सापडलं. मी किंचित ओरडले. त्याच वेळी तुम्ही आलात आणि.....’ वैशाली.

तूच म्हणती आहेस, म्हणून मान्य करते. तरी पण वाड्यात दोन-तीन खोल्या रिकाम्या आहेत. त्यातल्या एखाद्या खोलीत करणला राहू दे.’

दुसरे दिवशी सकाळी बरोबर आठ वाजता काकूंनी आवाज दिला. ‘वैशूऽऽऽ करणऽऽऽ, झाली की नाही तुमची तयारी? नाश्ता तयार आहे. लवकर या. नाहीतर हॉस्पिटलमध्ये जायला उशीर होईल.’

दोघं डायनिंग टेबलवर येऊन बसले. वैशालीनं, झाकून ठेवलेल्या नाश्त्यावरली झाकणं उघडून बघितली आणि म्हणाली -

'काकूऽ हे बटाटे वडे, शिरा, चहा, कॉफी सगळं एकटीनं करत बसलात? मला का नाही बोलावलंत!' शांताबाई.

'वैशूऽऽ आगं आमचं आयुष्य असल्या गोष्टी करण्यातच गेलं. तुमच्या सारखं शिकावं, डॉक्टर, वकील व्हावं. खटले लढावे, ऑपरेशन्स करावीत, हॉस्पिटलमधल्या किंवा कोर्टातल्या कामाचा ताण-तणाव आला तर मित्र मैत्रिणींची छेड काढून तो ताण-तणाव दूर करावा. या गोष्टी आम्हाला माहीतच नाहीत, आणि तुम्हाला घरगुती कामाची ओढ नाही. या भिन्न परिस्थितीत समन्वय कसा घडून येणार?' शांता.

तिघं एकमेकांकडं बघत, विचार करत राहिले. क्षणभरानं करण म्हणाला - 'आंटीजी, आप मेरी मम्मी बनेगी, जैसी वैशाली की बनी है?'

'करण, अरेऽ प्रत्येक स्त्रीमध्ये मुलासाठी धडधडणारे नाजूक हृदय असतं. आणि प्रत्येक मुलाला त्या धडधडणाऱ्या हृदयाचं आकर्षण कळत असतं.' - ममी.

'मम्मीजी, या गोष्टी तुम्ही कुणाकडून शिकलात?' - करण.

किंचित हसून शामची आई म्हणाली - 'करण, या गोष्टी शिकाव्या लागत नाहीत. कान, डोळे आणि संवेदनशील मन उघडं ठेवलं की त्या आपोआप तुमच्या वागणुकीतून इतरांना दिसू लागतात.... करण, कसला विचार करतोयस?' - शांता.

'विचार म्हणजे, माझे आई-वडील सदैव पैसा कमावण्यासाठी धडपडत असतात. मी काही विचारलं किंवा मागितलं की माझ्या तोंडावर चार-पाच हजार रुपये फकले की संपलं त्यांचं कर्तव्य.' - करण.

त्याचवेळी करणचा मोबाईल वाजला आणि मेसेज मिळाला. ''तुझी आई हार्ट ॲटॅकनं मृत झाली आहे. ताबडतोब परत ये''

मेसेज वाचून करण वेड्यासारखा हसूं लागला. आणि नंतर रडू लागला. वैशालीनं मोबाईल मधला मेसेज वाचला आणि म्हणाली, काकू, करणची ममी मेली आहे. करणला ताबडतोब परत बोलावलं आहे.'

काकूंनी करणच्या पाठीवरून हात फिरवला आणि म्हणाली, 'करण शांत हो. अशा प्रसंगी मी तुझी फक्त सांत्वन करू शकते. विमानानं जा म्हणण्याची ताकत माझ्यात नाही रेऽऽ' - शांता.

'काकू एवढी सांत्वना केलीत हेच खूप झालं. माझ्याकडं विमानाचं ओपन रिटर्न तिकीट आहे. मी निघतोच.!' - करण.

आवरा आवरी करून आणि शांताबाईंच्या पाया पडून करण दहा मिनिटाच्या आत बाहेर पडला.

-----

'सातारा जिल्हा पुलीस हेडक्वार्टर्स अँड ट्रेनिंग सेंटर' एका टेकडीच्या पायथ्याशी विस्तीर्ण भागात पसरलं होतं. सेंटरच्या मध्यावर डीएसपीचं निवास आणि त्याच्या आजूबाजूला डी. एस. पी.च्या मदतनिसांच्या तीन चार क्वार्टर बांधलेल्या होत्या. डी. एस. पी.च्या कारचा सायरन वाजल्या बरोबर संपूर्ण संकुल खडबडून जागं झाल्याचा भास झाला. डी. एस. पी.ंची कार त्यांच्या बंगल्यासमोर उभी राहिली. सेकंड ऑफिसरनं समोर येऊन सॅल्यूट मारला. ड्रायव्हरनं पट्कन कारचं दार उघडलं. जगन्नाथ आणि समशेर कारच्या बाहेर आले. तिथलं सगळं वातावरण बघून समशेर घाबरला होता. जगन्नाथ म्हणाला, 'लवकरच तुझं ट्रेनिंग सुरू होईल. तोपर्यंत इथल्या वातावरणाशी समरस होण्याचा प्रयत्न कर. हे सब-इन्स्पेक्टर पाटील तुला मार्गदर्शन करतील. त्यांची ऑर्डर म्हणजे माझी ऑर्डर आहे असं समजून त्या प्रमाणे वाग. कष्ट होतील, त्रास होईल, टॉर्चर करतायत असं वाटेल, पण आता त्यातून सुटका नाही. पाटील, टेक चार्ज आफ धिस बॉय. या कॅडेटनं टंगळमंगळ केली तर आपल्या रुलप्रमाणे त्याला शिक्षा करायला माझ्या परवानगीची वाट पाहू नकोस. एनी क्वेश्चन?'

'सर तुम्ही याला चांगलवाडीतून घेऊन आलात, त्याचं कारण कळू शकेल?' - पाटील.

'पाटील, ज्या डॉक्टरच्या दवाखान्याच्या उद्घाटनासाठी मी चांगलवाडीला गेलो होतो तो माझा बाल मित्र. त्याच्या दवाखान्यात नर्स म्हणून काम करणारी तरुणीही माझ्या चांगल्या ओळखीची होती. त्या दोघांना समशेरनं भर सभेत मूर्खासारखे प्रश्न विचारले. म्हणून कार्यक्रम संपल्यानंतर मी त्याला फलावर घेतला. त्याच्याशी बोलताना मला जाणवलं की तो खरं बोलतोय. पण त्या बोलण्यात अहंकार ठासून भरला होता. तो अहंकार चिरडून टाकला पाहिजे. कसा ते तुला चांगलं माहीत आहे. तशा शिक्षा करायला माझ्या ऑर्डरची वाट पाहू नकोस.'

'सर, त्याचे डोळे बघितलेत? समोरच्याला खाऊ का गिळू असे भाव असतात त्याच्या डोळ्यात?' इन्स्पेक्टर पाटील.

'आय नो! म्हणूनच त्याला माझा 'पी. ए.' म्हणून निवडलाय. टेक चार्ज ऑफ दॅट बॉय? - जगन्नाथ.

'येस सर' - इन्स्पेक्टर पाटील.

-----

करण मिळेल त्या फ्लाईटनं दिल्लीला पोहोचला. आईचे अंत्यसंस्कार उरकून परत आला. अर्धवट राहिलेलं कोकिळांच्या हॉस्पिटलमधलं प्रॅक्टिकल ट्रेनिंग पूर्ण करून वाडा सोडण्याची तयारी करत होता. त्याचवेळी वैशाली त्याच्या खोलीत आली आणि म्हणाली -

'करण झाली तयारी? तू म्हणत होतास तसं चांगलवाडीलाच जाणार आहेस ना?' वैशाली.

'होऽ! महाराष्ट्रात डोळ्याचं हॉस्पिटल कुठं काढावं त्याबद्दल डॉ. शामकडून टिप्स मिळाल्या तर बरं होईल. आणखी एक काम कर. मी दिल्लीहून परत आलो त्या दिवशी मी काकूंना पंचवीस हजाराचा चेक दिला होता. माझ्या राहण्या जेवणाच्या खर्चापोटी. तो चेक एनकॅश झाला की नाही...' - करण.

'तो चेक गेला चुलीत!' - वैशाली.

'म्हणजे?' करण.

'म्हणजे जळला! काकू गेस्ट हाऊस चालवत नाहीत! प्रेमानं जेवू घालतात. भाडेकरूकडून मिळणाऱ्या पैशातून तेल-तूप आणून द्यावं लागतं?' वैशाली.

'कमाल आहे! तू निघताना पैशाचा विषय काढूच नकोस. काकूंनी नंतर विचारलंच तर मी सांगीन की करणनं माझ्याकडं दहा हजार देवून ठेवले होते.' - वैशाली.

वरील प्रमाणे काय बोलायचं ते ठरवून करण आणि वैशाली काकूजवळ आले. करणनं काकूंना नमस्कार केला आणि विचारलं - 'काकू मी असं ऐकलं की तुमचा मुलगा एका खेड्यात डॉक्टरी करतोय?' - करण.

'हो! एम. बी. बी. एस. करून त्यानं आमच्या या वाड्यातच दवाखाना काढावा अशी शामच्या वडिलांचो इच्छा होती. पण त्याच्या लहानपणापासून त्याचे लाड करणारी, त्याला चांगल्या गोष्टी शिकवणारी, खेड्यातल्या लोकांचे औषध पाण्यावाचून कसे हाल होतात ते सांगणारी, खेड्यात राहणारी, गोदाक्का नावाची म्हातारी आमच्या वाड्यात राहात होती. तिनंच शामला चांगलवाडीत दवाखाना काढण्याची वाट दाखवली.' - काकू.

'तुम्ही त्याला विरोध केला नाहीत?' - करण.

'अरे, मुलांचं कर्तृत्व घडवण्यापर्यंतच आई-बापाचं काम असतं. त्यानंतर आई-बापांनी त्यांचे विचार मुलांवर लादले की, भांडणं सुरू होतात.'

'डॉ. शामकडून मार्गदर्शन मिळावं म्हणून एक-दोन दिवस त्याच्याकडं जाण्याचा विचार आहे.' - करण.

'अवश्य जा. वैशालीच्या आजोबांच्या वाड्यात शामनं दवाखाना सुरू केला आहे. वैशूऽऽ तू जाणार आहेस का आजोबा-आजींना भेटायला?' - काकू.

'नाही काकू. मला सुट्टी मिळणार नाही. आणखी दोन बॅचेस येणार आहेत ट्रनिंगसाठी.' वैशाली.

'ठीक आहे. मी स्वत:च जाईन शोधत, शोधत!' करण.

करण साताऱ्याच्या एस. टी. स्टँडवर पोहोचला. तिथं चौकशी केल्यावर कळलं की चांगलवाडीला जायचं असेल तर एस. टी. किंवा प्रायव्हेट कार हीच दोन साधने आहेत. एस. टी. सकाळी सात वाजता जात. त्यामुळं करणकडे प्रायव्हेट कार हाच पर्याय उरला होता. तो प्रायव्हेट कारच्या स्टँडवर आला. चार-पाच कार स्टँडवर उभ्या होत्या. आपापसात बोलणी चालू होती. 'एऽऽ, संभ्या मुंबईहून परतला नाही का?' पहिला ड्रायव्हर.

'त्याची ९३९३ गाडी लायनीत उभी आहे.' दुसरा ड्रायव्हर.

'आरं त्यो बघ. संभ्या कँटीनमधून बाहेर पडतोय.' तिसरा ड्रायव्हर.

'संभ्या, ये लवकर, तुज्या गावी जान्यासाठी पावनं आलं हायती.' - पहिला ड्रायव्हर. संभ्या लगबगीनं करणजवळ आला आणि म्हणाला,

'गुड् मॉर्निंग सर! तुमी कंच्या कंपनीचे प्रतिनिधी हाय सा? पतंजली, झंडू, वैद्यनाथ....' संभ्या.

'नॉनसेन्स! मी विक्रेता वाटलो तुला? मला डॉ. शामला भेटायचंय. मी पण डॉक्टर आहे.'

'असं व्हय चला की.' संभ्या.

'किती पैसे घेशील?' करण.

'द्या तुमच्या मर्जीला येईल त्येवढे.' संभ्या.

'मी दहा रुपये दिले तर घेशील.' करण.

'दहा रुपयाच्या डिझेलमध्ये गाडी पळेल तिथपर्यंत जाऊ. ते संपले की पुन्यांदा दहा रुपये द्या!' संभ्या.

'हुशार आहेस. चल. चांगलवाडीला पोहोचल्यावर डॉ. शाम सांगतील तेवढे पैसे देईन. कळल?' - करण.

'कबूल! चला.' - संभ्या.

सातारा ते चांगलवाडी, मधल्या वाटेनं गेलं तर तीन चार तास लागतात. मधून मधून जेवण, चहापाणी वगैरे करता करता चांगलवाडीला पोहोचायला संध्याकाळचे चार पाच वाजले. संभ्यानं कार शामच्या दवाखान्याच्या समोरच उभी केली. नर्सच्या पेहेरावातली यमुना समोर आली आणि म्हणाली,

'डॉ. करण, वेलकम चांगलवाडी. मी यमुना. डॉ. शामची असिस्टंट.' - यमुना.

'हाऊ कम यू नो मी.' - करण.

'वैशाली मॅडमचा फोन आला होता, तुम्ही येणार म्हणून. हॅव ए सीट प्लीज.' एवढं बोलून यमुना आत गेली आणि एका ट्रेमध्ये पाण्याचा ग्लास आणि चहाचा कप घेऊन आली आणि तो ट्रे करणजवळ ठेवला. करणनं विचारलं,

'मॅडम, डॉ. शाम व्हिजिटला गेलेत का?'

'नाही. आतल्या भागात एका पेशंटला तपासतायत. तुम्ही चहा घ्या ना!' यमुना.

करणनं चहाचे दोन घोट घेतले. क्षणभरानं डॉ. शाम एक म्हातारीला आधार देऊन बाहेरच्या हॉलमध्ये आला आणि म्हणाला,

'आजीऽ सांभाळून घरी जाल ना? का कुणाला सोबत पाठवू?' डॉ. शाम.

'कुणाला पाठवतोस बाबा! पाऊल टेकवत नव्हतं ते काही धरून चालायला लागले तुझ्या औषधामुळं. आता आणखी चार दिवसाचं औषध खाऊन पळत पळत दवाखान्यात येते की नाही बघच!!' आजी दवाखान्याच्या बाहेर पडल्या.

डॉ. शाम कन्सलटिंग रूममध्ये परत आला आणि म्हणाला. 'डॉ. करण, आय ॲम सॉरी. तुला ताटकळत बसावं लागलं?' शाम.

'इट्स ओके. बाहेर तुझा नेहमीचा ड्रायव्हर बसला आहे. त्याला विचार सातारा ते चांगलवाडी बिल किती झालं?'

शामनं संभाजीला आत बोलावलं आणि विचारलं, 'संभाजी तुझं बिल किती झालं?'

'तुमास्नी माहीत न्हाई व्हय? पन पावन्यांच्या माहितीसाठी सांगतो. सातारा ते चांगळवाडी, मधल्या वाटेनं अंतर होतं दोनशे साठ किलोमीटर. वीस रुपये किलोमीटर प्रमाणं होतात पाच हजार दोनशे रुपये. पाच हजार रुपये द्यायला सांगा पावन्यास्नी.' संभाजी.

'माझ्याकडून तर चार हजार रुपये घेतोस.' डॉ. शाम.

'अवो, मानसा मानसात फरक असतुया. आन् तुमच्या टायमाला डिजलचा भाव आटोक्यात व्हता. आता झालाय दुप्पट! तुमच्या पावण्यानं ट्रिपल फाइवच्या सिगरेटी फका फका फ़ुकून दोन डबे संपवले, त्याला पाच हजार जादा होतोल

व्हय? आन् चार तासाच्या जर्नीत येकदाबी विचारलं न्हाई च्या-पानी घेनार कां? स्वोता मात्र धाबा दिसला की भजी, मेदूवडा, बटाटेवडा, वडा-सांभार, काय काय हादडलं.' संभाजी.

डॉ. शामनं करणची कशी बशी समजूत काढली आणि संभाजीला आत बोलावून पाच हजार रुपये द्यायला सांगितले. करणनं उद्या सकाळी नऊ वाजता परत न्यायचं आहे तेव्हा ये, अशी ऑर्डर दिली. पण पंचायत समितीच्या अध्यक्षांना पुन्याला घेऊन जायाचं हाय असं सांगून स्वत:ची सुटका करून घेतली. संभाजीला सोडून करण आणि शाम त्याच्या कन्सलिटंग रूममध्ये आले. शामनं विचारलं - 'मि. करण, व्हाट डू यू वाँट टू नो फॉम मी?' डॉ. शाम.

'नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी काय काय तयारी लागते त्या मुद्यापासून सुरुवात केलीस तर बरं होईल. उदा. दवाखान्याची जागा कशी निवडावी?'

'तू चार वर्ष डिग्री कोर्स आणि नंतर दोन वर्ष स्पेशलायझेशन केलं आहेस. डोळ्याच्या डॉक्टरची गरज, माणसं असतील तिथे भासणारच!' शाम.

'स्वत:चं प्रॅक्टिस सुरू करताना कोणती विशेष खबरदारी घ्यावी.' - करण.

'सर्वात पहिली गोष्ट म्हणजे स्वत:च्या अहंकार बाजूला ठेवावा. काय त्रास होतोय ते पेशंटलाच विचारावं. कोणत्या औषधानं काणता रोग बरा होतो हे हल्ली रोग्यांना माहीत असतं. त्यामुळं 'सेल्फ मेडिकेशन' केलंय का त्याची चौकशी करावी. आपल्यापेक्षा पेशंट हुशार असतात हे मान्य करावं. लहान मुलं आणि म्हातारे पेशंट यांना मोकळेपणानं बोलण्याची संधी द्यावी, किंवा गोष्ट सांगून त्यांचं लक्ष दसरीकडं वळवावं. आपण दिलेल्या औषधानं पेशंटला १५ ते २० टक्के रिलीफ मिळाला नाही तर औषधात बदल करावा. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डॉक्टर आणि पेशंट मध्ये मित्रत्वाचे संबंध निर्माण करावेत.' डॉ. शाम.

‘फॅन्टॅस्टिक! आपण दोघं मिळून चांगलवाडीतली सगळी रोगराई नष्ट करून टाकू.’ - करण.

‘आपण दोघं?.... सॉरी. मी तसा प्रस्ताव मांडलेला नाही.’ डॉ. शाम.

‘ठीक आहे. माझ्या बरोबर काम करायचं नसेल तर तू दुसरीकडं दवाखाना सुरू कर.’ - करण.

‘तुला वेड लागलय् कां? हा दवाखाना उभा करण्यासाठी मी खूप धडपड केली आहे. तीन चार लाख रुपये खर्च केले आहेत!’ डॉ. शाम.

‘एवढंच ना. मी तुला पांच लाख रुपये द्यायला तयार आहे.’ करणनं चेकबुक शाम समोर टाकलं.

त्यावेळी पोलीस पाटलांनी बाहेरून आवाज दिला - ‘डॉक्टरसाहेब तुमचा दवाखाना हडप करन्यासाठी दिल्लीहून येक डोस्क फिरलेला डागतर आलाय का?’

‘होऽ हो! आलाय. आत या.’ डॉ. शाम.

पोलीस पाटील आत आले. त्यांना बघून करण टेबलाखाली लपण्याची धडपड करू लागला. पोलीस पाटलांनी करणच्या पॅंटचा पट्टा पकडून त्याला बाहेर ओढला आणि म्हणाले, ‘कारं भाड्याऽ तू एम. डो. ए फार सीयस डॉक्टर हायेस ना? मंग त्वांड का लपवतुयास? मुकाट्यानं त्या खुर्चीवर बस!!’

शामनं पोलीस पाटलांना विचारलं - ‘पाटीलसाहेब तुम्हाला कसं कळलं हा माणूस डोकं फिरलेला, खोटारडा आहे?’ शाम.

‘आपले डी. एस. पी. सायेब जनवट कंपन्यांच्या मिटिंगसाठी....’

‘जनवट कंपन्या नाहीत, जायंट कंपन्या.’ डॉ. शाम.

‘त्येच त्ये! त्याच्या मिटिंगसाठी खास पावनं म्हणून बोलावलं होतं. तवा त्याच्या बापानं या भाड्याच्या करतुतीची माहिती डी. एस. पी. सायबाना दिली. सायबानी सकाळी मला फोनवर कळवलं. म्या टाकोटाक इकडं निघून आलो. शामराव, या चोरट्याला म्या अटक करून घिऊन जानार हाय. त्या आधी दवाखान्यातल्या जिनसा जिथल्या तिथं हायेत का तपासा. नसतील तर दावतो माजा इंगा.’ पोलीस पाटील.

‘मी दोन मिनिटंच एका म्हातारीला दरवाज्यापर्यंत फोहोचवायला गेलो होतो. तेवढ्यात... होऽ या भिंतीवर माझं एम. बी. बी. एस.ची सर्टिफिकेट टांगलेलं होतं. ते दिसत नाही.’ डॉ. शाम.

‘बगाऽऽ! या यड्यानं तुमच्या वर्मावरच घाव घातला... एऽ पावन्या, आनखी काय, काय चोरलंस?’ पोलीस पाटील.

‘शट्अप्! मी चोरटा वाटलो तुम्हाला?’ करण.

‘चोरटा नाहीस ना? मग तुझी बॅग उघडी करून दाव.’ पोलीस पाटील.

‘माझी झड़ती घ्यायची असेल तर कोर्टाची लेखी परवानगी घेऊन या.’ करण.

पोलीस पाटलांचा राग सर्रकन डोक्यात गेला आणि म्हणाले, ‘कोरटाची लेखी आर्डर पायजे तुला? ही घेऽऽऽ’ असं म्हणून पोलीस पाटलांनी करणच्या गालावर सणसणीत थप्पड मारली. नंतर डोक्यापासून पायापर्यंत करणला न्याहाळून पोलीस पाटील म्हणाले, ‘डॉक्टर सायेब, तुमचा हा पावना अगदीच लेचापेचा हाय. येक थप्पड खाल्ल्यावरूबर पटलून वली जाली त्याची. एऽऽ मुतऱ्या, आपलं काम झाल्यावर फरशी डेटॉलनं पुसून काढायची!! हंऽऽ तुझी ब्रीफ केस उघड! उघडतोस का खायचाय आनखी येक दनका?’ पोलीस पाटलानं हात उगारला. करणनं नाइलाजानं ब्रीफ केस उघडली. अगदी वरच्या भागात ओलं झालेलं बनियन आणि जांघिया होता. पोलीस पाटलाने ते कपडे मेलेल्या उंदरासारखे चिमटीत पकडले आणि खाली टाकून दिले, त्या खालचे कपडे बाजूला ठेवले आणि तळाशी दवडवलेलं शामचं एम. बी. बी. एस.च सर्टिफिकेट, स्टेथास्कोप आणि काही कोरे प्रिस्क्रीपशन फार्मस बाहेर काढले. पोलीस पाटील म्हणाले, ‘दिल्लीकर, मोठा डल्ला मारण्याची योजना व्हती. आता समद्या जिनसा तुझ्या ब्यागेत कशा आल्या?’ पोलीस पाटील.

‘तोच विचार करतोय!’ करण.

‘तुज्या मायला! मुंडी मुरगाळली की पोपटासारका बोलायला लागशील! दिल्लीकर दिवटे, तुमची शंभरी भरली! कोर्टात केस उभी ऱ्हाईल तो पोत्तर कच्च्या कैदीची मजा चाखा आमच्या चौकीत.’

करणच्या मुसक्या बांधून, त्याला भर बाजारातून घेऊन जाताना पोलीस पाटलाच्या चेहऱ्यावरचा आनंद बघण्यासारखा होता.

------

सातारा जिल्हा पोलीस क्वार्टर आणि ट्रेनिंगमधली ‘टॉचर रूम.’ रात्रीची वेळ होती. त्या रूमच्या मध्यावर समशेरला टांगण्यात आलं होतं. समशेरच्या अंगावर फटके मारल्याच्या खुणा होत्या. आणि कमरेवर एक जांघिया

फक्त होता. मधूनच तो 'पाणीऽऽ पाणीऽऽ अशी क्षीण आवाजात मागणी करत होता. पण त्याच्या मागणीची दखल घेईल असं कुणीही जवळपास नव्हतं. जोरात ओरडून, दु:ख दाबून टाकण्याचा एक दोनदा त्यानं प्रयत्न केला. त्यानंतर मात्र समशेरची शक्ती संपली, आणि हाय पाय ढिले करून, दु:ख गिळून तो खोलीच्या मध्यावर लटकत राहिला.

दुसरे दिवशी सकाळी साडेसात वाजता खोली साफ करणारा माणूस खोली साफ करून गेला. तो सफाई कामगार बहिरा असावा. कारण समशेरच्या बोलण्याकडे त्यानं अजिबात लक्ष दिलं नाही. सफाई कामगार निघून गेल्यावर इनस्ट्रक्टर पाटील आणि दोन ऑर्डरली खोलीत आले. एका ऑर्डरलीच्या हातात कपडे आणि दुसऱ्या ऑर्डरलीच्या हातात नाश्त्याचा ट्रे होता. पाटील साहेब म्हणाले, 'मि. समशेर तुला १११ नंबर दिला आहे. आत्तापासून तुला त्या नंबरानं ओळखल आणि बोलावलं जाईल. एका ऑर्डरलीनं १११ ला खाली उतरवून घेतलं. त्याला कपडे घालायला सांगितले. दुसऱ्या ऑर्डरलीनं नाश्त्याचा ट्रे समशेर समोर ठेवला आणि दोन्ही ऑर्डरली निघून गेले. समशेर पाटील साहेबांना म्हणाला, 'साहेब, मी तुमच्या पाया पडतो. मला आता ही टॉर्चर सहन होत नाही. मला बाहेर काढा आणि घरी जायची परवानगी द्या.' समशेर.

'तुला घरी जाऊ द्यायची परवानगी देण्याचे अधिकार मला नाहीत. डी. एस. पी. साहेब आले की त्यांना लेखी रिक्वेस्ट कर. आणि काय रे, तुझी मस्ती दोन दिवसात उतरली? शेजार पाजारच्या लोकांना धमकावताना तुझ्यातली गुंडगिरी उसळी मारत होती. डी. एस. पी. साहेबांची कार तुला घरी सोडायला आली होती तेव्हा शेजार पाजारचे लोक तुझ्याबद्दल काय म्हणाले ठाऊक आहे? म्हणाले, 'या गुंडाला असाच दणका बसायला पाहिजे.' वयाची अठरा वर्षे भानगडी करण्यात घालवली, आता अठरा वर्ष बस खडी फोडत.'... थोडक्यात काय, लोक तुझ्या गुंडगिरीला घाबरत होते. पण आता तुझी इथून सुटका नाही. नंतर पाटील साहेब ऑर्डरलीला म्हणाले, 'राणे नऊ वाजता न्हावी येईल. त्याला १११चा सोल्जर कट करायला सांग. नंतर त्याला गरम पाण्यानं अंघोळ करू दे?' पाटील.

पुढचे दोन दिवस त्याच रूममध्ये काढून, केस कापून, १११ नंबरचे कपडे वापरायला सुरुवात करून आणि पुढच्या दोन महिन्याचा ट्रेनिंग प्रोग्राम कसा राबवला जाणार ते पाहून समशेरच धाबं दणाणलं. सकाळी सहा वाजता प्रार्थने पासून रात्री नऊ वाजता जेवणानंतर शतपावली पर्यंतचे सगळे कार्यक्रम मिनिट टू मिनिट पाळावे लागणार होते. या कार्यक्रमातून सुटका करून घेण्याची सवलत कुणालाही नव्हती. अगदी डी. एस. पीं.ना सुद्धा!

-----

जायंट कंपन्यांच्या प्रमुखांची द्विवार्षिक सभा संपवून डी. एस. पी. जगन्नाथ साताऱ्याला परतला. जगन्नाथाने त्या सभेत प्रमुख वक्ता या नात्यानं दिलेल्या भाषणानं कंपन्यांच्या प्रमुखांमध्ये आणि प्रसार माध्यमांमध्ये उलट सुलट

चर्चेला उधाण आलं होतं. जगन्नाथानं त्याच्या भाषणाचा विषय निवडला होता - 'कंपन्यांचा नफा आणि सामाजिक बांधिलकी? त्या विषयाचं स्पष्टीकरण करतानाच डी. एस. पी.नं सुरुवातीला सांगितले. 'मित्रांनो, मी काही कसलेला वक्ता नाही किंवा तुमच्या सारखा करोडोची उलाढाल करणारा कारखानदार पण नाही. तरी पण गेल्या पंधरा-वीस वर्षांत जमा झालेल्या पोलीस खात्यातील अनुभवाच्या आधारे मी काही विचार तुमच्या समोर मांडणार आहे. ते तुम्ही ऐकून घ्यावेत अशी विनंती आहे.'

भारतात अलीकडेच झालेल्या जनगणनेनुसार भारताच्या लोकसंख्येमध्ये पंचवीस ते तीस वयोगटातल्या युवकांची संख्या एकूण संख्येच्या ३५ ते ४० टक्के आहे. एवढ्या मोठ्या संख्येने आणि तारुण्याने मुसमुसलेला देश, 'राहणीमान निर्देशांकानुसार' मात्र जागतिक क्रमवारीत चवथ्या-पाचव्या नंबरावर फकला गेला आहे. तीन बाजूनं समुद्र, प्रचंड भू-भाग, खनिजाची रेलचेल, भरपूर पाऊस, इतक्या सगळ्या नैसर्गिक सुविधा असताना भारतासारखा देश, वैभवाच्या शिखरावर दिसायला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसं दिसत नाही. कारण एकच वैचारिक अंधाधुंद, आणि राजकीय साठमारी!! वेगवेगळ्या प्रांतातले, वेगवेगळ्या पक्षाचे सुभेदार आपली सुभेदारी सांभाळण्यात आणि वाढवण्यात मशगूल आहेत. आणि त्यांना खाली खेचण्यासाठी किंवा सत्ताधाऱ्यांनी कमावलेला पैशातला आपला वाटा लुटण्यासाठी सत्ताधारी पक्षातलेच लोक विरोधाचं बंड उभं करतात. आणि आपला वाटा पदरात पडला की समेटाचं नाटक केलं जातं. जनतेला ही नाटकं कळत नाहीत, असं नाही! पण सत्ताधारी पक्षांना जनतेला शांत करण्याचा मंत्र माहीत असतो. महागाई भत्ता एक दोन टक्के वाढवून दिला की सरकारी नोकर शांत. म्युनिसिपालिट्या आणि खाजगी कंपन्या सरकारच्या पावलावर पाऊल टाकून, त्यांच्या नोकरांची तोंड बंद करतात. प्रोफशनल कंपन्या आधीच आपले सर्व्हिस चार्जेस ठरवून बसलेले असतात आणि ते चार्जेस कधीही आणि कसेही बदलू शकतात. या सगळ्या गदारोळात नाडला जातो तो कष्टकरी, मोलमजुरी करणारा वर्ग. त्यांच्याकडं ना भांडवल असतं, ना सरकारचा पाठिंबा, ना सर्व्हिस चार्जेस ठरवण्याइतके शिक्षण आणि संघटन. असंघटित समाजातल्या एखाद्या गरीबाच्या पत्नीचा किंवा मुलाचा मृत्यू झाला तर पैशाअभावी ते येत, दूर डोंगरात नेऊन आणि तिथल्याच काटक्या कुटक्या गोळा करून प्रेताची विल्हेवाट लावली जाते. त्या घटनेचं चित्रीकरण करून, आपल्या टी. व्ही. चॅनेलवरून प्रक्षेपण करून चॅनल वालेही त्यांची सामाजिक जबाबदारी प्रक्षेपित केल्याचा टेंभा मिरवून वाऽ हव्वा मिळवतात.

'मित्रानो, अशा परिस्थितीत दुर्लक्षित समाजातल्या घटकांसाठी आपण, पैशाच्या रूपात, काही करू शकतो का असा प्रश्न आपणच आपल्याला विचारला पाहिजे. आणि त्याचं उत्तर शोधलं पाहिजे. आपण आपल्या नफ्यातला काही भाग, समाजातल्या त्या वर्गासाठी खर्च करू शकतो का असा ही प्रश्न आपणच आपल्याला विचारला पाहिजे.

महाराष्ट्रातील कर्मवीर, आदरणीय भाऊराव पाटील यांनी स्वत:ला असा प्रश्न विचारला आणि ‘कमवा आणि शिका’ ही वेगळीच चळवळ सुरू केली. मी त्या चळवळीत कसा ओढला गेलो ते सांगण्यासारखं आहे.’

‘मी मूळचा कोल्हापूरचा. माझे आई-वडील माझ्या लहानपणीच वारले. माझ्या काकांनी आमच्या समाईकीतली शेतीवाडी आणि घरदार, स्वत:च्या नावावर फिरवून घेतलं आणि मला घरातून हाकलून दिलं. कुणाची पडतील ती कामं किंवा हायवे वरच्या छोट्या मोठ्या हॉटेलात कप-बशा विसळण्याची कामं करत करत मी मोठा झालो. याच सुमारास कर्मवीर भाऊराव पाटलांच्या ‘कमवा आणि शिका’ या योजनेत सहभागी होण्याचं भाग्य लाभलं. तिथं दोन वर्षे काढली. त्या संस्थेतील मुलांना शहरातल्या घरात कामाला पाठविण्याची प्रथा होती. अशाच एका आजोबांकडं लक्ष ठेवण्याचं आणि मालकीण बाईंना मदत करण्याचं काम माझ्याकडं आलं. हळूहळू मी त्या घरातलाच एक सदस्य झालो आणि मालकीणबाई माझ्या काकू झाल्या. देशपांडे काकू हे एक अजब रसायन होतं. विशेषत: मुलांच्या बाबतीत खाण्या पिण्याचं प्रमाण काकू ठरवतील ते! अभ्यासाच्या वेळाही ठरलेल्या. रात्री दहाला झोपणे आणि सकाळी सहाला उठणे, व्यायाम रोज झालाच पाहिजे. या सगळ्यातून वेळ उरला तर गप्पा आणि खेळ! काकूंना करावं लागणारं आणखी एक काम म्हणजे खडूस नवऱ्याची शिवीगाळ ऐकणे किंवा एखादे प्रसंगी मारझोड सहन करणे. मित्रानो, त्या काळात महाराष्ट्रातल्या जवळ जवळ वीस ते पंचवीस टक्के कुटुंबात हीच परिस्थिती होती.’ डी. एस. पी.

त्याचवेळी एका कंपनीचा सीईओ म्हणाला, ‘मिस्टर डी. एस. पी., तुम्ही वर्णन करताय तशी परिस्थिती, थोड्या फार फरकानं, भारताच्या सगळ्या प्रांतात बघायला मिळेल. मग किती ठिकाणी आणि किती वेळा आम्ही मदतीचा हात पुढं करायचा? आमचे पैसे असे उधळण्यासाठी आहेत का?’ एक सी.ई.ओ.

सी. ई. ओ.च्या या प्रतिक्रियवर प्रेक्षागृहात हास्याची लाट उसळली. आणि टाळ्यांचा गजर झाला. शांतता झाल्यावर जगन्नाथ म्हणाला,

‘सन्मान्य सभासदांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया ऐकल्यावर, मी निवडलेल्या विषयाचं गांभीर्य जास्त प्रकर्षाने जाणवतं. इथं जमलेल्या कंपन्यांच्या प्रमुखांना आग्रहाची विनंती आहे की त्याच्या आस्थापनाच्या ग्रॉस प्रॉफिटमधली अर्धा टक्का रक्कम दरवर्षी बाजूला ठेवावी आणि त्याचा उपयोग गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना कॉलेज शिक्षणासाठी करावा. ज्या प्रदेशात आपण लाखो-करोडो रुपयांचा नफा मिळवतो, त्यातला अर्धा टक्का रक्कम त्याच प्रदेशातल्या गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी आपण खर्च करणं यालाच मी सामाजिक बांधिलकी म्हणतो.’

'तुम्ही म्हणाल हा माणूस आम्हाला ज्ञानाचा डोस पाजतोय पण स्वत: काही करतो का? तर मी नम्रतेनं सांगतो की माझ्या पगारातली दहा टक्के रक्कम अशा कामासाठी राखून ठेवतो. महाराष्ट्र बँकेत माझा अकाऊंट आहे. कुणीही चौकशी करू शकता. आपण माझे विचार शांतपणे ऐकून घेतलेत त्याबद्दल धन्यवाद! जयहिंद.'

कार्यक्रम संपला. बऱ्याच लोकांशी हस्तांदोलन करून, निरोप घेऊन जगन्नाथ त्याच्या कारजवळ आला. थोड्या अंतरावर तीस-बत्तीस वर्षांची एक तरुणी, तिच्या कारजवळ उभी होती. तिचा ड्रायव्हर लगबगीनं जगन्नाथ जवळ आला आणि म्हणाला, 'सर, तुम्हाला वेळ असेल तर आमच्या मॅडम तुमच्याशी बोलू इच्छितात. आत्ता वेळ नसेल तर मॅडमनी तुमचं व्हिजिटिंग कार्ड मागितलं आहे. मॅडम तुम्हाला फोन करतील.'

व्हिजिटिंग कार्डाची देवाण घेवाण करून दोघं निघून गेले.

दुसरे दिवशी सकाळी नऊ वाजता, रविवार असून जगन्नाथ फ़ुल ड्रेसमध्ये राऊंड मारण्याच्या तयारीत होता. तो त्याच्या क्वार्टरमधून बाहेर पडणार तेवढ्यात फोन वाजला. जगन्नाथनं फोन घेतला आणि म्हणाला 'हॅलोऽ गुड मॉर्निंग. मे आय नो हू इन कॉलिंग?'

दुसरीकडून गाड आवाज आला. 'गुड मॉर्निंग डी. एस. पी. साहेब. मी वासंती बोलतीय. भलत्यावेळी फोन करून मी तुमच्या कामात अडथळा नाही ना आणला?' वासंती.

'वासंती?.... वासंती... ओह येस. काल आपली दृष्ट भेट झाली होती. बोला काय सेवा करू आपली?' डी. एस. पी.

'इश्श्य! माझी सेवा कसली करणार? मीच तुम्हाला विनंती करणार आहे की तुमच्या सेंटरपासून अर्धा किलोमीटर अंतरावर आमचा 'शेपी' स्टुडिओ आहे...

'हो. त्याची कमान, स्टुडिओचं नाव, आणि कमानीवर एका गोंडस मुलीचा छोटा पुतळा पाहिला आहे मी. आज मला फोन का केलात?' डी. एस. पी.

'आज तुम्ही आमच्या स्टुडिओला भेट द्यावी अशी आग्रहाची विनंती आहे.' वासंती.

'सॉरी मॅडम. आज भरपूर कामं आहेत. आपले संरक्षण मंत्री आमच्या ट्रेनिंग सेंटरला भेट देणार आहेत. बाय द वे ही 'शेपी' काय भानगड आहे?' डी. एस. पी.

'आम्ही आमच्या ग्राहकांसाठी, त्यांचे थ्रीडी पुतळे तयार करतो. त्यालाच शेपी म्हणतात. तुमच्या सारख्या भारदस्त व्यक्तीमत्त्वाचे पुतळे तयार करणं आम्हाला नक्की आवडेल.' वासंती.

'मॅडम, तुम्ही मला शिवाजी महाराज किंवा महात्मा गांधी समजलात काय??' जगन्नाथ हसत सुटला.

'सर हसताय काय? तुम्हो स्वत:च्या कॅमेऱ्यानी 'सेल्फो' काढली असेल. तसेच स्वत:च्या घरात, शोकेसमध्ये ठेवण्यासाठी तीन ते तीस सेंटीमीटर आकाराचे छोटे पुतळे लोक हौसेनं करून घेतात. त्यालाच 'शेपी' म्हणतात.' वासंती.

'कमाल आहे! आपलाच छोटा पुतळा, टेबलावर पेपरवेट म्हणून वापरता येतो हे आत्ताच कळलं. शेपी तयार करण्याची प्रोसेस नक्कीच बघण्यासारखी असेल.' जगन्नाथ.

'मग केव्हा येताय आमचा स्टुडिओ बघण्यासाठी?'

'डिफन्स मिनिस्टरला एअर पोर्टवर सोडून मी सहा साडेसहाला स्टुडिओ बघायला येऊ शकेन?' डी. एस. पी.

'थँक यू सर! सर, तुम्हाला नॉनव्हेज जेवण चालेल ना?' वासंती.

'नो स्नॅक्स, नो जेवण! तुम्हाला त्रास होणार नसेल तर एक कप चहा चालेल.'

'मग मी साडे सहापर्यंत तुमची वाट बघेन. थँक यू सर!!' वासंतीनं फोन बंद केला.

सकाळचं राऊंड घेण्यासाठी जगन्नाथ गडबडीनं दाराकडं वळला. वळता वळता त्याच्या हाताच्या धक्क्याने टेबलावरच्या पेपरवेट खाली पडला आणि त्यात त्याला स्वत:ची छबी दिसू लागली. किंचित हसून जगन्नाथनं पेपरवेट टेबलावर ठेवला आणि हसून ऑफिसच्या बाहेर पडला.

जगन्नाथच्या अंदाजाप्रमाणं शेपी स्टुडिओमध्ये जायला संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. स्टुडिओच्या कमानीखाली 'वेलकम टू डी. एस. पी. साहेब' अशी रंगीत दिव्याची पाटी लागली होती. आत जाण्याच्या रस्त्यावरही दोन्ही बाजूला रंगीत दिव्याच्या माळा झगमगत होत्या.

जगन्नाथ आल्याची चाहूल लागताच स्टुडिओची मालकीण वासंती पुढं आली. तिच्या पाठोपाठ तिची बहीण नेहा, वय २० वर्ष, आणि भाऊ विश्वास वय २५, पुढं आले. नेहानं फ़लांचा गुच्छ जगन्नाथच्या हातात दिला आणि

‘वेलकम सर’ असं म्हणत जगन्नाथला मिठी मारली. नंतर आपण काय केलं हे लक्षात आल्यावर ओशाळून म्हणाला, ‘आय ॲम सॉरी सर! क्षणभर मला भास झाला की माझे वडीलच माझ्या समोर उभे आहेत.’

‘नेहा, डी. एस. पी. साहेबांच्या चहापानाची व्यवस्था झालीय का बघ जा.’

वासंतीनं नेहाला स्वयंपाक घरात पिटाळलं. नंतर जगन्नाथला म्हणाली, ‘सर दोन तीन वर्ष झाली. पण नेहा आमच्या वडिलांचा मृत्यू विसरली नाही.’ वासंती.

‘काही काही मुलं आई-वडिलांना विसरत नाहीत. विशेषत: आई-वडिलांचा मृत्यू अपघातात झाला असेल तर! काय नाव होतं तुमच्या वडिलांचं?’ जगन्नाथ.

‘कर्नल गोगटे. पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या कारवायांना बळी पडले.’ वासंती.

‘ओह्! कर्नल गोगट्यांना मी ओळखत होतो. दोन वर्षापूर्वी आमच्या पासिंग आऊट परेडला प्रमुख पाहुणे म्हणून आले होते.’ - जगन्नाथ.

वासंती आणि जगन्नाथ बोलत बोलत बंगल्याच्या हॉलमध्ये आले. डी.एस.पी. डायनिंग टेबल समोर बसले. त्यांच्या डाव्या बाजूला वासंती, समोर नेहा आणि उजव्या बाजूला विश्वास बसला. वासंतीनं ओळख करून दिली.

‘हा माझा भाऊ विश्वास. आमच्या शेपी स्टुडिओचं सगळं काम तोच सांभाळतो.’

‘हॅलोऽ! वय काय तुझं?’ - जगन्नाथ.

‘पंचवीस पूर्ण.’ विश्वास.

‘इतक्या कमी वयात स्टुडिओचं सगळं काम संभाळणं म्हणजे दिव्यचं आहे.’ जगन्नाथ.

‘दिव्य वगैरे काही नाही, सर! माझी ताई आणि धाकटी बहीण मला मदत करतात. आज्जी सुद्धा मधून मधून हातभार लावते.’ विश्वास.

‘तोंड देखलं कौतुक करतोय दादा! नाही तर डाफरत असतो दोघींवर.’

‘एवढं काम करता आलं नाही, एवढं सुद्धा तुम्हाला कळत नाही.’ असं बडबडत नेहा शेजारच्या खोलीत गेली. तिथल्या पलंगावर आजी नाही त बघून नेहा ओरडली. ‘दादा, लवकर ये. आजी तिच्या पलंगावर नाहीय.’

‘नीट बघ. बाथरूम मध्ये गेली असेल, नाही तर तिच्या खोलीच्या गॅलरीत बसली असेल.’ विश्वास.

‘दोन्हीकडं बघितलं. कुठंही नाही.’ नेहा.

‘च्यायला, मग कुठं गेली? ... नेहा, तू बागेत बघ. मी स्टुडिओमध्ये बघतो.’ विश्वास.

दोघांनी आजीचा शोध सुरू केला. तेवढ्यात बंगल्याच्या मुख्य दरवाजातून आजी आत आली. वासंतीनं पुढं होऊन आजीला आधार देऊन जेवणाच्या टेबलासमोर बसवलं. आजीनं विचारलं - ‘हे गृहस्थ कोण?’

‘मी डी. एस. पी. जगन्नाथ साळवी. नमस्कार करतो.’ डी. एस. पी.ंनी आजींना नमस्कार केला.

‘आयुष्यमान भव! असेच खूप मोठे व्हा. टेकडीच्या पलीकडं तुमचं ट्रेनिंग सेंटर आहे ना? सकाळी सहा वाजता उठाऽऽ उठाऽऽ असा बिगुल वाजला की मला जाग येते.’ आजी हसत हसत म्हणाली. तेवढ्यात नेहा आणि विश्वासनं प्रवेश केला. आजीला गप्पा मारत बसलेली बघून विश्वास म्हणाला, ‘कमाल आहे आजी इथं गप्पा मारत बसली आणि आम्ही बाग आणि आख्खा स्टुडिओ पालथा घातला.’ विश्वास.

‘काही तरी बोलू नकोस! आख्खा स्टुडिओ पालथा घालायला मी छोटीशी शेपी आहे का? इश्श!’ - आजी.

‘शेपी आजीऽऽ शेपी आजो? असं म्हणत नेहानं आजीच्या गळ्याला मिठी मारली. सगळे हसत सुटले. दरम्यान एका मोलकरीनं चहा नाश्त्याची तयारी केली. त्याचा स्वाद घेता घेता गप्पा झाल्यानंतर वासंती म्हणाली, ‘विश्वास, डी. एस. पी. साहेबांना आपला स्टुडिओ दाखव आणि तिथं काम कसं चालते ते पण सांग.’ वासंती.

‘ओऽ शुअर. सर जाऊ या?’

जगन्नाथ आणि विश्वास स्टुडिओकडं निघाले. जाता जाता विश्वासनं विचारलं - ‘सर, तुम्ही कधी कॅमेरा विकत घेतला होता?’ विश्वास.

‘ऑफ कोर्स! नोकरी लागल्यावर पहिल्या पगारातून कॅमेरा विकत घ्यायचा ही त्या काळात तरुणांत एक क्रझच होती.’ जगन्नाथ.

‘तुम्ही सेल्फो काढण्याचे प्रयोग अनेकदा केले असतील?’ विश्वास.

‘हो! पण तसे प्रयोग करताना मी आणि मित्रानं खूप विनोदी फोटो काढले आहेत. तुला गम्मत सांगतो. एकदा आम्ही एका टेकडीवर जात होतो. तिथल्या जुन्या मंदिराचे फोटो काढायचे होते. माझ्या मित्रानं मला मंदिरासमोर उभं

राहायला सांगितलं. शिखराचा काही भाग आणि त्याच्या समोर मी असा फोटो काढण्याचा बेत होता. तेवढ्यात एक कावळा शिखराच्या खाली उडून बसला. याच वेळी मित्राचा तोल गेला, का कॅमेरा हलला. पण प्रत्यक्षात फोटोत दिसतोय शिखरावर बसलेला कावळा आणि त्याच्या मागं शिखराचा पांढरा टोकदार भाग. त्याच्या एकत्रित परिणाम असा दिसतो, तो कावळ्यानी पांढरी टोपी घातली आहे.' जगन्नाथनं विश्वासला टाळी दिली आणि दोघं हसत हसत शेपी स्टुडिओच्या हॉलमध्ये शिरले.

हॉलच्या मध्यावर एक मोठा प्लटफॉर्म होता आणि त्याच्या चारीही बाजूला फ्लड लाईट्स आणि कॅमेरे लावलेले होते. विश्वासनं सांगायला सुरुवात केली, 'सर, स्वत:ची 'शेपी' करू इच्छिणाऱ्या स्त्री-पुरुष आणि मुलांना या फ्लॅटफॉर्मवर उभं करतो. तीनही बाजूनं लावलेल्या कॅमेरानं त्यांचे टू-डी फोटो काढले जातात. ते फोटो सोस येथील फॅक्टरीत पाठवले जातात. तिथं थ्री-डी प्रिंटरसाठी बसवलेल्या प्रोग्रॅमच्या माध्यमातून फोटो ट्रान्सफॉर्म करून आपल्याला हव्या त्या आकाराचे पुतळे शेपीज बनवता येतात. सध्या तरी पांच सेंटिमीटर ते तीस सेंटिमीटर आकाराच्या शेपोज तयार केल्या जातात.' - विश्वास.

'शेपीची किंमत सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारी असते का?' डी. एस. पी.

'पाच सेंटिमीटर शेपीची किंमत सध्या सात हजार आणि तीस सेंटिमीटरची किंमत एकवीस हजारापर्यंत होते.' विश्वास.

'बापरेऽऽ! भारतातल्या लोकांना एवढी किंमत परवडते?'

'नुसती परवडत नाही. त्या शेपीवर रंग-रंगोटी, पोलिसांचा/सैनिकांचा साज किंवा दाग-दागिन्यांचा साज चढवण्यासाठी आणखी पाच-दहा हजार रुपये द्यायलाही लोक तयार असतात.'

'ही कुशलता भारतात कुणी आणली?' जगन्नाथ.

'आमच्या स्टुडिओकडे ते श्रेय मी लाटणार नाही. ते श्रेय 'थ्री-डी स्फअर' या हैद्राबादच्या कंपनीला जातं.'

'तू त्या कंपनीतच शिक्षण घेतलंस?' - जगन्नाथ.

'नाही. मी दक्षिण कोरियाच्या राजधानीत सोल इथं प्राथमिक शिक्षण घेतलं आणि नंतर 'थ्री-डी स्फअर' या हैद्राबाद येथील कंपनीत सहा महिने प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतला.' विश्वास.

'म्हणजे तू वेल क्वालिफाईड आहेस तर!' असं म्हणून जगन्नाथनं विश्वासच्या पाठीवर शाबासकी दिली, आणि पन्नास हजाराचा चेक त्याच्या हातात दिला आणि म्हणाला, 'माझ्यातर्फे हे तुला बक्षीस! असंच नवीन काही तरी शिक आणि महाराष्ट्राचं नाव भारत भर झळकवं!!' - जगन्नाथ.

विश्वासनं चक स्वीकारला. कृतज्ञता व्यक्त केली आणि म्हणाला, 'सर, मला तुमच्याकडून आणखी एक बक्षीस हवंय.' विश्वास.

'बोल काय पाहिजे. माझ्या आवाक्यात असेल तर नक्की देईन!' जगन्नाथ.

'सर, तुम्ही माझ्या ताईशी लग्न कराल?' - विश्वास.

'काय? तुझ्या ताईशी लग्न?' जगन्नाथनं आश्चर्यानं विचारलं आणि विश्वासच्या खांद्यावर हात टाकून जोरजोरात हसू लागला. स्टुडिओत काम करणारे स्त्री पुरुष जगन्नाथ कडं आश्चर्यानं बघू लागले. जगन्नाथ म्हणाला -

'विश्वास, तू तुझ्या ताईशी आणि आजीशी याबाबत बोलला आहेस?'

नाही. पण त्या दोघींना तुमच्या स्थळाबद्दल बोलताना ऐकलय. विश्वास.

'बाळा, स्थळ म्हणजे काय माहीत आहे तुला?' जगन्नाथ.

'नाही. पण लग्न न झालेल्या मुलीसाठी मुलगा शोधणं म्हणजे स्थळ शोधणं असं म्हणत असतील.' विश्वास.

'नाही. घरात नको असलेल्या गोष्टी, वस्तू कचरा बाहेर टाकून देण्यासाठी जागा शोधणं म्हणजे स्थळ शोधणं.' जगन्नाथ.

'तुम्ही माझी फिरकी घेताय ना?' विश्वास.

'तू माझी 'शेपी' घेणार आहेस ना?' जगन्नाथ.

शेपीचं नांव काढल्याबरोबर विश्वास कामाला लागला. पाच-दहा मिनिटात ते काम संपलं. विश्वास म्हणाला, 'सर, सात आठ दिवसात शेपी तयार होईल. मी ती शेपी स्वत: तुमच्या ऑफिसात आणून देईन.' विश्वास.

'थँक्स. ताईना आणि आजीला माझा नमस्कार सांग. गुड नाईट.' एवढं बोलून जगन्नाथ स्टुडिओच्या बाहेर पडला.

क्षणभरानं, दुसऱ्या दारानं नेहा स्टुडिओमध्ये आली. विश्वास कॅमेरा वगैरे सामान आवरत होता. डी. एस. पी. साहेब दिसले नाहीत. तेव्हा नेहानं विचारलं,

'दादा, डी. एस. पी. साहेब कुठं आहेत?' - नेहा.

'कुठं म्हणजे? ते गेले त्यांच्या सेंटरमध्ये.' विश्वास.

'जेवायला थांबा अशी विनंती केली नाहीस?' नेहा.

'मला काय माहीत त्यांना जेवणाचं निमंत्रण आहे!' विश्वास.

'तू म्हणजे - किती वेळ झाला ते बाहेर पडले त्याला?' नेहा.

'झाली दोन-तीन मिनिटे. अजून कारपर्यंत पोहोचले सुद्धा नसतील?' विश्वास.

नेहा पळत सुटली. जगन्नाथ कारमध्ये बसणार तेवढ्यात नेहानं ओरडून त्यांना थांबवलं. पळत पळत कारपर्यंत पोहोचली, आणि म्हणाली, 'सर, जेवण न करताच निघालात?' नेहा.

'जेवण?... चहा पाणी झालं होतं... आणि मला आठ वाजायच्या आत सेंटरमध्ये पोहोचायला हवं.' जगन्नाथ.

'आठ वाजता ना, आत्ता फक्त सात वाजले आहेत. सर, मला तुम्हाला काही गोष्टी दाखवायच्या आहेत, तुमचा सल्ला घ्यायचा आहे.' नेहा.

नेहा सारख्या गोड मुलीचा आग्रह डी. एस. पी.ंना मोडता आला नाही. नेहानं त्याना बैठकीच्या खोलीत बसवलं. टी-पॉय त्याच्या समोर सरकवला आणि ओरडून ताईला सांगितलं, 'ताई, सर आपल्या बरोबर रात्रीचं जेवण घेतील.'

तेवढं सांगून नेहा तिच्या खोलीकडं पळाली. जगन्नाथानं स्वत:चा मोबाईल काढला आणि त्याच्या मेसचे मॅनेजर देवळे यांना निरोप दिला. 'मी शेपी स्टुडिओमध्ये आहे. मी इथंच डिनर करून येणार आहे. माझ्या खोलीत एक कपभर दूध ठेवायची व्यवस्था करा.' जगन्नाथ.

नेहा एक छोटी बॉक्स घेऊन आली. बॉक्स टी-पॉयवर ठेवली आणि म्हणाली, 'सर, आमच्या शाळेमार्फत एन. सी. सीचं मी दोन वर्षाचं ट्रेनिंग पूर्ण केलं आहे. त्या काळात मी मिळवलेली पदकं आणि प्रशस्तीपत्रकं बघा. आणि त्या संबंधात पुढं काही करता येईल का ते मला सांगा.'

जगन्नाथनं बॉक्स उघडला आणि तो आश्चर्यचकीतच झाला. त्या पेटीत दोन-तीन चांदीची पदकं - शूटिंगमध्ये प्राविण्य मिळवल्याबद्दल आणि वेगवेगळ्या खेळात प्राविण्य मिळवल्याबद्दल चार पाच सर्टिफिकेटस होती. ती बघून जगन्नाथनं नेहाला जवळ बोलावलं. तिचं अभिनंदन केलं. कौतुक केलं आणि म्हणाला, 'नेहा, तू मिळवलेलं चौफर यश असं दडवून का ठेवलं होतंस. प्रत्येक पदक आणि सर्टिफिकेट चांदीच्या फ्रेममध्ये बसवून, येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला दिसेल अशा ठिकाणी सांगलं पाहिजे.' - जगन्नाथ.

'तुम्ही म्हणता तशा फ्रेम्स केल्या होत्या. पण माझ्या आजीला असं प्रदर्शन केलेलं आवडत नाही. तिनं सगळ्या फ्रेम्स घरातून काढून टाकायला लावल्या.' - नेहा.

'तुझ्या ताईला आणि आजीला बाहेर बोलाव. मी बोलावलंय म्हणून सांग.' - जगन्नाथ.

क्षणभरानं दोघी बाहेर आल्या जगन्नाथ म्हणाला, - 'मॅडम, तुमच्या बहिणीचं टॅलेंट असं दडवून का ठेवलंत? बघाऽ बघा, पुन्हा एकदा ही चांदीची पदकं आणि प्रशस्तीपत्रकं. ही साधी पदकं नाहीत. तरुणांनी दाखवलेल्या शौर्याचं प्रतिक आहेत.' जगन्नाथ.

'मान्य आहे. पण तीच प्रतिकं दहशत वाद्यांच्या कारवाया मुळं मृत्यूला कारण होणार असतील तर काय उपयोग त्या प्रतिकांचा? आमचे वडील दहशतवाद्यांच्या कारवायांना बळी पडले. मागं राहाणाऱ्यांची काय अवस्था होते, ती माहीतच असेल तुम्हाला?' वासंती.

'अहो पण वीराचं मरण असतं ते! मागं राहणाऱ्यांची व्यवस्था/सांभाळ करण्याची व्यवस्था सरकार शक्य तेवढी करते. मोठाली हॉस्पिटल्स, वृद्ध निवास, सरकार पुरस्कृत गृहप्रकल्प हे त्याचेच प्रतिक...' जगन्नाथ

'किती जणांना सरकारी सोईंचा लाभ मिळतो? तिथंही चिरीमिरीचं साम्राज्य असतंच!! म्हणूनच पुढच्या पिढीतल्या तरुण मुला-मुलींनी सैन्यात किंवा पोलीस दलात भरती होण्याला माझ्या आजीचा विरोध आहे.' वासंती.

'पण सरकारनं हुतात्म्यांच्या मुला-मुलींसाठी, सगळीकडं दहा टक्के जागा राखून ठेवलेल्या असतात. खरी परिस्थिती अशी आहे की वृद्ध स्त्री पुरुष त्यांची जीवनयात्रा सुख समाधानानं आणि ऐषारामात पार पाडावी म्हणून

त्यांची मुलं, नातवंडांना त्यांच्या सेवेत गुंतवून ठेवण्यात धन्यता मानतात. तुमच्या आजींन नेमकं तेच केलं आहे.' जगन्नाथ.

जगन्नाथचं बोलणं ऐकून आजी एकदम उसळून म्हणाली, 'आमच्या घरगुती प्रश्नात तोंड खुपसणारे तुम्ही कोण? माझ्या नातीनं तुम्हाला योग्य उत्तर दिलंय. तुम्ही जाऊ शकता!' आजी.

'मी इथं राहण्यासाठी आलो नाही. पण तुमच्या नातीच्या माहिती सांगतो. आमच्या ट्रेनिंग सेंटरमध्ये एक जूनपासून एन. सी. सी. कॅडेट साठी दोन महिन्याचा रिफशर कोर्स सुरू करणार आहात. तो कोर्स पूर्ण झाला की त्या कॅडेटस्ना महाराष्ट्र पोलिसांत पी. एस. आय. श्रेणीत नोकरी देण्यात येणार आहे. नेहाला पोलिसांत नोकरी करायची असेल तर आमच्या ऑफिसातून अर्ज वाटप चालू आहे. पुढच्या आठवड्यात अर्ज वाटप बंद होणार आहे. नेहाला पोलिसांत नोकरी करायची असेल तर....' - जगन्नाथ.

'ते आमचं आम्ही बघून घेऊ.' - आजी.

'धन्यवाद! गुड नाईट' - जगन्नाथ जाऊ लागला. नेहानं त्यांना थांबवलं.

'सर, तुम्ही जेवण करून जाणार होताना?'

'तुमच्या आऊजाईंनी माझ्या तोंडात झणझणीत तोबरा भरलाय. तो पुरेसा आहे. थँक यू- गुडनाईट.'

डी. एस. पी. जगन्नाथ पटकन घराबाहेर पडले. नेहानं नाराजीनं पदकं डब्यात भरली. तरा तरा तिच्या खोलीत गेली. पदकांचा डबा कोपऱ्यात फकून दिला आणि बेडवर पडून रडू लागली. क्षणभरानं वासंती त्या खोलीत आली. पदकं डब्यात भरली, नेहा जवळ जाऊन, तिच्या पाठीवरून हात फिरवला. आणि म्हणाली, 'नेहा एवढ्या तेवढ्या कारणानं नाराज होऊन रडत बसायचं नाही. तुझ्या सारख्या मुलीला तर अजिबात शोभत नाही. उठ! उठ!!' - वासंती.

'ताई, आजी कशी बोलत होती ऐकलंस ना?' डी. एस. पी. सारख्या माणसाशी असं बोलतात? आता डी. एस. पीं.ना तोंड दाखवायची सोय राहिली नाही. आपण त्यांच्याकडे गेलो तरी ते आपलं म्हणणं का ऐकून घेतील?' - - नेहा.

'तू डी. एस. पी. साहेबांना पुरेसे ओळखलंच नाहीस. ते दहा वर्षाचे असल्यापासून हायवे जवळच्या हॉटेलात कप-बशा विसळून दिवस काढलेत. त्यांनी.' - वासंती.

'तुला काय माहीत?' - नेहा.

'परवा मी त्यांच्या व्याख्यानाला गेले होते. खूपच कष्टात आणि प्रामाणिकपणे दिवस काढलेत त्यांनी. म्हणून म्हणतेय, त्यांच्या देखरेखीखाली दोन महिन्याचा रिफशर कोर्स करण्याची संधी मिळत असेल तर ती वाया घालवू नकोस, आणि आय. पो. एस.ची नोकरी मिळणार असेल तर तू घेतलेल्या कष्टाचं चीजच होईल.' - वासंती.

'सॉरी ताई. मी चुकले. आता तू म्हणशील तसंच वागीन.' - नेहा.

'मी म्हणेन तशी वागू नको. माझा सल्ला तुला पटला तर त्या प्रमाणं वागं.' - वासंती.

दुसरे दिवशी सकाळी दोघी सगळी कामं उरकून सकाळी दहा-साडेदहाच्या सुमारास ट्रेनिंग सेंटरच्या ऑफिसात पोहोचल्या. एका क्लार्कनं त्यांची सगळी चौकशी करून एक फॉर्म वासंतीच्या हातात दिला आणि म्हणाला, 'मॅडम अगदी वेळेवर आला. तुमच्या मुलीच्या नंतर रिफशर कोर्समध्ये प्रवेश देणं बंद करणार आहोत. हा फॉर्म भरून द्या. त्याच्या एक्सलन्सचे पुरावे आणले असतील त्याची नोंद फॉर्ममध्ये करा. इथं बसून अर्ज भरून दिलात तरी चालेल.' नंतर शिपाई कांबळेला बोलावून, 'रिफशर कोर्सच्या सगळ्या जागा भरल्या भरल्या असल्यामुळे आता प्रवेश देणं बंद केलं आहे' असा बोर्ड सेंटरच्या प्रवेशद्वारावर टांगण्यास सांगितलं. शिपाई कांबळे बोर्ड घेऊन निघून गेला.

वासंती म्हणाली, 'नेहा तू खरीच नशीबवान आहेस. अगदी शेवटी का होईना, पण कोर्समध्ये प्रवेश मिळाला.

त्याच वेळी डी. एस. पी.ंनी त्या हॉलमध्ये प्रवेश केला. नेहाला बघून म्हणाले, 'यंग लेडी, यू आर वेलकम टू द रिफशर कोर्स. यशवंत, यांना सगळे

फॉर्मस दिलेस? फॉर्मस, अनेक्शर्स कसे कसे भरायचे ते सांगितलंस.' - जगन्नाथ.

'यस सर!' - यशवंत.

नंतर वासंतीकडे वळून म्हणाले, 'मॅडम, तुमच्या बहिणीला रिफशर कोर्समध्ये एन्रोल करून फार मोठं काम केलयत. तिनं मिळवलेली पदकं आणि प्रशस्ती पत्रकं ट्रंकेत पडून, वाळवीचं आणि झुरळांचं भक्ष्य झालं असतं.' - जगन्नाथ.

'सर, माझी बहीण हिरमुसली होऊन घरात बसून राहावी असं मला अजिबात वाटत नव्हतं. पण मार्गच सापडत नव्हता. परवा रात्री तुमच्याशी बोलून आम्हाला तो मार्ग सापडला. तुमचे किती आभार मानावेत तेच कळत नाही.' वासंती.

त्याच वेळी जगन्नाथचा शिपाई फोन घेऊन आला. 'सर, कोल्हापूरच्या ए.सी.पी. ना तुमच्याशी बोलायचय!'

जगन्नाथनं फोन घेतला आणि म्हणाला, शेख्या, मी तुला आज फोन करणारच होतो. रिफशर कोर्सचा कोटा पूर्ण झाला आहे. तू त्या कोर्सचा इनचार्ज आहेस. दोन-अडीच महिने साताऱ्याला मजा करायला ये. तसं पत्र आजच पाठवून देतो .... अं!? अरे बाबा होऽ होऽऽ, पण त्या कॅडेटला अेनरोल केलंय... गुड डे!' जगन्नाथ.

नेहा वासंतीला हलक्या आवाजात म्हणाली, 'ताई, शेखावत सर आमच्या एन. सी. सी. चे इन्स्ट्रक्टर होते. आताही कोर्सचे इनचार्ज असतील तर खूप मजा येणार आहे. जॉली आहेत. तेवढेच स्ट्रीक्ट पण आहेत. मला चिमणी म्हणायचे. म्हणायचे, 'चिमणे तुझी चिवचिव बंद कर. आणि टारगेटवर लक्ष ठेव. नेम चुकला तर रायफल घेऊन ग्राऊंडचे दोन राऊंड मारावे लागतील.' - नेहा.

'नेहा, इथलं काम संपलं असलं तर घरी जाऊ या. घरी सुद्धा खूप कामं आहेत. मुख्य काम आहे आपल्या आजीचं मन वळवण्याचं?' वासंती.

'मन वळवण्याचा प्रश्नच नाही. आजीला सांगून टाक आम्ही कितीही नकार दिला तरी डी. एस. पी. ऐकायला तयार नव्हते. शेवटी त्यांच्या 'हो' ला 'हो' म्हणावंच लागलं.' नेहा.

'आपली आजी दुधखुळी आहे असा समज आहे का तुझा? 'दोघी कुठं गेला होता' या साध्या प्रश्नाचं उत्तर देणं सुद्धा अवघड जाईल आपल्या दोघींच्या बारशाच्या घुघऱ्या खूप ओरपल्या आहेत तिनं.' वासंती.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की पाच कोटी नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि

त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष

ई साहित्य प्रतिष्ठान